सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# मानव अधिकार आणि कर्तव्ये यांचा परिचय




मानव अधिकार आणि कर्तव्ये यांचा परिचय

# विद्यापीठ गीत

ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतों
श्रमनिष्ठा हें पवित्र तीर्थ मानतों
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्वपरीक्षा
हें विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

मंगेश पाडगांवकर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# मानव अधिकार आणि कर्तव्ये यांचा परिचय

**डॉ. टी. एस. एन. सास्त्री**
समन्वयक, मानव अधिकार शिक्षण अभ्यासक्रम आणि प्राध्यापक
कायदा विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्रस्तावना

**महामहीम श्री. सी. विद्यासागर राव**
माननीय राज्यपाल, महाराष्ट्र

उपोद्घात

**प्रा. डॉ. नितीन करमळकर**
कुलगुरु
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मनोगत

**डॉ. एन. एस. उमराणी**
प्र-कुलगुरु
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**प्रकाशक**

कुलसचिव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

**मुद्रणालय**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रण विभाग
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
प्रथम आवृत्ती २०१८.

या पुस्तकातील कोणताही भाग किंवा स्लाईड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय पुनर्निर्मित करता येणार नाही.

या प्रकाशनात वापरल्या गेलेल्या बाह्य अथवा तृतीय पक्षाच्या इंटरनेट वेबसाईटच्या अचूकतेशी व संलग्नतेशी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जबाबदार नाही; तसेच सदर संकेतस्थळावरील मजकूर भविष्यात अचूक आणि योग्य राहील याचीही हमी देत नाही.

भाषांतर सेवा

प्राचार्य डॉ भा. व्यं . गिरधारी

शासन प्राधिकृत अनुवादक भाषातज्ज्ञ

चलभाष क्रमांक.९८२३०१२३०१ ,

इ-मेल - bvgirdhari@gmail.com

पता :- सदनिका क्रमांक जे – १२०२, आसावरी, नांदेड सिटी, सिंहगड रस्ता, धायरी फाट्याजवळ, पुणे ४११ ०६८

## भाषांतर प्रमाणपत्र

ज्या कुणाशीही संबंधित त्यांच्यासाठी

दिनांक: २५ / ०१/ २०१८

मी, डॉ भा. व्यं. गिरधारी असे घोषित करतो की मी इंग्लिश व मराठी भाषेमध्ये तज्ज्ञ आहे. दिनांक ७.८.२००१ रोजीच्या शासन निर्णय क्रमांक भाषा – १००१ / ७११ – प्रकरण क्रमांक ५३ – २००१ -२० –ब ह्या द्वारे महाराष्ट्र शासनाने भाषांतराचे काम करण्यास मला प्राधिकृत केले आहे. मी असे प्रमाणित करतो की प्रा. डॉ. टी. एस. एन सास्त्री यांनी लिहिलेल्या " Introduction To Human Rights& Duties" असे शीर्षक असलेल्या इंग्रजी पुस्तकांचा मी मराठीमध्ये अनुवाद केला आहे.

मी असेही प्रमाणित करतो की माझ्या ज्ञानानुसार सोबत संलग्न मराठी मधील पुस्तक हे मूळ इंग्लिश पुस्तकाचा खरा व योग्य अनुवाद आहे . मूळ पुस्तकातील कायदेशीर गर्भितार्थ जुळून येण्यासाठी मूळ संहितेनुसार शैली व भाषा स्वीकारण्यात आली आहे.

भा. व्यं. गिरधारी

( डॉ. भा. व्यं. गिरधारी )

Dr. B.V. GIRDHARI
Govt. Authorised Translator
Panel Member
LNG -2007/68/ CASE No. 9-07-20[illegible]
Dt. 18-1-2008
Directorate of Languages Maharashtra State

शासन प्राधिकृत अनुवादक व भाषातज्ज्ञ , महाराष्ट्र राज्य.

(सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in ह्या अधिकृत संकेतस्थळावर २००८०११८११५२०२१००१ ह्या संकेत क्रमांकावर उपलब्ध आहे.)

Seal :

# अनुक्रमणिका

शुभ संदेश
उपोद्घात
मनोगत
ऋणनिर्देश

## घटक १
## मूलभूत संकल्पना

| | | |
|---|---|---|
| १. | मूल्यांचे महत्व | १ |
| २. | मानवी मूल्ये | २ |
| ३. | प्रतिष्ठा | ४ |
| ४. | स्वातंत्र्य | ४ |
| ५. | समता | ६ |
| ६. | न्याय | ७ |
| ७. | नीतीतत्त्वे आणि नैतिकता | ७ |
| ८. | विविधतेत एकता | ९ |
| ९. | मानव अधिकार शिक्षणाचा अर्थ आणि महत्त्व | ९ |
| १०. | मानव अधिकार शिक्षणाचे उद्देश | १० |
| | (अ) सारांश | ११ |
| | (ब) नमुना प्रश्न | १३ |

# घटक २
# अधिकार आणि कर्तव्यांचा संबंध

**भाग १ अधिकार**


| | | |
|---|---|---|
| १. | अधिकाराचे व्युत्पत्तीशास्त्र | १४ |
| २. | अधिकाराचा अर्थ | १४ |
| ३. | अधिकाराचे विश्लेषण | १५ |
| ४. | नैसर्गिक अधिकार | १६ |
| ५. | कायदेशीर अधिकार | १७ |
| ६. | दाव्याचे अधिकार आणि स्वातंत्र्याचे अधिकार | १७ |
| ७. | सकारात्मक आणि नकारात्मक अधिकार | १८ |
| ८. | व्यक्तिगत आणि समूह अधिकार | १९ |
| ९. | सार्वत्रिक/विश्वव्यापी अधिकार | २० |

**भाग २ कर्तव्य : स्वरूप व संकल्पना**


१. दायित्त्व/बंधने आणि कर्तव्य यातील पारिभाषिक फरक २१

२. कर्तव्य – कर्तव्याची संकल्पना २२

३. कर्तव्यांचे विविध प्रकार २२

अ. नैसर्गिक आणि अधिग्रहित कर्तव्ये

ब. सकारात्मक आणि नकारात्मक कर्तव्ये

क. परिपूर्ण आणि अपूर्ण कर्तव्ये

ड. सकृद्दर्शनी आणि कर्तव्य म्हणून मानलेल्या इतर सर्व गोष्टी

४. मानव अधिकारांच्या रक्षकांना दिलेले अधिकार व संरक्षण २५

५. राज्यांची भूमिका २६

६. प्रत्येकाची जबाबदारी २७

७. राष्ट्रीय कायद्याची भूमिका २७

८. कर्तव्यांचा समाजावर असलेला प्रभाव २७

९. समाजाप्रति असलेली कर्तव्ये २८

१०. मूल्य म्हणून कर्तव्य २९

११. अधिकार आणि कर्तव्य यांच्या दरम्यान असलेले आंतर संबंध ३०

१२. सारांश ३१

(अ) अधिकार

(ब) कर्तव्ये

१३. नमुना प्रश्न ३४

# घटक ३
# कायदेशीर आयुधांच्या परिभाषेची ओळख


| | | |
|---|---|---|
| १. | कायदेशीर तरतुदींबाबतचे टिपण | ३५ |
| २. | करार | ३६ |
| ३. | द्विपक्षीय करार | ३६ |
| ४. | बहुपक्षीय करार | ३७ |
| ५. | आंतरराष्ट्रीय संकेत/अभिसंधि आणि वचननामे/प्रसंविधा | ३७ |
| ६. | जाहीरनामा | ३८ |
| ७. | परिशिष्ट मसुदा /राजशिष्टाचार | ३८ |
| ८. | परिषद | ३९ |
| ९. | ठराव | ३९ |
| १०. | विधी/शासनपत्र व सनद/संविधि | ३९ |
| ११. | कार्यकारी आदेश | ३९ |
| १२. | सारांश | ४० |
| १३. | नमुना प्रश्न | ४१ |

# घटक ४
# संयुक्त राष्ट्रे आणि मानव अधिकार


| | | |
|---|---|---|
| १. संयुक्त राष्ट्रांच्या व्यवस्थेवर दृष्टिक्षेप | | ४२ |
| २. मानव अधिकारांविषयक संयुक्त राष्ट्रांच्या सनदीतील तरतुदी | | ४७ |
| ३. मानव अधिकारांचा वैश्विक जाहीरनामा (UDHR): काही तांत्रिक पार्श्वभूमी | | ४९ |
| ४. मानव अधिकारांच्या वैश्विक जाहीरनाम्याचे (UDHR) महत्त्व | | ५१ |
| ५. जाहीरनाम्याचे विश्लेषण | | ५३ |
| जाहीरनाम्याची प्रस्तावना | | ५३ |
| कलम १ | स्वातंत्र्य आणि समान प्रतिष्ठा व अधिकार | ५८ |
| कलम २ | भेदभाव प्रतिबंध | ६० |
| कलम ३ | जगण्याचे स्वातंत्र्य उपभोगण्याचे आणि सुरक्षेचे अधिकार | ६१ |
| कलम ४ | गुलामगिरी प्रतिबंध | ६३ |
| कलम ५ | यातना/छळ प्रतिबंध | ६५ |
| कलम ६ | कायद्यासमोर माणूस म्हणून मान्यता मिळविण्याचा अधिकार | ६६ |
| कलम ७ | कायद्यापुढे समानता | ६७ |
| कलम ८ | प्रभावी उपाय अधिकार | ६८ |
| कलम ९ | अनियंत्रित अटक प्रतिबंध | ६९ |
| कलम १० | नि:पक्ष सुनावणीचे अधिकार | ७१ |
| कलम ११ | निरपराधांचे गृहितक आणि दंडात्मक कायद्याची पूर्वव्यापी उपाययोजना न करणे | ७२ |
| कलम १२ | गोपनीयतेचा/खाजगी जीवनाचा अधिकार | ७५ |
| कलम १३ | संचार, निर्गमन आणि पुन्हाप्रवेशाचे स्वातंत्र्य | ७६ |
| कलम १४ | आश्रयाचे अधिकार | ७७ |
| कलम १५ | राष्ट्रीयत्त्वाचा अधिकार | ७८ |
| कलम १६ | विवाह करण्याचा आणि कौटुंबिक जीवन जगण्याचा अधिकार | ८० |

| | | |
|---|---|---|
| कलम १७ | मालमत्तेचा अधिकार | ८१ |
| कलम १८ | विचारस्वातंत्र्य, सद्सद्विवेकबुद्धी व धर्म स्वातंत्र्य | ८१ |
| कलम १९ | मतस्वातंत्र्य व अभिव्यक्ती/भाषणस्वातंत्र्य अधिकार | ८२ |
| कलम २० | सभा व संघटनेचे स्वातंत्र्य | ८३ |
| कलम २१ | देशाच्या शासनात भाग घेण्याचा अधिकार | ८३ |
| कलम २२ | आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकार | ८५ |
| कलम २३ | काम करण्याचा अधिकार | ८७ |
| कलम २४ | आराम व फुरसतीचा वेळ घेण्याचा अधिकार | ८८ |
| कलम २५ | पुरेसे मानक असलेले जीवन व आरोग्य असण्याचा अधिकार | ८९ |
| कलम २६ | शिक्षणाचा अधिकार | ९१ |
| कलम २७ | संस्कृतीचा अधिकार | ९३ |
| कलम २८ | सामाजिक व आंतरराष्ट्रीय व्यवस्था | ९४ |
| कलम २९ | कर्तव्य आणि मर्यादा | ९५ |
| कलम ३० | अधिकारांचे दुरुपयोग न करणे | ९६ |

६. सारांश ९७

७. निष्कर्ष ९८

८. नमुना प्रश्न ९९

९. सामान्य माहिती १०१


**परिशिष्ट**

**सूचक वाचन साहित्य**


१. पुस्तके १०१

२. जर्नल्स आणि दस्तऐवज १०२

३. सांकेतिक स्थळावरील माहिती १०३

CH. Vidyasagar Rao
GOVERNOR OF MAHARASHTRA



सत्यमेव जयते

RAJ BHAVAN
Malabar Hill
Mumbai 400 035
Tel. : 022-2363 2660
Fax.: 022-2368 0505

०६ जानेवारी २०१८

# शुभ संदेश

मानव अधिकार मूल्यांचा शिक्षणाच्या माध्यमातून प्रसार करण्यासाठी जागतिक मानवाधिकार परिषदेने सन १९९३ साली सर्व राष्ट्रांना मानवाधिकार शिक्षण देण्याची सूचना केली होती.

सर्व विद्याशाखांना मानवाधिकार शिक्षण अनिवार्य करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ ठरले आहे, हे समजून समाधान वाटले. मानवाधिकाराचे महत्व जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यापीठाने मानवाधिकार शिक्षण स्थानिक भाषेमध्ये देखील उपलब्ध करुन देण्यासाठी पावले उचलली आहेत ही स्वागतार्ह बाब आहे.

'मानवी अधिकार आणि कर्तव्यांचा परिचय' हा मानवी अधिकार शिक्षण कार्यक्रमाच्या मालिकेतील पहिला अनुवादित खंड असून पुस्तकातील मजकूर हा अतिशय साध्या, सोप्या आणि समजण्यासारख्या पद्धतीने सादर केला आहे. हा विषय मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये अभ्यासण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्याबद्दल मी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमाळकर यांचे विशेष अभिनंदन करतो.

मानव अधिकार शिक्षण कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. टी. एस. एन. शास्त्री यांनी पुस्तकांचे लिखाण केल्याबद्दल तसेच मानवाधिकार अभ्यास कार्यक्रम तयार करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल मी अभिनंदन करतो. अनुवादक आणि कर्मचारी यांचे देखिल अभिनंदन करतो.

राज्यातील आणि देशातील इतरही विद्यापीठे व शैक्षणिक संस्था मानव अधिकार शिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक ती पावले उचलतील, अशी आशा व्यक्त करतो आणि उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा देतो.

**महामहीम श्री. सी. विद्यासागर राव**
**माननीय राज्यपाल महाराष्ट्र**

# उपोद्घात



''मानव अधिकार'' हे कर्तव्य आधारित शिक्षणाचा व्यावहारिक दृष्टिकोन प्रतिबिंबित करतात. कायद्याने प्रत्येक व्यक्तीला आनंदाने जगण्यासाठी आणि सक्षम बनविण्यासाठी ते प्रत्येक व्यक्तीत आशावाद आणि आदर्शवाद पेरतात. हे अधिकार लक्षात घेण्याकरीता मानवाधिकार शिक्षण सैद्धांतिक व व्यावहारिक पैलूंचा प्रचार करते. तसेच, हा अभ्यासक्रम कोणत्याही भेदभाव न करता हक्कांचा आदर व प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. या उद्दिष्टांच्या सोबत मानवाधिकार विषयक जागतिक परिषदेने १९९३ यांनी मानवाधिकार शिक्षण प्रसारासाठी आवश्यक ती पाऊले उचलण्याची विनंती इतर सदस्य राष्ट्रांना केली आहे.

जागतिक परिषदेच्या १९९५ ते आजतागायत घोषणांवर आधारित, मानवाधिकार शिक्षणाच्या अभिवृद्धीसाठी आवश्यक त्या असंख्य उपाययोजना संयुक्त राष्ट्रसंघाकडून स्वीकृत केल्या गेल्या आहेत. प्रामुख्याने मानव अधिकार शिक्षण हे प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण स्तर, तसेच जनाधारित कार्यक्रमांच्या मार्फत सर्व स्तरांवरील लोकांना दिले जावे याकरिता संयुक्त राष्ट्रसंघाने विनिर्दिष्ट कृतीयोजनेचा सन २००५ मध्ये स्वीकार केला आहे, जेणेकरून इतर राष्ट्रांनीही मानवी उपयोगितेच्या दृष्टिकोनातून स्वीकार करावा.

भारत सरकारने सन १९८६ मध्ये शिक्षणाचे राष्ट्रीय धोरण बनवले घोषित केले आहे. निरक्षरता व समाजातील अन्य विकृती नष्ट करण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून वैज्ञानिक, तांत्रिक, नैतिक आणि नीतीमूल्यांच्या घडामोडींमध्ये होणाऱ्या विकासाची माहिती देण्यासाठी एक कृतीयोजना आखली गेली. त्याच दरम्यान विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) खालील उद्दिष्टांसह विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये मानव अधिकार आणि कर्तव्य शिक्षण अंमलात आणण्यासाठी एक रूपरेषा तयार

करण्यात आली, त्यामध्ये खालील ध्येयांचा समावेश दिसून येतो :

(अ) समाज आणि संस्था यांच्यामध्ये संवाद विकसित करणे.

(ब) मानव अधिकार व कर्तव्यांच्या रूढी व मूल्यांसंबंधी नागरिकांना जागृरूक करणे,

(क) मानव अधिकार संबंधित उपक्रमास प्रोत्साहन देणे, आणि

(ड) मानव अधिकार, कर्तव्ये आणि आंतरराष्ट्रीय मानवतावाद कायद्यासंबंधी संशोधनत्मक अभ्यास यांना प्रोत्साहन देणे.

मानवी जीवनाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी, जागरूकता, विश्वास व मूल्यांच्या प्रती बांधिलकी उत्पन्न करण्यासाठी प्रसार करण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला आहे. त्यामुळे विद्यापीठ व महाविद्यालये यांना मानव अधिकार व कर्तव्ये यांची जाणीव व महत्त्व तसेच विविध मार्गाने मूल्ये व नैतिकतेच्या प्रसारासाठी उचित पाऊले उचलण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने विद्यापीठ अनुदान आयोग देशातील विविध विद्यापीठांमध्ये मानव अधिकार आणि कर्तव्य शिक्षण केंद्रे स्थापित करण्यासाठी निधी प्रदान करीत आहे. तथापि भागधारकांमध्ये असलेल्या सक्रीय देशभक्तीचा अभाव, अशा शिक्षण केंद्रांच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या लोकांमधील अनास्थेमुळे आणि विद्यापीठांना प्रशासकीय व आर्थिक पाठबळाच्या अभावामुळे देशातील अनेक केंद्रे हे उद्दिष्ट साध्य करू शकत नसल्यामुळे अयशस्वी ठरली आहेत व त्यातील काही केंद्रे कार्यरत नाहीत.

याच पार्श्वभूमीवर मानव अधिकारांच्या मूल्यांचा आदर व महत्त्व विकसित करण्यासाठी तसेच मानव अधिकारांचे उल्लंघन टाळण्यासाठी भारत सरकारने १९९३ मध्ये मानव अधिकार कायदा संमत केला. हा कायदा प्रत्येक राज्यात मानव अधिकार आयोग स्थापन करण्यासाठी तरतूद करतो. याशिवाय संरक्षण यंत्रणेव्यतिरिक्त हा कायदा मानव अधिकार आयोगाला वेगवेगळ्या माध्यमातून मानवाधिकार व कर्तव्यांच्या शिक्षणाचा प्रसार करण्याचा अधिकार प्रदान करतो. ऑगस्ट २०१० मध्ये महाराष्ट्र राज्य मानव अधिकार आयोगान राज्यातील प्राथमिक ते विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांसाठी ''मानवाधिकार शिक्षणाचा व्यापक प्रमाणावर समावेश'' या विषयावर एकदिवसीय परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादात महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, मंत्री व सचिव यांच्यासह उच्च अधिकारी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे व महाराष्ट्र मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्यातील इतर मंत्री आणि सचिव यांच्यासह उच्च अधिकारी उपस्थित होते.

राज्य मानव अधिकार आयोगाच्या या जोखमीच्या कार्याचे समर्थन करण्यासाठी आणि महाराष्ट्राला मानव अधिकार आणि कर्तव्य शिक्षण देण्यात आघाडीवर असणारे भारतातील पहिले राज्य

बनवण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आपल्या सर्व शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये मानव अधिकारांच्या शिक्षणाला अनिवार्य करण्याचे ठरविले आहे. या परिसंवादात, कुलगुरूंनी विद्यापीठातर्फे मानव अधिकार शिक्षण अभ्यासक्रम अंमलबजावणीचे एक सादरीकरण केले. या सादरीकरणाच्या आधारे, विद्यापीठाने विविध विभागामध्ये या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी सुरू केली. या अभ्यासक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे, विद्यापीठाने याचे मराठी अनुवाद करून त्याचा प्रसार इतर महाविद्यालयांकडे करण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे.

या संदर्भात विद्यापीठाने आपल्या अधिकृत संकेतस्ळावर एक स्वतंत्र वेबपेज तयार केले आहे. ज्यावर या अभ्यासक्रमाचे सर्व नियम आणि तपशील ई-पुस्तके व व्याख्यानांसहीत उपलब्द करून देण्यात आला आहे. सदर अभ्यासक्रमाची विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), राष्ट्रीय प्रमाण अधिस्वीकृती परिषद (NAAC) यांच्याकडून प्रशंसा झाली व विद्यापीठ अनुदान आयोगाकडून निधी प्राप्त होण्यास सुरुवात झाली. पुढच्या पिढ्यांसाठी मानव अधिकार शिक्षणाचा प्रसार आणि ज्ञान यांचा प्रसार करण्याचे कार्य विद्यापीठाकडे सोपविले. याबद्दल मी महाराष्ट्राचे महामहीम माननीय राज्यपाल श्री.सी. विद्यासागर राव आणि महाराष्ट्र सरकार यांचे आभार मानतो.

सबब, मी विद्यापीठ, विद्यापीठाच्या सर्व अधिकारी, मानव अधिकार समितीवरील सर्व सदस्य यांचे त्यांच्या सहकार्याबद्दल आणि यशस्वीरित्या कार्यक्रमाची अंमलबजाणी केल्याबद्दल आभार मानतो. सदर खंड हा डॉ. टी. एस. एन. सास्त्री, कार्यक्रमाचे समन्वयक आणि कायदा प्राध्यापक, यांनी लिहीलेल्या इंग्रजी आवृत्तीचे मराठी भाषांतर आहे. हे पहिले अनुवादीत पुस्तक असल्याने, इतर दोन खंडांचे अनुवादन विद्यार्थ्यांसाठी लवकरच केले जात आहे.

मी, विद्यापीठाच्या सर्व विद्यार्थ्यांनी भविष्याचे प्रतिनिधी या नात्याने मानव अधिकाराच्या प्रसाराचे व प्रचाराचे दायित्त्व खांद्यावर घ्यावे असे आवाहन करतो, जेणेकरून या देशाला सध्याच्या व्याधींमधून मुक्त करता येईल. या कार्यामुळे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रचिलेल्या भारतीय संविधानातील सामाजिक न्यायाचे स्वप्न साकार होईल.

**प्रा. डॉ. नितीन करमळकर**
**कुलगुरू**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

**जा. क्र. : व्हीसी/४६**
**दिनांक : २२.०१.२०१८**

# मनोगत



मानवी अधिकार हा जीवनाच्या प्रत्येक पैलूला स्पर्श करणारा न्यायशास्त्रीय दृष्ट्या विस्तार पावणारा विषय आहे. याचा अर्थ असा की कोणताही भेदभाव न करता समता व सामाजिक न्यायाचे ध्येय साध्य करण्यासाठी मानवी अधिकारांचे पालन करून त्यांचा प्रसार करणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे.

उपरोल्लेखित तत्वांचा विचार करून संयुक्त राष्ट्रसंघाने एक शाश्वत आंतरराष्ट्रीय समाज विकसित करण्यासाठी राष्ट्रांमधील सर्व घटकांना मानवी अधिकारांचे शिक्षण देण्याचा अतिशय योग्य निर्णय घेतला आहे.

ह्या संदर्भात सर्व शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये मानवी अधिकारांच्या शिक्षणाचा अंतर्भाव करण्याचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय आणि त्या दृष्टीने घेतलेला पुढाकार प्रशंसनीय आहे. ह्या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून सर्व संबंधित घटकांमध्ये मानवाधिकारांच्या संदर्भात एक आपुलकी आणि आस्था भिनविण्यासाठी सर्व पुस्तके प्रादेशिक / एतद्देशीय भाषेत म्हणजेच मराठीत भाषांतरित करण्याचा निर्णयसुद्धा योग्य दिशेने टाकलेले पाऊल म्हटले पाहिजे.

विद्यापीठाच्या स्नातकपूर्व शैक्षणिक अभ्यासक्रमात मानवाधिकार हा विषय शिकविण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याशी मी जोडला गेल्याचा मला अतिशय आनंद झाला आहे आणि हा मी माझा गौरव समजतो.

विद्यापीठाचे कुलपती म्हणून विद्यापीठाच्या अशा शैक्षणिक उपक्रमांना सतत पाठबळ देऊन तो पूर्णत्वाला नेण्यासाठी सतत प्रेरणा दिल्याबद्दल मी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल माननीय श्री. सी. विद्यासागर राव यांचा अत्यंत आभारी आहे.

मानवाधिकार शिक्षणातील मूल्यांच्या प्रसारासाठी योग्य ती उपाययोजना करण्याची प्रेरणा देणाऱ्या व सदर अभ्यासक्रमाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेल्या कुलगुरू माननीय प्रा. डॉ. नितीन करमळकर यांचा अत्यंत मी ऋणी आहे.

मानवाधिकार ह्या विषयावर इंग्रजीमध्ये पुस्तक लिहून सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सन २०११ पासून अविरत प्रयत्न करणारे प्रा. डॉ. टी. एस. एन. सास्त्री यांच्या अविरत परिश्रमांचे मी कौतुक करतो.

तसेच सदर अभ्यासक्रमाला उदार मानाने सतत पाठबळ दिल्याबद्दल मी विद्यापीठातील अन्य संबंधित पदाधिकाऱ्यांचा सुद्धा आभारी आहे.

शेवटचे पण महत्वाचे, सर्व सलग्न महाविद्यालये ह्या कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करतील अशी आशा व्यक्त करतो.

**दिनांक : ३१.०१.२०१८**

**डॉ. एन. एस. उमराणी**
**प्र–कुलगुरू**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

# ऋणनिर्देश



सदर पुस्तक विद्यापीठाच्या मानव अधिकार व कर्तव्य शिक्षण कार्यक्रमाच्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देश्याने लिहिले गेले आहे. अशा स्वरूपाचे उत्तम कार्य अनेक लोकांच्या सतत समर्थनाशिवाय पूर्ण करणे शक्य नव्हते. मी या संधीचा लाभ घेऊन त्या सर्वांचे विनम्रतेने आभार व्यक्त करतो.

महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती श्री. सी. विद्यासागर राव यांनी मानव अधिकार शिक्षणाच्या प्रसारासाठी दिलेली सर्वांगीण उत्तेजना व वचनबद्धता याबद्दल मी मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. तसेच सदर लिखाण सर्वांसमोर सादर/प्रस्तुत करण्याची परवानगी दिल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर त्यांनी मानव अधिकारांच्या आदर्शांच्या प्रसारामध्ये गहन रुची दाखविल्याबद्दल, मी त्यांचा आभारी आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सन्माननीय प्र–कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी त्यांनी दिलेले निरंतर समर्थन आणि अभ्यासक्रम तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणीमध्ये त्याच्या योगदानाबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

अभ्यासक्रम तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणीमध्ये विद्यापीठाचे सर्व प्राध्यापक आणि इतर सदस्य यांनी प्रोत्साहन दिल्याबद्दल विद्यापीठातील सर्व संबंधित मंडळांचे देखील मी आभार मानतो.

मी डॉ. डी. ए. पटेल, विभाग प्रमुख, विधी विभाग, तसेच सर्व प्राध्यापक यांनी दिलेल्या नैतिक समर्थनासाठी त्यांच्या प्रति धन्यवाद व्यक्त करतो.

मी इतर सर्व अधिकाऱ्यांचे व विद्यापिठातील अधिकारी तसेच श्री. दत्तात्रय कुटे, व्यवस्थापक, आणि विद्यापीठ मुद्रणालयातील कर्मचारी यांचे रेकॉर्ड वेळेत व योग्य काळजीने पुस्तक पूर्ण करण्यासाठी आभार मानतो.

पुस्तकाचे अनुवादक यांचे अनुवादासाठी तसेच विभागातील शैक्षणिक सहयोगी श्रीमती. माधुरी खरात यांनी विविध प्रकारे केलेल्या सहाकार्या बद्दल मी आभारी आहे.

सर्व पुस्तक, नियतकालिके/जर्नल्स, मधील विविध लेखांचे लेखक आणि विविध संस्थांच्या साहित्यांतील सल्ले आणि वाचलेली वेब पृष्ठे, यामुळे सामान्य मनुष्याच्या दृष्टिकोनातून लेखन करण्यासाठी मला प्रोत्साहन मिळाले त्यामुळे त्यांचे देखील मी आभार मानतो. पुस्तकाचा उद्देश सामान्य माणसाच्या दृष्टिकोनातून पाठ्यक्रम तयार करण्याचा असल्याने,यासाठी साधलेल्या सर्व साहित्यिक कल्पना आणि अभिव्यक्ती फक्त तत्त्वांच्या प्रसार आणि शैक्षणिक हेतूच्या दृष्टीने यामध्ये सादर करण्यात आले आहेत.

अंतिम पण महत्त्वाचे, उपलब्ध साहित्याला पुस्तकाच्या स्वरुपात परावर्तीत करताना काळजीपूर्वक वापर करण्यात आला आहे आणि हे पुस्तक प्रत्येकाला सहज समजण्याजोगे करण्यासाठी योग्य ती काळजी घेवून मसुदा तयार करण्यात आला आहे. तरी सुद्धा, कोणत्याही अवान्छित चुका राहिल्या असतील तर, मी यथोचित दिलगिरी व्यक्त करतो आणि भविष्यात सुधारणा करण्यासाठी टिप्पणी/मते व सूचना यांचे स्वागतच आहे.



**दिनांक : ३१.१.२०१८**

**डॉ. टी. एस. एन. सास्त्री**
प्राध्यापक व समन्वयक,
मानव अधिकार शिक्षण अभ्यासक्रम,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

# प्रस्तावना

हे कार्य संयुक्त राष्ट्र संघ, भारत सरकार आणि महाराष्ट्र राज्याद्वारे शिक्षणाच्या माध्यमातून मानव अधिकारांच्या उद्देश्यांची प्रसारासाठीच्या कल्पनेची एक परिणती अनुकरण आहे. विएन्ना घोषणा आणि मानव अधिकारांवरील जागतिक परिषदेच्या कार्य योजनेद्वारे, १९९३ नुसार, मानव अधिकारांचे उद्देश्य प्रामुख्याने मानव अधिकार शिक्षणाच्या माध्यमातून साध्य केले जाऊ शकते. सामाजिक सलोखा वाढवणे, सहिष्णुता आणि शांती प्रस्थापित करणे जगभरातील समुदायांमध्ये स्थिर व सामंजस्यपूर्ण मैत्रीपूर्ण संबंधांना प्रोत्साहन देणे ही काही उद्दिष्टे आहेत. या प्रतीबद्धतेला साध्य करण्यासाठी, संयुक्त राष्ट्र संघाने १९९५-२००४ हे दशक, मानव अधिकार शिक्षण दशक म्हणून घोषित करण्यात आले व नंतर वर्तमान दशक २००५-२०१४ ही करण्यात आले. अखेरीस नोव्हेंबर २०१२ मध्ये, संयुक्त राष्ट्र संघाचा आमसभेत घोषित केले की मानव अधिकार शिक्षण ही आयुष्यभरातील दीर्घ प्रक्रिया आहे जे जगभरात शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर दिले जाईल. यानुसार, राष्ट्रीय स्तरावर राज्यांद्वारे याच्या अंमलबजावणीसाठी एक कृती योजना तयार करण्यात आली आहे. भारत सरकारने १९६८ ला, स्वतः पहिल्या शिक्षण धोरणाचे समान उद्देश्य घोषित केले. महाराष्ट्र राज्य कदाचित शालेय अभ्यासक्रमात एका छोट्या पद्धतीने मानव अधिकारांचे शिक्षण देणारे देशातील पहिले राज्य आहे. या प्रयत्नांनी पूर्णपणे इच्छित परिणाम साध्य न केल्याने सावित्रीबाईफुले पुणे विद्यापीठाने राष्ट्र तसेच राज्याच्या प्रति आपल्या सेवेचे योगदान देण्यासाठी ही जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली आहे. प्रस्तुत कार्य हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी मानव अधिकार शिक्षण परियोजना अंतर्गत येणाऱ्या पुस्तकांच्या श्रृंखलेचाच एक भाग आहे.

# घटक – १ मूलभूत संकल्पना

हा घटक मूल्यांची मूलभूत संकल्पना आणि त्यांचा मानव अधिकारांशी असलेला संबंध याची ओळख थोडक्यात करून देणार आहे. कोणत्याही समाजात मानव अधिकारांच्या वाढीसाठी आणि परिपूर्तीसाठी हा संकल्पनात्मक दृष्टिकोन एक लक्षणीय भूमिका निभावतो. कोणतीही कायदेशीर कारवाई किंवा कृती स्पष्ट करण्यासाठी आणि समाजाच्या विकासात मूल्ये खूप महत्त्वाची भूमिका पार पाडतात. या प्रत्येक मूल्याचे पूर्ण निष्ठेने पालन केल्याने केवळ मानव अधिकारांच्या प्राप्तीसाठी मदत होईल असे नाही, तर आंतरराष्ट्रीय कायद्याअंतर्गत संकल्पित एक विश्वाची संकल्पना प्रस्थापित करणेही शक्य होईल. हा घटक सैद्धांतिक दृष्टिकोनावर अधिक वादविवाद व चर्चा न करता प्रत्येक मूल्याचा अर्थ स्पष्ट करण्यावर केंद्रित केलेला आहे. हा घटक मानव अधिकार शिक्षणाचे महत्त्व थोडक्यात स्पष्ट करतो. तथापि, यातील काही संकल्पनांची सविस्तर माहिती घटक २ मध्ये अधिकारांचे मूळ व संकल्पना तपशीलतेने विषद करताना दिलेली आहे.

## मूल्यांचे महत्त्व

मूल्य सामान्यतः तत्त्वज्ञानाचा एक भाग आहे. मानवजातीच्या मूलभूत समस्यांशी संबंधित विषयांपैकी तत्त्वज्ञान एक विषय आहे. तत्त्वज्ञान हे अस्तित्त्व, ज्ञान, मूल्ये, कारणे, मन आणि भाषा यासारख्या मुद्द्यांशी संबंधित असते. तत्त्वज्ञानाचा सैद्धांतिक दृष्टिकोन विविध तत्त्ववेत्यांनी मुख्यत्त्वे आलोचनात्मक दृष्टीसह तर्कसंगत दृष्टिकोनाच्या आधारे विकसित केला आहे. मूल्यांच्या मापदंडाच्या आधारे, इतर अनेक पैलू मनुष्याच्या वागण्याच्या पद्धतींचे आकृतिबंध करण्यासाठी विकसित करण्यात आले आहेत. प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समानता, न्याय, नीतीमूल्ये आणि नैतिकता इत्यादी मूल्यांनी समाजात मानवीय संबंधांना आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. या तत्त्वज्ञानाच्या संकल्पनांचा एक सखोल परिणाम कायद्यावर झाला आहे.

कोणत्याही समाजामध्ये व्यक्तींमधील संबंधांचे नियमन करणे आणि एक संघर्षमुक्त समाजाची स्थापना करण्यासाठी संघर्षाची तीव्रता कमी करणे, शांती, सुरक्षा आणि मानवजातीचे चांगले व सुव्यवस्थित व्यवहाराचे नियमन करणे हे कायद्याचे प्रमुख लक्ष्य आणि कार्य आहे. या मुख्य कार्यामुळे कायदा एका विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून प्रत्येक अध्ययन क्षेत्रातील सर्व आवश्यक साधनांचा समावेश करतो. यामुळे प्रत्येक मुद्द्याचे विश्लेषण करण्यात आणि व्यक्तींचे एकमेकांशी त्यांच्या आंतर-संबंधांत कमाल परिणाम प्राप्त करण्यासाठी, एक तर्कसंगत मानवी मन विकसित करण्यास मदत होते. अधिकाराची संकल्पना आणि अधिकारांचा वापर व नियमन हे प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत विकसित

करण्यात आलेल्या अनेक मूल्यांच्या जवळपास केंद्रित असल्याने, मूल्यांचा मानव अधिकारांची पूर्तता/प्रोत्साहन आणि संरक्षणावर लक्षणीय प्रभाव पडला आहे. मूल्ये मानव अधिकारांच्या प्रसिद्धी आणि परिपूर्तीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात आणि त्यांच्यातील संबंध लक्षात घेता, मूल्यांच्या विविध संकल्पनांचे परीक्षण सदर घटकात थोडक्यात करण्यात आलेले आहे.

## मानवी मूल्ये

''मूल्यांची संकल्पना...... मानवी वर्तनाशी संबंधित सर्व शास्रांच्या विविध हितांना / परिणामांना एकत्रित करण्यास सक्षम आहे.''..........रोकेच यांचे मत.

मनोवैज्ञानिकाचे वरील मत, मूल्यांची संकल्पना आणि समाजातील व्यक्तींच्या वर्तनपद्धती यामध्ये असलेले संबंध स्पष्ट करते. सामान्यतः प्रत्येक दिवशी आपण आपल्याद्वारे सामान्यपणे अनुसरण करण्यात येत असलेल्या मूल्यांचा विचार करतो. व्यक्तींच्या परिस्थिती आणि अनुभवाच्या आधारे मूल्ये व्यक्तीपरत्त्वे बदलत असतात. तथापि, जीवन, व्यक्तिगत स्वातंत्र्य, सुरक्षितता, स्वतंत्रता, सफलता, जीवनाची सुरक्षा, दु:ख आणि सुख ही काही मूलभूत मूल्ये सर्वांसाठी समान आहेत. प्रत्येक व्यक्ती ज्या परिस्थितींमध्ये वाढते, त्यानुसार तिच्यासाठी कोणती मूल्ये महत्त्वाची आहेत हे ती व्यक्ती ठरवते. पण सर्वांसाठी समान असणाऱ्या मूल्यांचे पालन, दीर्घकाळासाठी, समाजातील सर्व वर्गांच्या सर्वांगीण विकासासाठी शांती स्थापित करणाऱ्या समाजाचा विकास करते. हे विविधतेत एकता असताना जीवन कसे जगायचे हे शिकण्यास मदत करेल.

अनेक विद्वानांच्या म्हणण्यानुसार, मूल्ये ही कल्पना, प्रत्येक व्यक्तीद्वारे सापेक्षतेने अमलात आणल्या जाणाऱ्या समजुती/श्रद्धा आहेत. लोकांना त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी मूल्ये प्रेरित करतात. मूल्ये कालातीत व देशातीत जाऊन संबंध विकसित करतात व व्यक्तींच्या वर्तन पद्धतींचे नियमन करतात.

मूल्यांचे हे केंद्रीभूत पैलू असल्याने, विद्वानांनी दहा मूलभूत मूल्ये निश्चित केली आहेत, ही मूल्ये मनुष्याला त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी, मानवी वर्तनाला प्रेरित व नियमित करतात. ही मूल्ये पुढीलप्रमाणे आहेत:

- आत्म-विनाश : स्वतंत्र विचारास प्रोत्साहन देते, जे ध्येयाच्या तयारीत किंवा अन्वेषणात एक विवेकपूर्ण निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत परिणाम करते.
- उत्तेजना : आयुष्यात उत्साह, नाविन्य आणि आव्हाने निर्माण करते.

- सुखवाद : (सुख हेच अंतिम उद्दिष्ट असा सिद्धांत, आत्म संतुष्टी) स्वतःसाठी सुख आणि ज्ञानेंद्रियांना सुखद वाटणारी संतुष्टी आणते.
- संपादन : समाजातील मानकांनुसार व्यक्तींची क्षमता दर्शवते.
- सत्ता : सामाजिक स्थिती आणि प्रतिष्ठा आणते व लोक आणि संसाधनांवर नियंत्रण ठेवते.
- सुरक्षा : लोकांमध्ये सामंजस्यपूर्ण संबंध आणते, जे लोकांसाठी सुयोग्य वातावरण प्रस्थापित करते, जेणेकरून त्यांना एक सुखी आयुष्य जगता येईल आणि स्वातंत्र्याचे जतन करता येईल यासाठी समाजाला मार्गदर्शन करते.
- अनुरूपता किंवा जुळवून घेणे : सामाजिक मानकांशी जुळवणूक प्रामुख्याने व्यक्तींचे वर्तन नियंत्रित करते आणि स्वतःच्या प्रति व समाजात एक दुसऱ्यांच्या प्रति केल्या जाणाऱ्या चुकीच्या कृतींना प्रतिबंधित करते.
- परंपरा : समाजातील अंगभूत प्रथांचा आदर करण्याचा गुण विकसीत करते.
- धर्म : शांती आणि सुरक्षा स्थापित करण्यासाठी ज्ञानाच्या नाविन्यपूर्णतेला आणि मूल्यांच्या उन्नतीला प्रोत्साहन देतो. हा ज्ञानाच्या प्रचाराच्या माध्यमातून साध्य झालेला लाभ स्वखुशीने वाटून घेणे शिकवितो.
- परोपकार : विश्वास स्थापित करतो आणि अशा व्यक्तींच्या हितसंबंधांना प्रोत्साहित करतो, ज्यांच्याशी ती व्यक्ती दैनंदिन व्यवहारात परस्परांशी संवाद साधते.

शेवटी, सर्वहितवाद किंवा सार्वभौमत्त्व, समजुतदारपणा, कृतज्ञता, सहिष्णुता या गुणांना प्रोत्साहन देत लोकांच्या कल्याणास संरक्षण प्रदान करते. हे सुसंगत जगणे विकसित करण्याची, आणि वैज्ञानिक ज्ञानाच्या बढतीच्या फायद्यासाठी कार्य करण्याची आणि संसाधनांच्या समान सामायिकिकरणाची काळजी घेते.

मानव अधिकारांचे तत्त्वज्ञान वरील मूल्यांसारखे आहे. त्यामुळेच, मूल्ये ही मानव अधिकारांच्या मूलभूत घटकांपैकी एक आहेत. मानव अधिकारांचे काटेकोर पालन केवळ मूल्यांना पुनर्स्थापित करत नाहीत, तर लोकांमध्ये व राष्ट्रांमध्ये अस्तित्वात असणारे कोणत्याही प्रकारचे भेदभाव न बाळगता शांतता, सुरक्षा आणि एक सामंजस्याने समाज साध्य करण्यासाठी सक्षम बनवतात.

## प्रतिष्ठा

व्यक्तींचे वर्तन नियमित करणारे आणखी एक मूल्य म्हणजे 'प्रतिष्ठा' होय. प्रतिष्ठा ही सापेक्ष स्वरूपाची एक तुलनात्मक संज्ञा आहे, ज्या मानदंडांचे व नीती मानकांचे अनुसरण करणे व स्वीकार करणे आवश्यक आहे त्यांचे निर्धारण प्रतिष्ठा करते.

दैनंदिन व्यवहारात, लोकांकडून एकमेकांशी प्रतिष्ठित व प्रामाणिक रितीने वागणे अपेक्षित आहे. प्रतिष्ठा ही संकल्पना आपल्याला इतर व्यक्तींच्या क्षमतांना कमी न लेखता योग्य खबरदारी व काळजीने कार्य करण्यासाठी प्रवृत्त करते. याशिवाय, ज्यामुळे इतरांना भावनिक, मानसिक, शारीरिक, तणावपूर्ण स्थिती सहन करावी लागेल किंवा त्यांच्या व्यक्तिमत्त्वास इजा होईल अशी परिस्थिती निर्माण न करण्यास शिकवते.

मानवी संबंधांना नियंत्रित करण्यात व मानव अधिकारांच्या विकासात (विशेषतः जीवनाचे, स्वातंत्र्याचे आणि समानतेचे मूलभूत अधिकार) प्रतिष्ठा एक महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने, मानव अधिकाराच्या वैश्विक घोषणापत्राने सर्व व्यक्ती कायद्यासमोर समान आहेत असे स्पष्टपणे जाहीर केले आहे. इतर व्यक्तींच्या प्रतिष्ठेस हानी न पोहचविता सर्वजण सतत जास्तीत जास्त सन्मानास किंवा आदरास पात्र आहेत. जगभरात लोकांनी जर कोणत्याही विचलनाशिवाय प्रतिष्ठेच्या नैतिक प्रमाणांचे पालन केले तर अधिकारांची प्राप्ती सोपी होईल. हे मूलभूत निकष कठोर निष्ठेने पालन करणे, व्यक्ती व राष्ट्रांवर बंधनकारक आहे. तरीही मानव अधिकारांच्या उन्नतीसाठी आधुनिक संदर्भात अनेक नियमावली, करार आणि घोषणा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठेच्या संकल्पनेवर स्वीकारण्यात आले आहेत. व्यक्ती आणि राष्ट्रांमध्ये असलेल्या निष्ठेच्या अभावाने मानवजातीला अगणित दु:ख आणि संकटांना सामोरे जावे लागत आहे. समकालीन कालखंडात नीतीमूल्यांशी निष्ठा न बाळगता, विशेषतः काही वेळा व्यक्तींच्या असभ्य वर्तनामुळे अनेक समस्या उत्पन्न होतात. त्याचे परिणाम मानव अधिकारांच्या विकास व परिपूर्तीवर होत आहेत.

## स्वातंत्र्य

मानव अधिकाराच्या विकास व प्रसारामध्ये स्वातंत्र्य ही संकल्पना महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. स्वातंत्र्य ही एक प्राचीन संकल्पना आहे. या संकल्पनेचे मूळ हे राजकीय तत्त्वज्ञानामध्ये आहे. होब्ज, लॉक, रुसो आणि अनेक तत्त्ववेत्त्यांनी स्वातंत्र्य या संकल्पनेला वेगवेगळ्या संदर्भात व्यक्त केले आहे. सोप्या भाषेत, मनुष्याला स्वत:चे संबंध नियंत्रित करण्यास बंधन नाही आणि त्यांचे संबंध शासित

करण्यास तो सक्षम आहे, त्यांच्या इच्छेप्रमाणे वागण्यास आणि स्वत:च्या कृत्यांसाठी जबाबदार आहे म्हणजे स्वातंत्र्य होय. स्वातंत्र्याची संकल्पना जबाबदारी व कर्तव्य यांच्या सभोवताली केंद्रित आहे. व्यक्तींद्वारे केलेल्या कृत्यांच्या आधारावर, स्वातंत्र्य उपभोगता किंवा मिळविता येते. जर कृत्ये वाईट किंवा कुणालाही नुकसान पोहचविण्याच्या उद्देशाने केली असतील किंवा त्यांना त्यांच्या कायदेशीर अधिकारापासून वंचित केले, तर त्याचे दीर्घकालीन दुष्परिणाम केवळ दुसऱ्यांच्या अधिकारावर होतील असे नाही तर स्वतःच्या अधिकारांवर देखील होतील. परिणामतः याचा प्रभाव त्यांच्या अधिकारांच्या प्राप्तीवर होईल.

स्वातंत्र्याच्या संकल्पनेने अधिकारांना आधार दिला आहे. होब्ज यांच्या मते, ''प्रत्येक व्यक्तीला इतर कोणत्याही व्यक्तीच्या हस्तक्षेपाविना त्यांचे स्वातंत्र्य मुक्तपणे उपभोगण्याचा अधिकार आहे.'' त्यांच्या सामाजिक करार सिद्धांतामध्ये त्यांनी असा दावा केला आहे की, संबंधांचे नियमन करणारी आणि व्यक्तींचे स्वातंत्र्य प्रतिबंधित करणारी राजांची दिव्य शक्ती ही व्यक्तींच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या विरुद्ध आहे. विभिन्न राजकीय आणि कायदेविषयक तत्त्ववेत्त्यांच्या स्वातंत्र्याच्या प्रसाराने व प्रबोधनाने, जगभरात अनेक राजकीय क्रांतींचे नेतृत्त्व केले आहे. ज्यामुळे नेतृत्त्व निवडीच्या व्यक्तींच्या स्वातंत्र्याच्या आधारावर लोकशाही समाज निर्मिमती करण्यास मदत झाली.



समकालीन युगामध्ये, व्यक्तिगत स्वातंत्र्यासाठीच्या अत्याधिक युक्तिवादाने आणि व्यक्तींद्वारे त्यांच्या असंख्य कृत्यांमध्ये कर्तव्यांचे पालन निष्ठेने न करता स्वातंत्र्याच्या स्वैर वापराने, पुन्हा जगामध्ये संकटांना, समस्यांना चालना दिली आहे. समस्या सोडविण्यासाठी आणि समस्यामुक्त जग निर्माण करण्यासाठी, संयुक्त राष्ट्राने मानव अधिकारांच्या उन्नती अनेक कायदेशीर पावले उचलली आहेत. संयुक्त राष्ट्राच्या या कार्याचा उद्देश मानवजातीच्या आचरणाचे नियमन करणे आणि त्यांना नीतीमूल्ये व नैतिक मूल्यांच्या उन्नतीसाठी व कर्तव्यांचे पालन करण्यासाठी मार्गदर्शन करणे हा आहे. यामुळे खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य पुनर्संचयित करता येईल आणि व्यक्तींना त्यांच्या कायदेशीर व न्याय्यिक कार्यासाठी आनंदी होण्यात मदत मिळेल.

या व्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय कायदा आणि मानव अधिकारांचे पालन करणे आणि इतर राष्ट्रांच्या व त्यांच्या नागरिकांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा सन्मान करणे हे देशाचे व तसेच प्रत्येक

राज्याचे कर्तव्य आहे. केवळ स्वातंत्र्याच्या कठोर पालनाने आणि स्व-संयमाच्या सरावानेच कायद्याने सुनिश्चित केलेले प्रत्येक नागरिकाचे अधिकार रक्षण करण्यात अपेक्षित परिणाम साध्य होतील.

## समता

'समता' हा मानव अधिकाराचा एक महत्त्वाचा घटक आहे. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत, लोक प्रत्येक स्थितीमध्ये याच्या व्यावहारिक वापराच्या दृष्टीने या उद्दिष्टाला साध्य करण्यासाठी लढा देत आहेत. साधारणतः, समता या संकल्पनेत, सर्व लोकांना एकाच प्रवर्गात आणण्याचे आणि व्यक्तींमध्ये कोणत्याही प्रकारचे असणारे भेदभाव न करता कायद्याचे तत्त्व आणि न्याय लागू करण्याचे विचार आहेत. समता ही एक सापेक्ष संकल्पना आहे, ज्याला अनेक घटकांच्या आणि समान पातळीवरील अधिकारांच्या वापराच्या आधारे ओळखले जाऊ शकते. मानव अधिकाराच्या वैश्विक घोषणापत्राचे आणि भारतासह इतर राष्ट्रांच्या संविधानांचा मुख्य उद्देश, कोणत्याही प्रकारचे भेदभाव न करता सर्व लोकांना समानतेची वागणूक देणे हा आहे. याला 'औपचारिक समता' असे म्हटले जाऊ शकते. ज्यामध्ये कायद्यासमोर सर्व समान आहेत.

जरी, सर्व लोक कायद्यासमोर समान मानले जात असले, तरी संसाधनांच्या सुविधा किंवा वितरण प्रदान करण्यामध्ये, प्रत्यक्षात सर्वांना समान गृहित धरले जाऊ शकत नाही. याचे कारण प्रत्येक समाजात प्रचलित सामाजिक, आर्थिक, राजनैतिक आणि सांस्कृतिक परिस्थिती आहे. वरील निर्दिष्टीत कोणत्याही कारणास्तव समानता प्राप्त नसलेल्या व्यक्तींचा विकास करण्यासाठी, त्यांच्या स्थितीमध्ये सुधार करण्यासाठी आणि त्यांना उच्च दर्जा असलेल्या दुसऱ्या व्यक्तींच्या समक्ष आणण्यासाठी, त्यांना काही सुविधा आणि सवलती देणे गरजेचे आहे.



समतेची पराकाष्ठा साध्य करण्यासाठी आणि विशेषतः सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक कारणास्तव असलेले अंतर भरून काढण्यासाठी, मानव अधिकाराच्या आंतरराष्ट्रीय कायद्याची तत्त्वे, राष्ट्रीय स्तरावर लोकांसाठी राष्ट्राद्वारे आवश्यक सवलतींची तरतुद प्रदान करतात. याचा परिणाम कायद्यासमोर सर्वांना समान दर्जा साध्य करण्यावर

होईल. एकदा सर्व बाबतीत समान दर्जा प्राप्त करणे साध्य झाले तर, लोकांच्या विशिष्ट गटाची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांना देण्यात आलेल्या सवलती राष्ट्राद्वारे काढून घेतल्या जाऊ शकतात. हे समान तत्त्व आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व राष्ट्रांनाही लागू होते. यानुसार, विकसित राष्ट्रांनी विकासशील राष्ट्रांना सवलती देणे आवश्यक आहे.

## न्याय

सोप्या भाषेत न्यायाची प्रामाणिकपणा, नि:पक्षता आणि न्याय्य व समान वागणूक देणे, अशी व्याख्या केली जाऊ शकते. न्याय ही एक महत्त्वाची संकल्पना आहे, ज्याने अनेक क्षेत्रांना विशेषतः कायदा आणि तत्त्वज्ञान क्षेत्राला आकर्षित केले आहे. परिपूर्ण न्याय साध्य करण्यासाठी, विद्वानांनी अनेक घटक विहित केले आहेत. प्रत्येक समाजाच्या संबंधित विविध घटकांच्या आधारे आणि असमान व समान व्यक्तींमधील अंतर भरून काढण्यासाठी, प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत, अनेक विद्वानांनी न्याय संकल्पना साध्य करण्यासाठी विविध सिद्धांत प्रतिपादित केले आहेत. न्यायाच्या संकल्पनेचे मूल्यांकन करण्यासाठी अनेक साधनांची गरज आहे. हे परिपूर्ण न्याय साध्य करण्यासाठी समता, सदाचरण आणि नीतीमूल्यांच्या संकल्पनांवर भर देते. मानव अधिकारांचा उद्देश राष्ट्राद्वारे प्रत्येकाला अशी स्थिर स्थिती प्रदान करणे आहे, जी केवळ एका न्यायनीतीने अधिकार साध्य करण्यासाठी मदत करेल. प्लेटो यांचे मतानुसार, न्याय हे सर्वोच्च मूल्य असल्याने आणि ते साध्य करण्यासाठी, एका व्यक्तीला अधिकार प्राप्त करण्यासाठी व त्याचे समाजाप्रति असलेले कर्तव्य पार पाडण्यासाठी सर्व आवश्यक स्थिती निर्माण करणे गरजेचे आहे. न्याय कर्तव्यांच्या प्रति समर्पण आणि अन्य मूल्यांच्या प्रति सन्मानासह प्रत्येक जबाबदारीचे पालन करण्यासाठी राष्ट्रांवर आणि अन्य निर्वाहकांवर भर देतो.



## नीतीतत्त्वे आणि नैतिकता

नीतीतत्त्वे अणि नैतिकता या समान संकल्पना मानल्या जातात. तथापि, या दोन्हीमध्ये एक सूक्ष्म फरक आहे. नैतिकता एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिगत चारित्र्याशी संबंधित असते. दुसरीकडे, नीतीतत्त्वे अशा सामाजिक व्यवस्थेला महत्त्व देतात, जे एखाद्या व्यक्तींच्या समूहाच्या आचारसंहिता नियंत्रित

करतात. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर, नैतिकतेचे मूल्य प्रत्येक समाजात समाजाद्वारे स्वीकृत मूल्यांच्या आधारे लागू करणे आवश्यक आहे. मानव अधिकारांच्या दृष्टीने, स्वतंत्रता आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याची संकल्पना मूलभूत तत्त्वे असल्याने ते नैतिक मूल्यांचे देखील भाग आहेत. न्याय, समता या संकल्पना आणि व्यक्तींचा समाजाच्या सामाजिक-सांस्कृतिक गोष्टींमधील सहभाग हे नैतिक पैलू आहेत. त्यानुसार, समाजातील प्रत्येक व्यक्ती नेहमी मानव अधिकारांना समाजाच्या नैतिक किंवा नीती विषयक स्वरूपामध्ये प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्यास जबाबदार आहे.

'मूल्य' हा नीतीतत्त्वांचा मुख्य विषय आहे. नीतीतत्त्वे ही समाजामध्ये मानवी आचरणाचे मानक विज्ञान आहेत, जी चूक आणि बरोबर, चांगले आणि वाईट, योग्य आणि अयोग्य यामध्ये फरक करतात. तसेच, एखाद्यास वाईट पासून चांगले आणि बरोबर पासून चूक यामध्ये फरक करण्यास मदत करतात. मानव अधिकारांच्या संदर्भात नीतीतत्त्वे एक आवश्यक पूर्वस्थिती म्हणून स्वातंत्र्याला गृहीत धरतात. एक स्वतंत्र व्यक्ती त्याच्या कार्याचे निर्णय स्वतः घेऊ शकतो आणि अशा निर्णयाचे चांगले किंवा वाईट, चुकीचे किंवा बरोबर, योग्य किंवा अयोग्य म्हणून मूल्यमापन करता येते. चांगुलपणा हे एक उच्च मूल्य आहे. चांगुलपणा हा वस्तुनिष्ठ, सार्वत्रिक आणि तर्कसंगत आहे. धैर्य, सहिष्णुता, परोपकारबुध्दी, दयाळूपणा आणि मैत्री ही काही मूलभूत मूल्ये आहेत. मूल्ये सहाय्यक किंवा परिपूर्ण, अंगभूत किंवा बाह्य असतात.

एखादी कृती चांगली आहे का? की कसे हे ठरविण्यासाठी मूल्ये निकष प्रदान करतात. स्वतंत्रता, कर्तव्य, अधिकार, जबाबदारी, आनंद आणि चांगुलपणा किंवा उपकारबुद्धी हे नैतिक तत्त्वज्ञानाचे मूलभूत घटक आहेत. मूल्ये सामान्य आणि सामाजिक संमती किंवा मान्यतेवर अवलंबून आहेत. त्यांचा वापर समाजामध्ये सर्वांद्वारे केला जातो.

विविध संकल्पनांची वरील संक्षिप्त चर्चा स्पष्ट दर्शवते की, जोपर्यंत आपण सर्व संयुक्त राष्ट्राचे लोक (ज्यामध्ये राष्ट्र-राज्यही समाविष्टीत आहेत) आपल्या जबाबदारींचे पालन/निर्वहन प्रामाणिकपणे करणार नाही, तोपर्यंत मानव अधिकार संपूर्णपणे प्राप्त करता येणार नाही . हे आपल्याला, कोणत्याही प्रकारच्या भेद, जसे वंश, लिंग, भाषा, धर्म, प्रदेश इत्यादी शिवाय मानव अधिकारांचे जागतिकीकरण साध्य करण्यास सक्षम करते. एका वैविध्यपूर्ण जगामध्ये, विविधतेत एकता ही संकल्पना पूर्वीच्या काळापेक्षा अधिक महत्त्वाची झाली आहे अशा विशेषतः समकालीन युगामधील जागतिकीकरणाच्या चौथ्या टप्प्यात कसे जगायचे याची शिकवण यामुळे मिळते.

## विविधतेत एकता



विविध पार्श्वभूमीच्या लोकांचे त्यांच्या सामाजिक-आर्थिक, राजकीय-सांस्कृतिक दृष्टिकोनाच्या आधारे, एकाच कुटुंबासारखे जगणे असा विविधतेत एकता याचा सामान्य अर्थ आहे. याचा अर्थ असा की, विविध धर्म आणि वर्ण असणाऱ्या लोकांना राष्ट्राद्वारे व्यवस्थापित एकाच कायदेशीर छताखाली सुसंगत रितीने जगणे आवश्यक आहे. हे जगभरातील लोकांना लागू आहे, आणि राष्ट्र-राज्यांना एकच समाज म्हणून राहाणे आवश्यक आहे. एकसंघ जग ही संकल्पना प्रस्थापित करणे हा आंतरराष्ट्रीय कायद्याचा मुख्य उद्देश असल्यामुळे मानव अधिकारांची निर्मिती झाली. सर्व लोकांसाठी आणि राष्ट्रांसाठी मानदंडाचे एक सामान्य मानक स्थापित करून, सखोल विभागलेल्या माणूसकीच्या महत्त्वाकांक्षा साध्य करणे हा याचा उद्देश आहे. एक जग ही संकल्पना पूर्णत्त्वास नेण्यासाठी, सामंजस्याने राहायला शिकणे ही मानवजातीची जबाबदारी आहे. तसेच, हे आपल्याला अन्य राजकीय व्यवस्थेत राहाणाऱ्या लोकांच्या अधिकारांना काळजीपूर्वक वृद्धींगत करण्यासाठी मूलभूत तत्त्वे, जीवन, स्वातंत्र्य, समता, प्रतिष्ठा आणि विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य साध्य करण्यासाठी सक्षम करेल. जे बदल्यात, आपल्याला कायदेशीर पद्धतीने मानव अधिकारांद्वारे विस्तारित संरक्षणाचा दावा करण्यासाठी सक्षम करेल आणि विभिन्न राजकीय प्रदेशात जगणाऱ्या माणसाच्या माणूस म्हणून अस्तित्त्वाचे समर्थन करते. पुढे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्याला भेडसावणाऱ्या असंख्य समस्या दूर करण्याच्या संयुक्त राष्ट्र संघाच्या मूलभूत ध्येयाला साध्य करण्यास मदत करेल. भारतीय संदर्भात 'वसुधैव कुटुंबकम्' या संकल्पनेने, मूल्ये आणि नैतिकतेसह मानवजातीने एकत्रित जगण्याच्या समान विचारधारेचे समर्थन केले आहे, जे शेवटी एक संघर्षमुक्त समाज स्थापित करेल.

## मानव अधिकार शिक्षणाचा अर्थ आणि महत्त्व

शांत व सुरक्षित जीवन जगण्यासाठी आणि मानवी प्रतिष्ठेप्रति आदरासाठी, संपूर्णपणे शांती, अभेदभाव, समता, न्याय, अहिंसा, सहिष्णुता सारख्या मूल्यांचा शिक्षणात समावेश करायला हवा. ही उद्दिष्टे केवळ मानव अधिकारांच्या शिक्षणाद्वारे साध्य करता येतील. मानव अधिकार शिक्षण हे

शिक्षणाच्या अधिकाराचे एक अविभाज्य अंग आहे. मानव अधिकार शिक्षण आणि कर्तव्याचे शिक्षण हे प्रत्येक समाजात सर्वसमावेषक विकास साध्य करण्यात मदत करते.

संयुक्त राष्ट्रांच्या मानव अधिकार शिक्षण दशक (१९९५-२००४) या दस्तऐवजानुसार, मानव अधिकार शिक्षण म्हणजे, एक आजीवन प्रक्रिया आहे ज्याद्वारे लोक विकासाच्या सर्व स्तरावर आणि समाजाच्या सर्व वर्गामध्ये दुसऱ्यांच्या प्रतिष्ठेचा सन्मान करणे आणि ते सन्मान सर्व समाजांमध्ये सुनिश्चित करण्यासाठीचे साधन आणि पद्धती शिकतात.

वरील व्याख्या हे स्पष्ट करते की, कोणत्याही समाजात राहाणाऱ्या व्यक्तीने कोणत्याही भेदाशिवाय सतत अधिक प्रामाणिकपणे त्यांच्या कर्तव्यांचे पालन केलेच पाहिजे. यामुळे सर्वांच्या स्वातंत्र्याला उत्तेजन मिळेल आणि मानव अधिकार शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समाजाचे स्वरूप बदलणे शक्य होईल. मानव अधिकार शिक्षणाचा परिणाम, लोकशाहीचे सिद्धांत, कायद्याचे शासन आणि सामाजिक न्याय साध्य करण्यावर होईल. शिवाय, शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी याची मदत होईल. मानव अधिकार शिक्षण आपल्याला एक टिकाऊ सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्थिरता साध्य करण्यास सक्षम बनवते.

## मानव अधिकार शिक्षणाचे उद्देश

**मानव अधिकार शिक्षणाचे उद्देश पुढीलप्रमाणे:**

- सर्व लोकांच्या मानव अधिकारांप्रति आदरास प्रोत्साहन देणे.
- ज्ञान, कौशल्य आणि मानव अधिकारांची मूल्ये विकसित करणे.
- सामाजिक-मानसिक व मानवी व्यक्तिमत्त्व विकसित करणे.
- प्रत्येक देशाच्या समस्या आणि आंतरराष्ट्रीय समुदायाच्या समस्यांवर मात करण्यासाठी लोकांना आणि धोरण निर्मात्यांना मार्ग व साधन विकसित करण्यासाठी मदत करणे.
- सलोखा, सहिष्णुता व स्त्री-पुरुष समानता वाढविण्यास मदत करणे.
- सर्व राष्ट्रांमध्ये मैत्री विकसित करणे आणि वांशिक, पारंपारिक, धार्मिक व भाषिक भेद नष्ट करणे.

वरील मानव अधिकार शिक्षणाच्या मूल्यांना रुजविण्यासाठी अनेक प्रतिमाने विकसित करण्यात आली आहेत. विविध प्रतिमानांपैकी, खालील तीन प्रतिमाने मानव अधिकारांची उद्दिष्टे व ध्येये साध्य करण्यासाठी महत्त्वपूर्ण मानली जातात.

१. मूल्ये आणि जागरूकतेचे प्रतिमान: हे प्रतिमान मानव अधिकारांचे मूलभूत ज्ञान हस्तांतरित करण्यावर आणि शैक्षणिक संस्थांच्या पाठ्यक्रमाच्या माध्यमातून सार्वजनिक मूल्यांमध्ये एकीकरणास प्रोत्साहित करण्यावर लक्ष केंद्रित करते.

२. उत्तरदायित्त्वाचे/जबाबदारीचे प्रतिमान: हे प्रतिमान मानव अधिकार उल्लंघनाचे निरीक्षण करण्यावर आणि लोकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यासाठी ज्या मार्गांचे अवलंबन करावयाचे आहे, त्या व्यावसायिक जबाबदाऱ्यांवर लक्ष केंद्रित करते.

३. रूपांतरित प्रतिमान: या प्रतिमानाचा उद्देश मानव अधिकारांचे दुरूपयोग ओळखण्यासाठी आणि ते प्रतिबंधित करण्याच्या दिशेने लोकांना सशक्त करण्याचा आहे.

मानव अधिकार शिक्षणाची मूळ संकल्पना असल्याने, संयुक्त राष्ट्र संघाने, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विविध पद्धती व तंत्रे यांच्या माध्यमातून मानव अधिकाराचा प्रसार करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे योजिली आहेत.

## सारांश

- 'मूल्ये' ही जीवनाची महत्त्वपूर्ण पैलू असल्याने ती कायदा व समाजाचे एक भाग झाली आहेत, त्यानुसार कायदा आणि समाजाच्या एक घटकांची रचना तयार केली आहे. मूल्ये ही एक मध्यवर्ती संकल्पना/सूची/बिंदू असल्याने ती व्यक्तीमधील संबंध नियंत्रित करतात. विद्वानांनी असे अनेक बिंदू मान्य केले आहेत. या बिंदूंचे पालन करून, एखादी व्यक्ती जीवनातील त्याचे ध्येय साध्य करू शकेल.
- 'प्रतिष्ठा' आणखी एक महत्त्वाचे मूल्य असून ती व्यक्तींच्या वर्तनाचे नियमन करते. मानवी संबंध व मानव अधिकारांचे उपयोजन हे प्रतिष्ठेवर अवलंबून असून हे व्यक्तिगत स्वातंत्र्य, समता आणि स्वतंत्रता या मूलभूत अधिकारांचे सर्वात महत्त्वाचे पैलू आहेत. संपूर्ण मानव अधिकार कायदा या पैलूंच्या आधारे विकसित करण्यात आला आहे.
- 'व्यक्तिगत स्वातंत्र्य' ही देखील एक महत्त्वाची संकल्पना आहे. अनेक विद्वानांच्या मते, केवळ कर्तव्य हेच व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे रक्षण करते. ही अशी संकल्पना आहे ज्याने अधिकारांना एक आधार प्राप्त करून दिला आहे. पण जर या स्वातंत्र्याचा उपयोग व्यवस्थितरित्या केला नाही, तर त्याचे परिणाम अधिकारांशी संबंधित समस्या निर्माण होण्यास होतील.

- समता हा मानव अधिकारांचा एक महत्त्वाचा घटक आहे. समता सर्व लोकांना एकाच वर्गवारीत आणण्यास प्रस्तावित करते. कोणत्याही प्रकारे असमानता अस्तित्त्वात असल्यास, ती एका कायदेशीर यंत्रणेच्या माध्यमातून दूर करण्याची जबाबदारी राष्ट्राची आहे. याचा परिणाम एक वर्गहीन/वर्गविरहीत समाज निर्माण करण्यावर होईल.
- प्रत्येक व्यक्तीला न्याय देणे हा मानव अधिकारांचा उद्देश आहे. योग्य न्याय मिळविण्यासाठी, मानवजातीच्या सर्व गुणांचे आणि मूल्यांचे अनुसरण, प्रत्येक व्यक्तींद्वारे न्यायाची वास्तविक संकल्पना साध्य करण्यासाठी आवश्यक आहे.
- नीतीमूल्ये व्यक्तीच्या व्यक्तिगत चारित्र्याशी संबंधित आहेत. नैतिकता ही सामाजिक व्यवस्थेवर भर देते. नीतीमूल्यांचे काटेकोर पालन केल्यानेच एक स्वस्थ समाज स्थापित होईल, जो समाज लोकांना त्यांचे मानव अधिकार साध्य करण्यात मदत करेल.
- एकाच समाजात भिन्न व्यक्तींमध्ये अनेक प्रकारचे मतभेद असतात. तथापि, मानव अधिकारांचे पालन केल्याने याचा परिणाम लोकांच्या विविधतेत एकत्र राहाण्यावर होईल. तसेच राष्ट्र-राज्यांमधील अंतर कमी करून व एकसंघ विश्व ही संकल्पना प्रस्थापित करण्यावर होईल.
- 'मानव अधिकार शिक्षण'- आपल्याला आवश्यक असलेल्या विविध मूल्यांचे पालन करून एकनिष्ठ राहाण्यास शिकवते. तसेच, याचे ज्ञान व्यक्तींमध्ये परिवर्तन घडवून त्यांना त्यांच्या कृत्यांसाठी व्यक्तिगत स्तरावर किंवा सामाजिक स्तरावर जबाबदार बनवते. मानव अधिकारांचे ज्ञान आपल्याला आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय क्षेत्रात व्यवस्थित, शांतीपूर्ण आणि मैत्रीपूर्ण समाज स्थापित करण्यात मदत करेल.

## नमुना प्रश्न

### एका शब्दात उत्तरे लिहा

१. **कोणता विषय सामान्यत: मूल्यांशी संबंधित आहे ?**

तत्त्वज्ञान

२. **प्रतिष्ठा काय व्यक्त करते ?**

योग्य/सभ्य वर्तन

३. **अधिकार कोणत्या संकल्पनेवर आधारित आहे ?**

स्वातंत्र्य

४. **नीतीमूल्ये कोणत्या पैलूशी संबंधित आहेत ?**

वैयक्तिक चारित्र्य

५. **मानव अधिकार शिक्षण ..................... आहे.**

आजीवन प्रक्रिया

## बहुपर्यायी प्रश्न

१. **विविधतेत एकता याचा अर्थ काय आहे ?**

(अ) एकच/एकटे कुटुंब (ब) विविधता असूनही एकत्रित राहाणे (क) प्रत्येकासाठीचे एक ठिकाण (ड) प्रत्येकाच्या मान्यता प्राप्त प्रतिष्ठित पद्धतींसह एकत्रित राहाणे

२. **नैतिक मूल्ये कशाचा पुरस्कार करतात ?**

(अ) सामाजिक प्रणाली (ब) संवेदनशील जगणे (क) एकनिष्ठ राहाणे (ड) नियम बनविणे

३. **मानव अधिकारांचा मुख्य उद्देश काय आहे ?**

(अ) नैतिक व नीतीमूल्ये शिकवणे (ब) मैत्रीपूर्ण संबंध विकसित करणे (क) लोकांना जागरुक करणे (ड) शांती, सुरक्षा आणि एकसंघ विश्व निर्माण करणे.

४. **मूल्यांचा प्रतिमान कोणत्या मूलभूत संकल्पनेचा भाग आहे ?**

(अ) प्रतिष्ठा (ब) मानव अधिकार शिक्षण (क) स्वातंत्र्य (ड) न्याय

**उत्तरे : (१) ड (२) अ (३) ड (४) ब**

# घटक – २ अधिकार आणि कर्तव्यांचा संबंध

सदर घटकात अधिकारांचा अर्थ आणि त्यांचे महत्त्व आणि संकल्पनात्मक दृष्टिकोन थोडक्यात सारांशित केला जाईल. अधिकार, कर्तव्ये आणि मूल्ये यांच्यामधील संबंधांचे परिक्षण करुन, एका सुसंस्कृत समाजातील लोकांवर एक दुसऱ्यांप्रति त्यांच्या कर्तव्यांचे पालन करणे बंधनकारक आहे.

## (अ) अधिकार

### अधिकाराचे व्युत्पत्तीशास्त्र:

आधुनिक इंग्रजीमध्ये वापरल्या जाणाऱ्या 'राईट' शब्दाची उत्पत्ती ही जुना इंग्रजी शब्द 'राईट' किंवा 'रेह्ट' या शब्दांमधून झालेली आहे. सुरवातीच्या काळामध्ये, याचा उपयोग जगातील विविध भाषांमध्ये विविध पारिभाषिक नामकरणानुसार केला होता. यानुसार, व्यापक विविध अभिव्यक्त परिस्थितीच्या आधारे या शब्दाने अनेक अर्थ प्राप्त केले आहेत. कायद्याच्या भाषेत, हे असे नैतिक, नीतीमूल्य अधिकार आहेत, जे कायद्याच्या अधिकाराने योजले आहेत व ज्यांचा विचारविनिमय आणि वापर करणे आवश्यक आहे.

वेगवेगळ्या समीकरणांच्या आधारे, शैक्षणिक क्षेत्रामध्ये, विशेषतः राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, तत्त्वज्ञान आणि विधी सारख्या क्षेत्रांमध्ये अधिकाराच्या बाबतीत विविध संदर्भात त्याची स्थापना, अर्थ आणि कार्य या विषयांवरून बरेच मतभेद आहेत. अधिकाराच्या विविध प्रकारांची चर्चा करण्यापूर्वी, त्याचा सोपा अर्थ आणि विश्लेषण, अधिकाराचे विविध पैलू सोप्या पद्धतीने समजण्यासाठी देण्यात आले आहेत.


### अधिकाराचा अर्थ

ऐतिहासिक दृष्टिकोनातून, 'अधिकाराचे' उद्देश्यात्मक अर्थाने वर्णन करता येईल :असे... अधिकार किंवा कृती ज्यांचा लोकांनी त्यांच्यातील सामंजस्यपूर्ण संबंध टिकविण्यासाठी वापर करणे आवश्यक आहे. आधुनिक किंवा व्यक्तीनिष्ठ दृष्टीने, याची व्याख्या मोठी आणि अनेक भागात आहे. अधिकाराची ऐतिहासिक उत्पत्ती आणि याचे भिन्न अर्थ यांच्या संबंधी अनेक मतभेद आणि विद्वत्तापूर्ण चर्चा काही असल्या तरी, सामान्यपणे अधिकार म्हणजे–एक कायदेशीर मंजूरी असलेले किंवा मानक मूल्य आहे.

## अधिकाराचे विश्लेषण

विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून, 'अधिकाराचे' दोन भाग आहेत (स्वरूप आणि कार्य). एक अधिकाराची अंतर्गत संरचना आहे (स्वरूप) आणि दुसरे अधिकारांचा वापर करणाऱ्यांसाठी अधिकार काय करतात (कार्य). त्यानुसार, अधिकार हे हक्क आणि कर्तव्य यांचे एकत्रिकरण आहे. याचा अर्थ अधिकार, व्यक्तीला विशिष्ट स्वातंत्र्य किंवा विशेषाधिकार प्रदान करतात; तसेच व्यक्ती जेव्हा स्वत:च्या अधिकारांवर हक्क सांगते, त्याचवेळी आपल्या कर्तव्यांचे पालन करण्याची जबाबदारीही त्याच्यावर दिली जाते. अनेक कायदेपंडितांनी अधिकारांचे कर्तव्यांसह पालन करण्याच्या संकल्पनेला सकारात्मक आणि नकारात्मक अधिकार म्हणून परिभाषित केले आहे. यानुसार, ज्या व्यक्तीकडे सकारात्मक अधिकार आहेत, त्या व्यक्तीला काही वस्तू किंवा सेवा मिळविण्याचा अधिकार आहे. नकारात्मक अधिकारधारक हस्तक्षेप न करण्यास पात्र आहेत. कायद्याच्या दृष्टीमध्ये, अधिकार एखाद्या व्यक्तीला स्वातंत्र्य आणि काही विशेषाधिकार प्रदान करतात. त्याचबरोबर जबाबदाऱ्यांचे पालन करणेही व्यक्तीवर थोपवितात. याव्यतिरिक्त, अधिकार असणाऱ्या व्यक्तीला अधिकारांचा उपयोग करण्यासाठी सक्षम करणेही आवश्यक आहे. व्यक्ती अधिकार सशक्तिकरण यंत्रणेच्या या भागाला केवळ मानव अधिकार शिक्षणाच्या मूल्यांचा प्रसार केल्यानेच साध्य केले जाऊ शकते.

तथापि, तत्त्वज्ञान, राजकारण, कायदा आणि तर्कशास्त्र इत्यादी सारख्या विषयातील तत्त्ववेत्यांनी आणि राजकीय विश्लेषकांनी या शब्दाच्या सामान्य उपयोगाच्या आधारे अधिकाराची परिभाषा अनेक श्रेणींमध्ये केली आहे. अधिकाराची सामान्यपणे किंवा ढोबळमानाने व्याख्या पुढीलप्रमाणे केली जाऊ शकते: १) नैसर्गिक अधिकार २) कायदेशीर अधिकार ३) दाव्याचे अधिकार ४) स्वातंत्र्याचे अधिकार ५) सकारात्मक अधिकार ६) नकारात्मक अधिकार ७) व्यक्तिगत अधिकार आणि ८) समूह अधिकार.




## नैसर्गिक अधिकार

नैसर्गिक अधिकाराची संकल्पना नैसर्गिक कायद्याच्या सिद्धांत किंवा तत्त्वज्ञानाशी खूप जवळून संबंधित आहे. या सिद्धांतानुसार, केवळ निसर्ग किंवा देव व्यक्तीच्या बुद्धिमत्ता आणि कार्यांचे नियमन करत असतो. राजा मूळतः ईश्वरीय व देवाचा प्रतिनिधी आहे असे मानले जात असल्याने, त्याने तयार केलेले नियम सुद्धा दैवी स्वरूपाचे मानले जात. परंतु अठराव्या शतकाच्या ज्ञान प्रसाराच्या (तर्कशक्ती/शहाणपणाचे युग) युगामध्ये होब्ज, लॉक, ह्युगो ग्रोशियस, रुसो, सॅम्युएल पुफेन्डोर्फ, इत्यादी पाश्चात्य तत्त्ववेत्यांनी नैसर्गिक कायद्याच्या मूळतः ईश्वरीय संकल्पनेलाच आव्हान दिले.

नैसर्गिक अधिकार हे दुसरे तिसरे काहीही नसून प्रामाणिकता, न्याय आणि तर्कशुद्धतेवर आधारित अधिकार आहेत. याचा अर्थ, व्यक्ती परस्पर संमतीच्या माध्यमातून राजकीय संस्था स्थापन करण्यासाठी एकत्रित येतात आणि त्यांचे स्वतःचे सरकार स्थापन करण्यासाठी सहमती दर्शवतात, जे सरकार त्यांना, त्यांचा किंवा त्यांच्या प्रतिनिधीद्वारे रचलेल्या सार्वजनिक नियमांच्या आणि अधिनियमांच्या माध्यमातून आयुष्य जगण्यासाठी सक्षम करेल. त्याचबरोबर, ते कुठल्याही प्रकारच्या हिंसेशिवाय शांततेने व सुरक्षिततेने राहाण्यासाठी, त्यांच्या अधिकारांचे पालन करण्यासाठीचे किंवा त्याद्वारे बांधील असलेल्या कायदेशीर आणि नैतिक कर्तव्यांचा स्वीकार करतील.

तथापि, हे नैसर्गिक कायद्याच्या तत्त्ववेत्यांद्वारे व्यक्त केलेले मुख्य तत्त्वज्ञान असले तरी, त्यांच्यामध्ये एक मतभेद आहे. आधुनिक निसर्गवाद्यांच्या एका गटानुसार, मानव अधिकार नैसर्गिक कायद्याच्या संकल्पनेशी खूप जवळून संबंधित असल्याने, नैसर्गिक अधिकार व मानव अधिकारांमध्ये काहीच फरक नाही, दोन्हीही एकसमान आहेत

पण काही परंपरावादी यांचे असे म्हणणे आहे की, नैसर्गिक अधिकार मानवाने तयार केलेले नाहीत आणि ते निसर्गाच्या कारणांच्या अधिकारांबद्दल सांगत असल्याने, दोन्ही समान समजले जाऊ शकत नाहीत. त्यांच्या मते, नैसर्गिक अधिकार कोणत्याही अधिकाऱ्यांच्या, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय संस्था, यापेक्षा श्रेष्ठ असल्याने आणि सार्वत्रिक असल्याने, ते मानव अधिकारांच्या समान समजले जाऊ शकत नाहीत कारण ते मूळतः ईश्वरीय नसून मानवी समाजात आंतरराष्ट्रीय संस्थांच्या माध्यमातून रुपांतरीत केले जातात.




INDIVIDUALIST VIEW

वरील दोन्ही तत्त्वांचे सूक्ष्म मूल्यामापन स्पष्टपणे सैद्धांतिक फरक स्पष्ट करते. नैसर्गिक अधिकार मूलत: जीवन, व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि स्वतंत्रता, व्यक्तीचे अधिकार आहेत आणि इतर व्यक्तीद्वारे कोणत्याही प्रकारे अडथळा किंवा ढवळाढवळ न करता जीवन जगण्याचा सोपा मार्ग आहेत. यानुसार, अधिकार ईश्वरीय किंवा नैसर्गिक देणगीच्या स्वरुपात व्यक्तीच्या शरीरामध्ये जन्मजात आहेत. म्हणूनच, ते निहित म्हणजेच मूळचे किंवा अविच्छेदीय (देऊन टाकता किंवा काढून किंवा हिरावून घेता न येणारा हक्क) अधिकार आहेत.

दिलेले चित्र आधुनिक नैसर्गिक तत्त्वज्ञानींचे गृहीतक विश्लेषीत करते, की जरी मनुष्य प्राणी मुक्त इच्छाशक्तीसह जन्माला येत असला तरी, प्रत्येकावर एक सामाजिक प्राणी म्हणून त्यांच्या नैसर्गिक अधिकारांचा वापर करताना किमान मर्यादा असणे आवश्यक आहे. कारण, मनुष्याने स्वतः राज्याची आधुनिक संकल्पना निर्माण केली आहे, आणि म्हणून इतरांच्या अधिकारांमध्ये अडथळा न आणता, राष्ट्राने निर्माण केलेल्या कायद्याचे पालन त्यांनी करायला हवे, अन्यथा या अधिकारांना कायदेशीर अधिकार म्हणून देखील उल्लेखित केले जाते, ज्यांना कायद्याच्या अधिकाऱ्यांनी मंजूर केले आहे आणि जे एखाद्या व्यक्तीला त्याच्या अधिकारांच्या कायदेशीर अंमलबजावणीसाठी हक्क प्रदान करतात.

## कायदेशीर अधिकार

कायदेशीर अधिकार म्हणजे, कोणतीही भीती, भय किंवा पक्षपात न बाळगता निश्चित स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी कायद्याने देशाच्या नागरिकांसाठी निश्चित केलेले अधिकार होय. कायदेशीर अधिकार वैधानिक अधिकार म्हणूनही निश्चित केले जातात, हे अधिकार एखाद्या सरकारद्वारे शासितांना बहाल केले जातात आणि ते विशिष्ट संस्कृती व सरकारशी संबंधित असतात. या अधिकारांना विधानमंडळाद्वारे कायदेशीर नियमांमध्ये संहीताकृत (वैधानिक) केले जाते. एखाद्या देशाचे संविधान आणि तेथील संस्कृती या आधारे प्रत्येक देशातील अधिकार भिन्न असू शकतात. तरी सुद्धा, त्याचवेळी कायदेशीर अधिकार, लोकांवर कायद्याने विहित केलेल्या मर्यादा न ओलांडण्याची बंधनेही घालतात.

## हक्काचे/दाव्याचे अधिकार आणि स्वातंत्र्याचे अधिकार

हक्काचे/दाव्याचे अधिकार म्हणजे, असे अधिकार जे इतर व्यक्तीच्या अधिकारांचा सन्मान करण्याचे, दुसऱ्या व्यक्तींवर बंधने घालतात. स्वातंत्र्याचे अधिकार म्हणजे, इतर व्यक्तींच्या अधिकाराच्या वापरावर कोणतीही बंधने किंवा मर्यादा न घालता अधिकारधारकाने आपल्या अधिकारांचा मुक्तपणे केलेला वापर होय.

उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीला त्याच्या आवडीनुसार भाषणाचे किंवा बोलण्याचे स्वातंत्र्य असणे, म्हणजेच स्वातंत्र्याचा अधिकार आहे. पण त्याच बरोबर, जर हा एखाद्या व्यक्तीच्या अधिकाराला प्रभावित करीत असेल किंवा प्रतिष्ठेला इजा पोहचवत असेल तर, याचे रुपांतर हक्काच्या/दाव्याच्या अधिकारात होते.

## सकारात्मक आणि नकारात्मक अधिकार

'सकारात्मक' आणि 'नकारात्मक' अधिकारांमध्ये तत्त्ववेत्यांच्या एका गटाने किंचितसा फरक केलेला आहे. सकारात्मक अधिकार म्हणजे, असे अधिकार ज्यासाठी एखाद्या व्यक्तीने काही सेवा प्रदान करणे किंवा स्वतंत्रपणे किंवा संपूर्ण समाजाप्रति चांगले कार्य करणे अपेक्षित आहे. नकारात्मक अधिकार कोणत्याही अधिकारधारकांच्या स्वातंत्र्यात किंवा स्वावलंबनात व्यत्यय/अडथळा न आणण्याची बंधने लादतात. कायद्याच्या भाषेत दोन्ही अधिकार, निष्क्रीय अधिकार असल्याने, या अधिकारांचे नेमके/ अचूक वर्गीकरण करणे कठीण आहे. मानव अधिकारांच्या वैश्विक घोषणापत्रात (UDHR) सकारात्मक आणि नकारात्मक अधिकार या दोन्हींची वैशिष्ट्ये आहेत. अनेक विद्वानांचा असा युक्तिवाद आहेत, की दोन्ही संकल्पना एकत्र/एकच असल्याने त्यांच्यामध्ये फरक करण्याची आवश्यकता नाही.

## सकारात्मक अधिकारांची उदाहरणे

हे अधिकार साधारणत: अधिकारधारकाच्या हक्काचे/दाव्यांचे समाधान करण्याकरिता, राष्ट्र किंवा समाज किंवा व्यक्तींच्या गटावर जबाबदारी सोपवितात.

उदा. शिक्षणाचा अधिकार, आरोग्याचा अधिकार, सामाजिक सुरक्षेचा अधिकार इत्यादी. भारतीय संदर्भामध्य या अधिकारांचे वर्णन भारतीय संविधातील राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या सूचीमध्ये केले आहे. हे अधिकार संसाधनांसह इतर विविध घटकांवर अवलंबून असल्याने या गटातील अधिकारांना साध्य करणे सोपे नाही. मानव अधिकाराच्या भाषेत या अधिकारांचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार म्हणून उल्लेख आहे.

## नकारात्मक अधिकारांची उदाहरणे

हे अधिकार साधारणपणे प्रत्येक व्यक्तीवर, स्वत:च्या अधिकारांचा उपयोग करताना, दुसऱ्या

व्यक्तीला त्याचे अधिकार वापरताना होणाऱ्या हानीपासून परावृत्त करण्यासाठी, नैतिक आणि कायदेशीर बंधन म्हणून एक जबाबदारी लादतात. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार, जीवन आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार, समतेचा अधिकार, संपत्तीचा अधिकार, सुनावणीचा अधिकार, जलद खटला आणि न्याय मिळविण्याचा अधिकार, प्रार्थना/पूजेचा अधिकार, धार्मिक स्वातंत्र्य, कायदेशीर उपायाचे अधिकार, इ. UDHR मध्ये नागरी आणि राजकीय अधिकार म्हणून यांचा उल्लेख केलेला आहे.

## व्यक्तिगत आणि समूह अधिकार

जे अधिकार केवळ एका व्यक्तीशी संबंधित आहेत त्यांना 'व्यक्तिगत अधिकार' म्हणतात. हे अधिकार प्रामुख्याने राजनैतिक, आर्थिक किंवा कायदेशीर स्वरूपाचे असतात. राज्यासहित कोणाच्याही हस्तक्षेपाशिवाय जीवन आणि स्वातंत्र्याच्या अधिकारांचा उपभोग घेण्यासाठी व्यक्तींद्वारे या अधिकारांचा वापर केला जाऊ शकतो. तथापि, व्यक्तिगत अधिकारांमध्ये सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही घटक आहेत. सकारात्मक घटक व्यक्तीवर त्यांच्या अधिकारांचे पालन कायद्यानुसार करण्यासाठी भाग पाडतात. नकारात्मक घटक ज्याला कायद्याने परवानगी नाही असे कोणतेही कृत्य प्रतिबंधित करतात.

समूह/गट अधिकार म्हणजे असे अधिकार, ज्यांचा फायदा सामूहिकरित्या तसेच वैयक्तिकरित्या घेतला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, अपंग (विकलांग) व्यक्तींचे अधिकार समूह अधिकार मानले जातात. एक समूह म्हणून अपंग व्यक्तींच्या अधिकारांना हे अधिकार प्रोत्साहन देतात. त्याचवेळी, एखादी अपंग व्यक्ती वैयक्तिकरित्या देखील स्वतंत्रपणे समूहाच्या अधिकारांची मागणी करू शकते.

वरील संक्षिप्त चर्चेवरून अधिकाराची व्याख्या अशी केली जाऊ शकते की, ''असे अधिकार, ज्यांचा उपयोग नैसर्गिकरित्या, कायदेशीररित्या किंवा सामाजिकरित्या इतरांच्या अधिकारांचे उल्लंघन न करता कायदेशीर/नैतिक कर्तव्यासह कार्य करण्यासाठी केला जाऊ शकतो.'' यानुसार, अधिकारांमध्ये पाच घटक असतात. ते आहेत:

१. अधिकारधारक (जो अधिकाराचा कर्ता आहे) हक्क/दावा करू शकतात.

२. त्याचा काही आशय असणे (अधिकाराचे कर्म)

३. ज्याचे तो किंवा ती मागणी/दावा, उपभोग किंवा अंमलबजावणी करू शकतात (अधिकाराचे वापर)

४. काही व्यक्ती किंवा समूहाविरुद्ध असणे (त्या संबंधित कर्तव्याचे वाहक/धारक)

५. काही विशिष्ट कारणाने त्याच्या किंवा तिच्या अधिकारांच्या समर्थनार्थ पुरावा सादर करणे (अधिकारांचे समर्थन करणे)

अधिकारांचा उपयोग करण्यासाठी किमान दोन व्यक्ती असणे आवश्यक आहे आणि ते वापर करण्यास इच्छुक असलेले हक्क/दावे कायद्याच्या समोर समायोजित/न्यायसंगत ठरवण्यासाठी एक कायदेशीर आधार असणे आवश्यक आहे.

## सार्वत्रिक/विश्वव्यापी अधिकार

सार्वत्रिक अधिकार म्हणजे, असे अधिकार ज्यांचा उपयोग करण्यास प्रत्येक व्यक्ती आपला देश, वसतीस्थान ह्यांच्या निरपेक्ष, राज्य किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या कोणत्याही हस्तक्षेपाविना कायदेशीर मर्यादांचे पालन करून मुक्तपणे आपल्या अधिकारांचा उपयोग करण्यास सक्षम होतील.

हे अधिकार नेहमी व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा आणि योग्यतेचा विकास करतात. म्हणून ते प्रत्येक राष्ट्रावर वंश, लिंग, भाषा किंवा धर्म या संबंधित कोणत्याही प्रकारे भेदभाव न करता व्यक्तींच्या स्वातंत्र्याचे व प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहित करण्याची दायित्व ठेवतात. हे अधिकार एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात किमान असल्याने, यूएसएचे माजी अध्यक्ष फ्रँकलिन डेलेना रुझवेल्ट यांनी ६ जानेवारी १९४१ रोजी अमेरिकी काँग्रेसला उद्देशून केलेल्या भाषणात, भाषणाचे स्वातंत्र्य, प्रार्थना/पूजेचे स्वातंत्र्य, भीती पासून स्वातंत्र्य आणि गरजेपासून स्वातंत्र्याचे एखाद्या व्यक्तीची प्रतिष्ठा आणि योग्यतेचे मूलभूत तत्त्वे म्हणून समर्थन केले आहे.

वरील सिद्धांताच्या आधारे, व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या विचारसरणीचे अनेक शतके समर्थन केले गेले. २४ ऑक्टोबर १९४५ ला संयुक्त राष्ट्राने स्वीकारलेल्या त्यांच्या जाहीरनाम्यामध्ये मानव अधिकारांना आंतरराष्ट्रीय कायद्याचे एक अभिन्न अंग म्हणून मान्यता दिली. त्यानुसार, मानव अधिकारांची उत्पत्ती आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये झाली. ज्यामुळे, प्रत्येक राष्ट्रावर कोणत्याही भेदभावाशिवाय मानव अधिकाराला प्रोत्साहन देण्याचे किंवा त्याचा विकास करण्याचे दायित्व ठेवले जाते. हे अधिकार पुढे, १० डिसेंबर, १९४८ ला स्वीकारलेल्या मानव अधिकारांच्या वैश्विक घोषणापत्राच्या माध्यमातून विस्तारित करण्यात आले आहे. जरी आंतरराष्ट्रीय कायद्याचे राजकीय तत्त्वज्ञांच्या आणि विद्वानांच्या दरम्यान मानव अधिकारांच्या सार्वभौमिकतेबद्दल एकमत नसले, तरी संयुक्त राष्ट्रांच्या १९३ सदस्य राष्ट्रांद्वारे दिलेली मानव अधिकारांची व्यापक स्वीकृती लक्षात घेता, ते सार्वत्रिक अधिकार म्हणून स्थापित झाले आहेत यात काही शंका नाही.

एक व्यक्तींकडून इतर व्यक्तींचा उचित हक्काची मागणी करते याला अधिकार म्हणतात. कर्तव्य ते आहे जे व्यक्तीला त्याच्या कृत्यांच्या प्रति आणि त्याच्या क्रिया आणि आचरणाच्या परिणामाप्रति जबाबदार बनवते. अधिकार हे नैतिक, नीतीविषयक, कायदेशीर, सामाजिक किंवा सांस्कृतिक असू शकतात. अधिकार नैसर्गिक असताना म्हणजेच अस्तित्त्व वृद्धींगत करतात तेव्हा नैतिक मूल्ये म्हणून मानले जातात. तर्कसंगत अधिकार न्यायोचीत आहेत आणि भावात्मक नाहीत. अधिकार हे कारणांवर आधारित असतात आणि ते नेहमी सामान्य असले पाहिजेत.

## (आ) कर्तव्य – स्वरूप व संकल्पना

### दायित्त्व/बंधने आणि कर्तव्य यातील पारिभाषिक फरक

दायित्त्व (जबाबदारी) हा शब्द सामान्यतः कर्तव्य या शब्दाला पर्यायी/समानार्थी या अर्थाने वापरला आहे. तथापि, नेमकेपणाने बोलायचे तर, या दोन्ही शब्दांमध्ये फरक आहे. तत्त्वज्ञ एच. एल. ए. हार्ट यांच्या म्हणण्यानुसार 'कर्तव्य आणि जबाबदारी परस्पर भिन्न आहेत.'

अनेकदा अधिकार, मिळविलेल्या किंवा तयार केलेल्या जबाबदाऱ्यांशी कोणतीही अनुरूपता न राखता अस्तित्त्वात आहेत. याउलट कर्तव्य स्थिती, दर्जा, भूमिका यापासून निर्माण होते. याचा अर्थ प्रत्येक वेळी कर्तव्य व्यक्तीच्या स्थितीशी संबंधित असते, ज्याचा संबंध अधिकाराशी आहे. म्हणूनच, जबाबदारी सर्वकाळ कर्तव्याशी अनुरूप असू शकत नाही. केवळ अधिकाराला कर्तव्य हा शब्द वापरण्याची रित म्हणून किंवा सरावानुसार संबोधले जाते. कायद्याचा दृष्टीने, विशेषतः अधिकाराच्या क्षेत्रात या दोन्ही संकल्पना वेगळ्या आहेत.

### वरील फरकाचे एक साध्या उदाहरणाद्वारे वर्णन केले आहे

'अ' या व्यक्तीने त्याचा मित्र 'ब' ला पार्टीमध्ये आमंत्रित केले. 'ब' ने वचन दिले की तो न चुकता उपस्थित राहील. तरीसुद्धा, 'ब' उपस्थित राहू शकला नाही. या प्रकरणात, पार्टीला जाणे ही 'ब' ची जबाबदारी होती. पण उपस्थित न राहिल्याने, त्याने 'अ' च्या अधिकारांचे उल्लंघन किंवा भंग केला नाही.

जर एखादी व्यक्ती एका कार्यालयात किंवा संस्थेमध्ये नोकरी करीत असेल, तर त्याला आवडले किंवा आवडले नाही तरी त्याच्या नोकरीशी संबंधित सर्व कायदेशीर कामाचे निर्वहन करणे हे त्याचे कर्तव्य आहे.

एखाद्याला आश्चर्य वाटू शकते की, दायित्त्व/जबाबदारी/बंधने आणि कर्तव्य या संकल्पनांचा समानार्थी उल्लेख का केला जातो, याचे कारण राजकीय, सामाजिक किंवा नैतिक जबाबदाऱ्या पूर्ण करणे किंवा पार पाडणे गरजेचे आहे असे असू शकते. अनेक वेळा जे नैतिक स्वरूपाचे आहेत ते देखील कर्तव्य म्हणून मानले जातात.

उदाहरणार्थ, व्यक्तीने कधीच खोटं बोलू नये. तरीसुद्धा, जरी व्यक्तीवर खरे बोलण्याचे कर्तव्य असले तरी, अशा काही परिस्थितीत जर एखाद्या व्यक्तीने सत्य उघड केले आणि त्यामुळे त्याच्या जीवनावर परिणाम होणार असेल किंवा त्याचे नुकसान होणार असेल तर, ती व्यक्ती खोटे बोलू शकते. कायद्यामध्ये असलेल्या नैतिक व नियमानुसार अदलाबदलीच्या प्रकारामुळे, कर्तव्य हा शब्द 'दायित्त्व' किंवा 'बंधनकारक' या संकल्पनांशी समान मानला आहे. या मुद्द्यांवर तत्त्वज्ञान आणि कायदा या दोन्ही क्षेत्रात भरपूर प्रमाणात साहित्य उपलब्ध आहे. धर्मावर आधारित प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानामध्ये या दोन संकल्पनांमध्ये असलेले संरचनात्मक भेद विश्लेषित केलेले आहे, ज्यामध्ये नैतिक आणि कायदेशीर कर्तव्ये दोन्ही समाविष्टीत आहेत, ज्यांचे पालन सर्वांनी कोणत्याही विचलनाशिवाय करणे आवश्यक आहे.

## कर्तव्य – संकल्पना

वरील चर्चेनुसार, कर्तव्य हे 'दायित्त्व/बंधने' या संकल्पनेशी संबंधित आहे. कर्तव्याची संकल्पना  गरजेच्या पूर्ततेतून कर्तव्ये अनेक पध्दतींनी व साधनांनी निर्माण होतात जसे नैतिक कर्तव्य, कायदेशीर कर्तव्य, पालकत्वाच कर्तव्य, सामाजिक कर्तव्य आणि नागरी कर्तव्य इत्यादी कर्तव्याचे प्रकार आहेत. तथापि, कायद्याच्या दृष्टीने कर्तव्ये कायदेशीर मानदंड किंवा गरजांच्या परिपूर्तीमधून उत्पन्न होतात. निर्धारित केल्याप्रमाणे, त्यांचे निर्वाहन करायला हवे. यानुसार, कृत्य बरोबर की चूक हे कर्तव्य निर्वहनाच्या आधारे ठरविले जाते. जर कुणी कर्तव्यांच्या विरुद्ध कार्य करीत असेल, ते चूकीचे ठरते. (उदाहरणार्थ, नियमानुसार दुसऱ्याबद्दल वाईट बोलणे (निंदा करणे) चुकीचे आहे. यामुळे त्या व्यक्तीच्या सौजन्यशीलतेवर परिणाम होत असेल, तर असे करणे चूक ठरेल). कर्तव्य दुसऱ्यांच्या व समाजाच्या अधिकारांचा सन्मान करण्याचे दायित्त्व थोपवते. म्हणूनच, अधिकार आणि कर्तव्य परस्पर संबंधित आहेत. अधिकार एक मागणी/दावा किंवा हक्क आणि कर्तव्य एक अपेक्षा आहे.

## कर्तव्यांचे विविध प्रकार

कर्तव्याचे वर्गीकरण पुढील प्रमाणे केले जाऊ शकते: (१) नैसर्गिक आणि अधिग्रहित कर्तव्ये

(२) सकारात्मक आणि नकारात्मक कर्तव्ये (३) परिपूर्ण आणि अपूर्ण कर्तव्ये आणि (४) सकृददर्शनी आणि कर्तव्ये म्हणून मानलेल्या इतर सर्व बाबी.

## (अ) नैसर्गिक आणि अधिग्रहित कर्तव्ये

कोणत्याही संस्था किंवा गटाद्वारे निर्देशन न करता व्यक्तीला बंधनकारक असलेले कर्तव्य म्हणजे 'नैसर्गिक कर्तव्य' होय. प्रत्येकजण स्वेच्छेने ही कर्तव्ये बजावतो. उदाहरणार्थ: इतरांना दुखापत न पोहोचविणे, स्वातंत्र्याचा गैरवापर न करणे, इतरांचा आदर करण्याचे कर्तव्य, निरपराधांना न दुखविणे, मुलांवर मारहाण न करणे, नेहमी सत्य आणि न्यायाची बाजू घेणे इत्यादी.

व्यक्तीने काही केल्यामुळे किंवा त्याचे इतरांबरोबर असणाऱ्या विशेष संबंधामुळे, व्यक्तींद्वारे आधीन केलेली कर्तव्ये म्हणजे अधिग्रहित कर्तव्ये होय. याचा अर्थ, काही कर्तव्ये कायदेशीर असतात आणि एखाद्या व्यक्तीच्या इच्छेनुसार त्याच्या अधिग्रहित दायित्त्वाचे/बंधनाचे निर्वहन करण्याची आवश्यकता आहे. पण जर कर्तव्य पालन करण्याची संमती देऊन सुद्धा यांचे निर्वहन झाले नाही तर त्यावर कायदेशीर परिणाम होतात.

अधिग्रहित कर्तव्यांचा अजून एक प्रकार जो विशेष संबंधातून तयार झाला आहे व व्यक्तीद्वारे एक समूह म्हणून अंगिकारला जातो, ज्याचा उल्लेख अनेकदा जबाबदारी म्हणूनही केला जातो. उदाहरणार्थ, आई-वडिलांचे त्यांच्या मुलांच्या प्रति असलेले कर्तव्य, डॉक्टरांचे त्यांचा रुग्णांच्या प्रति, आणि वकिलांचे त्यांच्या पक्षकारांच्या प्रति असलेल्या कर्तव्याचे पालन करणे. ही कर्तव्ये, व्यक्तींद्वारे एका विशिष्ट भूमिकेचा स्वीकार करून आपोआप वापर करण्यासाठी गृहीत मानली जातात.

## (ब) सकारात्मक आणि नकारात्मक कर्तव्ये

कायदेपंडित जॉन रॉल्स यांच्या मते, ''सकारात्मक कर्तव्ये व्यक्तीला चांगले कार्य करण्यास प्रवृत्त करतात तर नकारात्मक कर्तव्ये अपायकारक कार्य करण्यावर निर्बंध लादतात किंवा ते करण्यापासून परावृत्त करतात. गरिबांना मदत करणे सकारात्मक कर्तव्य असू शकते, पण ते करणे बंधनकारक असू शकत नाही. तथापि, खोटे न बोलणे किंवा इतरांना दुखापत न करणे हे नकारात्मक कर्तव्य आहे जे दायित्व ठेवतात.''

## (क) परिपूर्ण व अपूर्ण कर्तव्ये

परिपूर्ण आणि अपूर्ण कर्तव्ये, सकारात्मक आणि नकारात्मक कर्तव्यांसारखीच वाटतात. पण जर्मन तत्त्वज्ञ प्रो. इमॅन्युएल कांट, यांच्या मते, ती समान नाहीत. परिपूर्ण कर्तव्यामध्ये निर्धारित केलेल्या

ध्येयानुसार उद्भवणाऱ्या जबाबदाऱ्यांचे पालन व्यक्तीने कायम करणे अपेक्षित आहे. अपूर्ण कर्तव्ये लवचिक आहेत. अपूर्ण कर्तव्ये अशी कर्तव्ये आहेत, जी खऱ्या अर्थाने कधीही पूर्ण होत नाही. या कर्तव्यांचे पालन करणे हे परिस्थितीवर अवलंबून असते. कांट यांच्या मते, एखाद्याला स्वत:ची उपजत बुद्धी जोपासणे कठीण असते हे अपूर्ण कर्तव्याचे उदाहरण आहे.

## (ड) सकृददर्शनी आणि कर्तव्य म्हणून मानलेल्या इतर सर्व गोष्टी

डब्ल्यू. डी. रॉस यांच्या मते, लोक मुख्यतः त्यांच्या कर्तव्यांचे पालन एक सद्‌भावना/सदिच्छा म्हणून आणि त्यांच्या आश्वासनांच्या पूर्ततेसाठी करतात. याचा अर्थ, अनेक वेळा लोक फायदे आणि तोटे यांच्या आधारे त्यांच्या कर्तव्यांचे पालन करतात. ही कर्तव्यांची प्राथमिक संकल्पना असल्याने, रॉस व्यक्तींना इतरांच्या हितांना कोणतेही नुकसान न पोहचविता योग्य रितीने आपल्या कर्तव्यांचे पालन तर्कशुध्द रीतीने करण्यास सांगतात.

मानव अधिकारांच्या तत्त्वज्ञानात वरील कर्तव्यांची जाणीव आहे. सध्याच्या परिस्थितीत असलेल्या विकृतींचे निर्मूलन करण्यासाठी आणि मानव अधिकारांचे लाभार्थी व प्रतिवादी म्हणून व्यक्तींचे त्यांच्यातील नैतिकतेचे आणि नीतीमूल्यांचे मानक सुधारण्यासाठी आपण सर्वांनी विनम्रतेने मानव अधिकारांद्वारे प्रतिपादित कर्तव्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

या संदर्भात, संयुक्त राष्ट्र संघाच्या मानव अधिकार उच्च आयुक्तालयाने, १९९८ मध्ये स्पेनच्या वालेन्सिया शहरात, मानव अधिकाराचे वैश्विक घोषणापत्र स्वीकारण्याचा ५० वा वर्धापन दिन साजरा केला, यावेळी युनेस्कोच्या मार्गदर्शनाखाली विश्वमान्य मानव अधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्याचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी एक व्यक्ती, समूह आणि समाजातील घटकांचे अधिकार आणि जबाबदारी यावरील घोषणापत्र स्वीकारले. यालाच जबाबदारी आणि मानवी कर्तव्यांचे वालेन्सिया घोषणापत्र म्हणूनही ओळखले जाते.

वास्तविक समतेचे औपचारिक समतेत होत असलेले स्थानांतरण आणि जगभरातील राष्ट्र व व्यक्ती या दोन्हीद्वारे मानव अधिकारांचे सतत होणारे उल्लंघन लक्षात घेऊन, अनेक नोबेल पुरस्कार विजेत्यांनी आणि विद्वानांनी संयुक्त राष्ट्राला मानवजातीच्या कर्तव्यांना स्पष्ट करणारे एक घोषणापत्र स्वीकारण्याची विनंती केली. या घोषणापत्राला एक कायदेशीर आधार प्रदान करण्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या महासभेने १९९९ मध्ये मानवजातीच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये यावरील एक घोषणापत्र (जाहीरनामा) स्वीकारले.

जाहीरनाम्याची तत्त्वे भिन्न शीर्षकांमध्ये खालील प्रमाणे सारांशित करण्यात आली आहेत.

## मानव अधिकारांच्या रक्षकांना दिलेले अधिकार व संरक्षण

घोषणापत्र अधिकारांसहित, मानव अधिकारांच्या रक्षकांना काही विशिष्ट संरक्षण पुरवते.

- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मानव अधिकारांच्या संरक्षणार्थ व प्राप्तीसाठी प्रयत्न करणे.
- वैयक्तिकरित्या आणि इतरांशी संयुक्त विद्यमाने मानव अधिकाराचे कार्य आयोजित करणे.
- संघटना व गैर–सरकारी संस्था स्थापन करणे.
- शांतीपूर्वक एकत्रित येणे किंवा जमा होणे.
- मानव अधिकारांशी संबंधित माहिती प्राप्त करणे, स्वीकारणे आणि राखून ठेवण्याचे प्रयत्न करणे.
- नवीन मानव अधिकारांच्या संकल्पनेचा व तत्त्वांचा विकास आणि चर्चा करणे तसेच त्यांच्या स्वीकृतीचे समर्थन करणे.
- सार्वजनिक कामाच्या टीकेशी संबंधित सरकारी संस्था आणि एजन्सी व संघटनांना त्यांच्या कार्यात सुधारणा करण्याकरिता, मानव अधिकारांच्या प्राप्तीमध्ये अडथळे होऊ शकतील अशा त्यांच्या कार्याच्या कोणत्याही पैलूकडे लक्ष वेधण्यासाठी प्रस्ताव सादर करणे.
- मानव अधिकार संबंधातील अधिकृत धोरणे व कायद्याबाबत तक्रार दाखल करून घेणे आणि अशा तक्रारीचे पुनरावलोकन करणे.
- मानव अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी व्यावसायिकपणे वैध कायदेशीर मदत किंवा इतर सल्ला व सहाय्य प्रस्तावित व प्रदान करणे.
- राष्ट्रीय कायदा आणि आंतरराष्ट्रीय मानव अधिकारांच्या जबाबदाऱ्यांच्या पालनाचे मूल्यांकन करण्यासाठी सार्वजनिक सुनावण्या, प्रक्रिया आणि चाचण्यांमध्ये उपस्थित राहाणे.
- गैर सरकारी संस्था व अंतरशासकीय संस्थांकडे विनाअडथळा संपर्क असणे आणि त्यांच्या संपर्कात असणे.
- प्रभावी उपायांचा अवलंब करून फायदा करून घेणे.
- मानव अधिकार संरक्षकांच्या उपजीविकेचा किंवा व्यवसायाचा कायदेशीर उपयोग करणे.
- राष्ट्रीय कायद्यांतर्गत राष्ट्राच्या कार्याच्या किंवा चुकांच्या फलस्वरूप होणाऱ्या मानव अधिकारांच्या उल्लंघनाच्या विरुद्ध प्रतिक्रिया देताना किंवा विरोध करताना, शांतीपूर्ण

माध्यमातून, प्रभावी संरक्षण देणे.

- मानव अधिकारांच्या संरक्षणार्थ संसाधनाची (विदेशातून प्राप्त निधी सहित) मागणी, प्राप्ती व त्यांचे उपयोग करणे.

## राज्यांची भूमिका

घोषणापत्रातील जाहीरनाम्यानुसार सर्व तरतुदी अंमलात आणण्याची आणि त्यांचा आदर करण्याची जबाबदारी राष्ट्रांची आहे. तथापि, काही तरतुदी राष्ट्राच्या भूमिकेचा विशिष्ट उल्लेख करतात आणि प्रत्येक राष्ट्राच्या काही जबाबदाऱ्या आणि कर्तव्य सूचित करतात:

- सर्व मानव अधिकारांचे संरक्षण, प्रचार आणि अंमलबजावणी करणे.
- आपल्या अधिकार क्षेत्रातील सर्व व्यक्ती व्यवहारातील सर्व सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि इतर अधिकार व स्वातंत्र्याचा आनंद घेण्यासाठी सक्षम असल्याची खात्री देणे.
- अधिकार व स्वातंत्र्याचे प्रभावी कार्यान्वयन सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक कायदे, प्रशासकीय आणि इतर पद्धतींचे अवलंबन करणे.
- मानव अधिकार उल्लंघनाचा बळी असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तींना प्रभावी उपाय सुचवणे.
- मानव अधिकारांच्या कथित उल्लंघनांबद्दल त्वरित आणि निःपक्षपाती तपास आयोजित करणे.
- जाहीरनाम्यात उल्लेख असलेल्या, व्यक्तीच्या कायदेशीर अधिकारांच्या उपयोगाच्या परिणामस्वरूप कोणत्याही हिंसा, धमक्या, सूड, प्रतिकूल भेदभाव, दबाव किंवा इतर कोणत्याही अनियंत्रित कृती विरोधात सर्वांना संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करणे.
- नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार या संबंधित सार्वजनिक समजूतीला/जाणीवेला प्रोत्साहन देणे.
- मानव अधिकारांचा प्रसार आणि संरक्षण करण्यासाठी लोकपाल किंवा मानव अधिकार आयोग यासारख्या स्वतंत्र राष्ट्रीय संस्थेची निर्मिती आणि विकास करणे.
- औपचारिक शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणाच्या सर्व स्तरावर मानव अधिकार शिक्षणाला प्रोत्साहित करून सुविधा उपलब्ध करणे.

## प्रत्येकाची जबाबदारी

मानव अधिकारांचे घोषणापत्र प्रत्येकाचे इतरांच्या प्रति आणि समाजाच्या अंतर्गत असलेल्या कर्तव्यांवर भर देते व आपल्या सर्वांना मानव अधिकारांचे संरक्षणकर्ते होण्यासाठी प्रोत्साहित करते. मानव अधिकारांना प्रोत्साहित करणे, लोकशाही व त्याच्या संस्थानांचे रक्षण करणे आणि इतरांच्या मानव अधिकारांचे उल्लंघन न करणे, हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

तसेच हे घोषणापत्र विशेषतः मानव अधिकारांचे संरक्षणकर्ते म्हणून पोलीस अधिकारी, वकील व न्यायाधीश यांच्या व्यावसायिक आणि अंमलबजावणीच्या भूमिकांना महत्त्व देते.

## राष्ट्रीय कायद्याची भूमिका

मानव अधिकारांचा ठराव, योग्य कायद्याचा स्वीकार करून या तत्त्वांची अंमलबजावणी करण्याची व त्यांना प्रोत्साहित करण्याची जबाबदारी राष्ट्रावर सोपवतो. यानुसार, नागरिकांचे कर्तव्य अंतर्भूत करण्यासाठी संबंधित कायदा करण्याची जबाबदारी प्रत्येक देशाची आहे. या जाहीरनाम्याचा स्वीकार करण्यापूर्वीच भारतीय संविधानाने सन १९७६ मध्ये ४२ व्या घटना दुरुस्तीद्वारे, आधीच कर्तव्यांचा समावेश केलेला आहे.

सर्वांकडून मानव अधिकारांचे संरक्षण व प्रसार करण्याच्या दृष्टीने मानवी कर्तव्यांच्या इतिहासात वालेन्सिया घोषणा महत्त्वपूर्ण आहेत. यांच्या घोषणेची अंतिम आवृत्ती (tercermilenio@valenciatercermilenio.org and http://www.valenciatercermilenio.org) येथे उपलब्ध आहे.

## कर्तव्याचा समाजावर असलेला प्रभाव

प्रत्येक व्यक्तीची समाज किंवा राष्ट्राच्या प्रति काही कर्तव्ये आहेत. वैश्विक मानव अधिकाराच्या घोषणापत्रानुसार प्रत्येक व्यक्तीची राष्ट्राप्रति असलेली कर्तव्ये पुढील प्रमाणे आहेत:

- देशातील राज्य आणि त्यांच्या संस्थांचा कायदा व इतर कायदेशीर आदेशांचे पालन करणे.
- जेव्हा राष्ट्राला त्याचे संरक्षण करणे आवश्यक असेल, तेव्हा नागरी व लष्करी कार्यांमध्ये सेवा प्रदान करणे.
- सामाजिक सुरक्षितता आणि कल्याणासंबंधित शक्य तितक्या प्रमाणात राष्ट्र आणि समाजाला सहकार्य करणे.

- सार्वजनिक हितासाठी नियमानुसार कर भरणे.
- राष्ट्रीय मालमत्ता आणि संस्कृतीचे रक्षण करणे.
- जातीय, भाषिक, धार्मिक किंवा इतर कोणत्याही कारणास्तव इतर व्यक्तींचे स्वातंत्र्य प्रभावित होत असेल असे कोणत्याही प्रकारचे भेदभाव किंवा अधिवक्तव्य न करणे.

## समाजाप्रति असलेली कर्तव्ये

- स्त्रिया, मुले, जखमी, आजारी आणि वृद्ध व्यक्तींचा आदर करणे.
- समाजसेवा, शिक्षण, धार्मिक उपक्रम, सांस्कृतिक उपक्रम इत्यादीच्या माध्यमातून धर्मादाय कार्य करणे.
- इतरांच्या अधिकारांचा आणि जबाबदारींचा आदर करणे.
- इतरांच्या विरुद्ध खोटे आरोप किंवा तक्रारी न करणे.
- कायदे आणि नियमांचा गैरवापर न करणे.
- जातीय, भाषिक, धार्मिक किंवा इतर कोणत्याही कारणास्तव इतर व्यक्तींचे स्वातंत्र्य प्रभावित होत असेल असे कोणत्याही प्रकारचा भेदभाव किंवा अधिवक्तव्य न करणे.
- प्रत्येक समाजाशी संबंधित नैतिक आणि नीतीविषयक मूल्यांचे अनुसरण व पालन करणे.

व्यक्तीची राष्ट्र व समाजाप्रति अनेक कर्तव्ये आहेत. वरील कर्तव्ये ही फक्त वानगीदाखल आहेत. राष्ट्र आणि समाजाद्वारे निर्धारित कर्तव्याचे काटेकोर पालन शाश्वत विकासासाठी योगदान देते. आधुनिक संदर्भात, अनेक लोक इतरांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी असलेल्या कर्तव्यांचा स्वीकार न करता केवळ स्वतःच्या अधिकारांचा विचार करतात.

व्यक्तीच्या कर्तव्य दृष्टिकोनातील या अवनतीने समकालीन युगात अनेक उलथापालथी घडून आल्या आहेत. जर लोक आपल्या कर्तव्याप्रति जागृत असतील, तर राष्ट्र व त्यांच्या संस्थादेखील कोणत्याही विचालनाशिवाय आपल्या कर्तव्याचे आपोआप पालन करतील. कर्तव्याचे प्रामाणिकपणे केलेले पालन आणि अधिकारांच्या योग्य उपयोगाने निश्चितपणे समस्या मुक्त राष्ट्र व समाज निर्माण होणे शक्य आहे.

## मूल्य म्हणून कर्तव्य



(घटक १ वाचा, आणि कर्तव्य व मूल्ये या संकल्पनांमधील संबंध लावा.) एखाद्या व्यक्तीने केलेली कृत्ये ही आवड आणि वर्तन यावर आधारित असतात. कर्तव्य हा मूल्य प्रणालीचा एक मुख्य घटक असल्याने, ती व्यक्तींमध्ये अनेक मूल्यांची रूजवणूक करतात. आपण वरीलप्रमाणे अनेक कर्तव्ये व अधिकार तसेच त्यांच्यातील संबंधांचे परिक्षण केल्याने, कर्तव्ये निश्चितपणे व्यक्तीच्या नैतिक, नीतीविषयक आणि सामाजिक वर्तनाचे नियमन करण्यासाठी मुख्य मूल्य म्हणून स्थापित करण्यात आली आहेत.

प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत, अनेक शास्त्रे, मुत्सद्दी व्यक्ती आणि विविध धार्मिक ग्रंथांनी, व्यक्तींच्या अनावश्यक प्रवृत्तींना नियमित करण्यासाठी व एक निरोगी समाज किंवा राष्ट्र निर्माण करण्याकरिता आणि त्याला प्रोत्साहन देण्यासाठी, कर्तव्यांवर आधारित मूल्यप्रणालीचे समर्थन केले आहे. म्हणूनच, केवळ आपल्या नैतिक आणि कायदेशीर कर्तव्यांच्या पालनाने ऐक्य आणले जाऊ शकते आणि जीवन, स्वातंत्र्य व समतेच्या विकासातून संपूर्ण मानव अधिकाराची हमी मिळण्यास मदत होईल.

यानुसार कर्तव्यांवरील विश्वासाची पूर्तता करण्यासाठी, मानव अधिकार वैश्विक घोषणापत्रातील कलम २९(२)च्या माध्यमातून, स्पष्टपणे व्यक्तींवर त्यांच्या अधिकारांचा दावा करण्यापूर्वी, एक कल्याणकारी राष्ट्र किंवा समाजाचा विकास करण्यासाठी सार्वजनिक आणि नैतिक स्वरूपाचे कर्तव्य सोपवते. हे कलम खालील प्रमाणे आहे:

'आपले अधिकार व स्वातंत्र्य यांचा उपभोग घेताना इतरांचे अधिकार व स्वातंत्र्य यास योग्य मान्यता मिळावी व त्यांचा योग्य तो आदर राखला जावा आणि लोकशाही समाजव्यवस्थेत नीतीमत्ता, सार्वजनिक सुव्यवस्था व सर्वसाधारण लोकांचे कल्याण यासंबंधातील न्याय्य अशा आवश्यक गोष्टी पूर्ण केल्या जाव्यात, या आणि केवळ याच कारणासाठी कायद्याने ज्या मर्यादा घालून दिल्या असतील त्याच मर्यादांच्या आधीन प्रत्येक व्यक्तीस राहावे लागेल.'

वरील संक्षिप्त चर्चा स्पष्टपणे सुचवते की, कर्तव्य एखाद्या व्यक्तीचे प्रथम मूलभूत मूल्य आहे ज्याचा उपयोग अधिकारांचे संरक्षण किंवा प्राप्तीची अपेक्षा करण्यापूर्वी, कोणत्याही विचलनाशिवाय सर्वकाळ केला जातो.

वरील चित्र सत्यसाई संस्थेद्वारे युवकांमध्ये मानवी मूल्ये रुजवण्यासाठी विकसित करण्यात आले आहे. चित्राचा उद्देश परस्परावलंबित्वाच्या गरजा विकसित करणे आणि व्यक्तीचे स्वतःच्या प्रति, इतरांच्या आणि समाज किंवा राष्ट्राच्या प्रति असलेल्या कर्तव्यांचे महत्त्व स्पष्ट करणे असा आहे.

## अधिकार आणि कर्तव्ये यांच्या दरम्यान असलेले आंतर संबंध

'अधिकार' आणि 'कर्तव्ये' दोन्ही संकलपना अर्थपूर्ण शब्दसमूह एकत्र अस्तित्त्वात आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, एखाद्या व्यक्तीचे मूल्य आणि वर्तणूकीच्या पद्धतींचे नियमन/नियंत्रण करण्यासाठी अधिकार व कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकीकडे, मानवी व्यक्तिमत्त्व आणि वर्तन विकसित करण्यासाठी अधिकार महत्त्वाचे आहेत, तर दुसरीकडे कर्तव्ये सामाजिक कल्याणासाठी व्यक्तींच्या योगदानाचे महत्त्व निर्देशित करतात. एका अर्थाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही स्तरावर विविध कायदे आणि नियमांद्वारे हमी दिलेल्या अधिकारांची जाणीव कर्तव्याच्या ध्येयातून होते. हेच तत्त्वज्ञान राष्ट्रांवर नागरिकांच्या प्रति असलेल्या त्यांच्या कर्तव्यांचे पालन करण्यासाठी लागू होते. जगभरातील व्यक्तींच्या अधिकाराच्या संरक्षणात राष्ट्रांद्वारे उल्लंघनाचे वाढते प्रमाण लक्षात घेता संयुक्त राष्ट्र आणि नागरी संस्थांसहित विश्व समुदायाच्या इतर घटकांनी समकालीन युगात अधिकारांऐवजी कर्तव्यांवर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. प्रो. हॅरोल्ड जस्टिन लास्की यांच्या मते, अधिकार आणि कर्तव्य यांतील संबंध खालीलप्रमाणे आहेत:

### (अ) एखाद्याचे अधिकार दुसऱ्याचे असलेले कर्तव्य सुचविते.

याचा अर्थ असा की एखाद्या व्यक्तीचे प्रत्येक अधिकार आपोआप इतरांवर कर्तव्य लादतात. उदाहरणार्थ, मुक्तपणे संचार करण्याचे, स्वातंत्र्याचे किंवा गोपनीयतेचे अधिकार, इतरांवर एखाद्याच्या अधिकारात कायद्याने नियमित केल्याशिवाय व्यत्यय न आणण्याचे कर्तव्य सोपवतात.

### (ब) एखाद्याचा अधिकार हा इतरांच्या समान अधिकारास मान्यता देण्याचे कर्तव्य सुचवितो.

याद्वारे असे सुचविले जाते की, अधिकारांचा प्रत्येक उपयोग हा निर्बंधांच्या आधीन आहे. उदाहरणार्थ, एखाद्याला भाषण आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आहे पण, त्याचबरोबर, प्रत्येकाने हे लक्षात घ्यायला हवे की मुक्त भाषण आणि अभिव्यक्तीच्या प्रयोगाने इतरांचे अधिकार किंवा त्यांचे जीवन, व्यक्तिगत स्वातंत्र्य किंवा प्रतिष्ठा कोणत्याही प्रकारे प्रभावित होता कामा नये.

### (क) एखाद्याने त्याच्या अधिकारांचा उपयोग सामाजिक हितांच्या प्रसारासाठी करावा.

जर कोणतीही व्यक्ती अधिकारांचा गैरवापर करण्याचा प्रयत्न करत असेल, ज्यामुळे इतरांचे किंवा समाज किंवा राष्ट्राचे अधिकार प्रभावित होत असतील, तर अशा कृत्यांना टाळण्यासाठी योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे कर्तव्य सरकारचे आहे. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीने लोकांच्या किंवा एखाद्या धर्म किंवा समाजातील विशिष्ट वर्गाबद्दल चुकीच्या स्वरूपातील गोष्टींचा प्रसार करण्यात भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा गैरवापर करण्याचा प्रयत्न केल्यास, राष्ट्र कायदेशीर कारवाई करू शकते. अशा प्रकारे राज्याने केलेली कोणतीही कारवाई न्याय्य असेल.

### (ड) राष्ट्र प्रत्येकाच्या अधिकारांची हमी आणि संरक्षण देत असल्याने राष्ट्राला समर्थन देणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

राष्ट्र किंवा राज्य हा एक मध्यवर्ती घटक असल्याने, सर्व व्यक्तींच्या सामाजिक आणि कायदेशीर बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे. वरील वाक्यानुसार, सामान्यत: प्रत्येकाकडून राष्ट्राच्या सर्व कायदेशीर प्रयत्नाचे समर्थन करणे अपेक्षित आहे.

वरील चर्चा, समाजात व्यक्तींकडे असलेल्या अधिकारांचे प्रकार आणि त्यांचे महत्त्व स्पष्टपणे समोर आणते. तसेच कर्तव्यांच्या महत्त्वावर आणि दोन्हीमध्ये असलेल्या अंतरसंबंधांवरदेखील लक्ष केंद्रित करते.

## सारांश

### (अ) अधिकार

- अधिकारांचे विविध अर्थ आहेत. तथापि, कायद्यासमोर ते कायदेशीर आणि नैतिक हक्क आहेत, ज्याचे प्रत्येकाने पालन करणे आवश्यक आहे.
- अधिकारांना कायदेशीर मान्यता आहे. ज्याचे उल्लंघन केल्याने कायदेशीर कारवाई होते.
- जन्मत: मानव म्हणून मुक्तपणे उपभोग घेण्यासाठी मिळालेले नैसर्गिक अधिकार काही मूलभूत अधिकारांची हमी देतात.
- व्यक्तींना कायदेशीर मर्यादांच्या आधीन राहून कोणत्याही हस्तक्षेपाविना मुक्तपणे त्यांच्या अधिकारांचा आनंद/फायदा घेण्यासाठी, कायदा कायदेशीर अधिकार प्रदान करतो.

- दाव्याचे अधिकार म्हणजे, एखादी व्यक्ती तिच्या अधिकारांचे उल्लंघन होण्यापासून इतर व्यक्तींना प्रतिबंध करण्यासाठी कायदेशीर उपाय अवलंबू शकते.
- स्वातंत्र्याचे अधिकार हे इतर व्यक्तीवर कोणतीही बंधने किंवा कर्तव्य न लादता प्रत्येक व्यक्तीद्वारे मुक्तपणे उपभोगले जाणारे अधिकार आहेत. उदाहरणार्थ, जोराने हसणे आणि धार्मिक कार्य करणे.
- सकारात्मक अधिकार, अवलंबित्त्व अधिकार म्हणून वर्णनीकृत अधिकार आहेत ज्यांचा उपयोग राष्ट्राद्वारे किंवा समाजाद्वारे दिलेल्या हमीवर केला जाऊ शकतो. हे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार म्हणून वर्णनीकृत आहेत.
- नकारात्मक अधिकार, हे इतर व्यक्तीच्या अधिकारांचा आदर करण्याचे कर्तव्य व्यक्तीवर लादतात. हे अधिकार नागरी आणि राजकीय अधिकार आहेत.
- वैयक्तिक अधिकार हे आर्थिक, राजकीय आणि कायदेशीर आहेत. ते व्यक्तींना त्यांचे इच्छित स्वातंत्र्य आणि मुक्ततेचा आनंद घेण्यासाठी संबंधित असलेले अधिकार आहेत.
- समूह अधिकार हे एका समाजात लोकांच्या विशिष्ट गटाशी संबंधित असलेले अधिकार आहेत. ते त्यांना दिलेल्या विशिष्ट महत्त्वामुळे समाजातील इतरांच्या सर्वसाधारण अधिकारापेक्षा भिन्न असू शकतात.
- सार्वत्रिक अधिकार हे जगभरातील लोकांशी संबंधित, वंश, लिंग, धर्म, भाषा किंवा कोणताही भेद न करता आणि कोणतेही इतर सामाजिक, आर्थिक, राजकीय किंवा कायदेशीर संबंध नसलेले अधिकार आहेत.

## (ब) कर्तव्ये

- जबाबदारी आणि कर्तव्य यामध्ये फरक आहे. जबाबदारी मुख्यतः नैतिक आणि नीतीविषयक गोष्टींमधून उद्भवते. कर्तव्य, कायदेशीर स्वरूपाचे जबाबदारी मधून उद्भवते.
- नैसर्गिक कर्तव्ये आपल्या सर्वांना बंधनकारक आहेत. अधिग्रहित कर्तव्ये विशिष्ट कर्तव्यांच्या पालनाद्वारे स्वीकारली जातात.
- सकारात्मक कर्तव्ये, चांगल्या गोष्टी करण्याची जबाबदारी सोपवतात. नकारात्मक कर्तव्ये आपल्याला वाईट गोष्टी करण्यापासून प्रतिबंधित करतात.

- परिपूर्ण कर्तव्ये कोणत्याही कर्तव्याचे निर्वहन करताना नेहमी प्रामाणिक असण्याची अपेक्षा करतात.
- व्यक्तींची कर्तव्ये राष्ट्र, समाजाप्रति आहेत तसेच स्वतःच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्याप्रति सुद्धा आहेत.
- कर्तव्य हे व्यक्तींना, समाज आणि व्यक्तीचे हित प्रोत्साहित करण्यासाठी नेहमी त्यांच्या नैतिक आणि कायदेशीर जबाबदाऱ्यांचे पालन करण्यासाठी प्रेरित करेल असे एक मूल्य आहे.
- अधिकार आणि कर्तव्य यामध्ये वेगळे न करता येणारे संबंध आहेत. कर्तव्यांचे पालन करणे इतर काही नसून स्वतः कर्तव्यतत्पर होण्यासाठी आणि समाज व राष्ट्राप्रति सत्कार्य करण्यासाठी स्वयंपालन करणे हे आहे.

**नमुना प्रश्न**

**एका शब्दात उत्तरे लिहा**

१. **'राईट' शब्दाचा मूळ शब्द काय आहे?**

इंग्रजी शब्द 'रेहत' आहे.

२. **आधुनिक अर्थाने अधिकाराची व्याख्या............. आहे.**

दीर्घ व निर्णायक

३. **अधिकार किती भागात विभागले जाऊ शकतात?**

आठ

४. **कर्तव्ये................सुचवितात.**

कायदेशीर जबाबदारी

५. **मूल्ये म्हणून कर्तव्ये............प्रोत्साहित करतात.**

समाज आणि व्यक्तीचे कल्याण

**बहुपर्यायी प्रश्न**

१. **एका नकारात्मक अधिकार धारकाची पात्रता काय आहे?**

(अ) सकारात्मक विचार (ब) अहस्तक्षेप

(क) चांगले सकारात्मक (ड) वरील पैकी कोणतेही नाही

२. **कायदेशीर अधिकाराचे पर्यायी नाव काय आहे?**

(अ) वैधानिक अधिकार (ब) मालकीचे अधिकार

(क) निष्क्रिय अधिकार (ड) शारीरिक अधिकार

३. **नैसर्गिक कर्तव्ये कोणावर बंधनकारक असतील?**

(अ) विशेष लोक (ब) आपण सर्व

(क) वृद्ध लोक (ड) महिला

४. **कोणत्या वर्षी संयुक्त राष्ट्र सभेने मानवी कर्तव्यांचे महत्त्व ओळखणारा ठराव स्वीकारला ?**

(अ) १९९८ (ब) १९९७ (क) १९९९ ड) २०००

**उत्तरे: (१) ब (२) अ (३) ब (४) अ**

या घटकामध्ये आंतरराष्ट्रीय कायदे आणि त्या अंतर्गत येणाऱ्या मानव अधिकारांसह इतरही क्षेत्रातील संज्ञांची ओळख करुन देण्यात आली आहे. या संज्ञांचा फक्त अर्थ सांगणे, त्याचे थोडक्यात स्पष्टीकरण देणे एवढेच या घटकामध्ये अपेक्षित असल्यामुळे या संज्ञांच्या फक्त थोडक्यात व्याख्या देण्यात आल्या आहेत. त्यातील कायदेविषयक गुंतागुंतीचे तपशील इथे देण्यात आलेले नाहीत.

## कायदेशीर तरतुदींबाबतचे टिपण

दोन देशांमधील दैनंदिन पातळीवरचे संबंध आणि व्यवहार सुरळीत चालत राहावे म्हणून त्यांच्यात अनेक करार होत असतात. असे करार या दोन देशांमधील कायदेशीर संबंधांची चौकट तर प्रस्थापित करतातच, शिवाय आंतरराष्ट्रीय कायद्यातील तत्त्वांना शक्य तितक्या प्रमाणात अधोरेखित करतात. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विकासात आजपर्यंत असे अनेक द्विपक्षीय वा बहुपक्षीय आंतरराष्ट्रीय करार करण्यात आले आहेत. मात्र आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत विविध देशांमध्ये होणाऱ्या अशा करारनाम्यांना विविध नावांनी संबोधले जाते. सर्वसाधारणपणे त्यांना करार असे म्हटले जात असले तरी त्यातही तपशीलातील फरकानुसार करार, वचननामा, सनद, अभिसंधी, परिशिष्ट मसुदा आणि जाहीरनामा असे विविध शब्द त्यासाठी वापरण्यात आले आहेत. या कायदेशीर तरतुदींच्या विविध प्रकारांची माहिती घेण्याआधी या संलेख बंधनकारकतेसंबंधी काही बाबी स्पष्ट करणे गरजेचे आहे.

आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये कोणतेही करारनामे किंवा वाटाघाटी करून झालेले करारनामे किंवा त्या देशांच्या स्वाक्षऱ्या झालेले करारनामो आपोआप त्या देशांच्या प्रतिनिधींच्या नुसत्या सह्या झाल्याने अंमलात येत नाहीत. करारात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या देशांच्या संख्येनुसार किती देशांनी मान्यता दिल्यानंतर कराराला वैधता प्राप्त होईल याचाही निर्णय करार करतानाच घेतला जातो. त्यानुसार तितक्या देशांच्या प्रतिनिधींच्या सह्या झाल्यानंतरच त्या कायदेशीर तरतुदी अंमलात येत असतात. याचाच अर्थ असा की, असा कोणताही कायदेशीर करार मान्यता मिळाल्यानंतर लगेचच किंवा काही काळानंतरही प्रत्यक्ष अंमलात येऊ शकतो. या संदर्भात व्हिएन्ना संकेतांचे उदाहरण घेता येईल. तहासंबंधीच्या कायद्यांबाबतच्या या तरतुदींना देशांनी १९६९ सालीच मान्यता दिली होती. मात्र प्रत्यक्षात त्याच्या अंमलबजावणीस १९८० साली सुरुवात झाली. (आंतरराष्ट्रीय करारांना सर्वसाधारणपणे त्याच्यावर जिथे सह्या होतात त्या शहराचे वा देशाचे नाव दिले जाते.) एखादा करार अशाप्रकारे उशिरा जरी अंमलात आला तरी त्याच्यासंबंधीच्या उल्लेखामध्ये त्याला ज्यावर्षी मूळ मान्यता मिळाली होती त्याच वर्षाचा संदर्भ दिला जातो. अशा कायदेशीर तरतुदी प्रत्यक्ष अंमलात जरी आल्या तरी ज्या देशांनी त्याच्यावर

प्रत्यक्ष वैधतेचा शिक्का उमटविलेला असतो त्याच देशात त्या लागू होतात, नुसत्या सह्या केलेल्या देशांमध्ये नाही. याचाच अर्थ असा की, करारावर सही केल्यानंतर प्रत्येक देशाला अंमलबजावणीच्या दृष्टीने त्यावर स्वतंत्रपणे वैधतेची मोहरही उमटवावी लागते. काहीवेळा तर अशी वैधतेची मोहर उमटविल्यानंतरही एखादा देश संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीसांना तसे अधिकृतपणे कळवू शकतो की, करारातील सर्वच कलमे आम्ही स्वीकारत नसून काहींबाबत आम्हाला आक्षेप आहे. जर त्यांच्या या हरकतवजा विनंतीला आंतरराष्ट्रीय समुदायाची मान्यता मिळाली तर त्या देशाचे त्या कराराप्रति उत्तरदायित्त्व त्याला मान्य असलेल्या कलमांपुरतेच मर्यादित राहाते. त्यामुळे त्या देशाला तिथल्या स्थानिक गरजा व परिस्थितीनुसार निर्णय घेता येतात. उदाहरणार्थ स्त्रीविरोधी सर्व भेदभाव निर्मूलन विषयक आंतरराष्ट्रीय संकेतांच्या (CEDAW) संदर्भात भारताने अशी भूमिका घेतली आहे.

या संकेतांतील काही तरतुदींवर आक्षेप नोंदविताना भारताने असे म्हटले आहे की, या तरतुदींनुसार स्थानिक कायदे केले गेले तर देशातील धार्मिक सलोख्याला धोका निर्माण होईल. त्यामुळे या तरतुदी स्वीकारता येणार नाहीत. (भारताने आक्षेप घेतलेल्या तरतुदींमधील एक प्रमुख तरतुद समान नागरी कायदा लागू करण्यासंबंधीची आहे.)

## करार (Treaty)

करार (शस्त्रसंधि) या संकल्पनेची १९६९ पर्यंत नेमकी अशी व्याख्या करण्यात आली नव्हती. मात्र १९६९ साली आंतरराष्ट्रीय पातळीवरील तत्त्वे आणि कायदेशीर तरतुदींच्या बंधनकारकतेबाबतची एक चौकट तयार करण्याच्या उद्देशाने व्हिएन्ना करार स्वीकारण्यात आला. त्यालाच करारविषयक कायद्यासंबंधी व्हिएन्ना करार-१९६९ असे म्हटले जाते. त्यानुसार संबंधित देशांदरम्यान कोणत्याही नावाने ओळखली गेलेली परंतु आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार नियमित झालेली लिखित आंतरराष्ट्रीय स्विकृती म्हणजे त्या देशांदरम्यानचा लिखित करार. त्याच्या कराराची तत्त्वे एका किंवा त्यापेक्षा अधिक संचामध्ये समाविष्ट केलेली असू शकतात. जर ती एकापेक्षा जास्त संचांमध्ये समाविष्ट केलेली असतील, तर संच आणि तत्त्वे यांचे करारातील बंधानानुसार एकत्रित वाचन केले जाणे अपेक्षित आहे.

## द्विपक्षीय करार (Bilateral Treaty)

'द्विपक्षीय करार' म्हणजे दोन देशांनी त्यांच्यातील विशिष्ट हेतूंसाठी केलेला आणि त्यांच्यापुरता मर्यादित असलेला करार. (उदाहरणार्थ अणुऊर्जेबाबत भारत आणि अमेरिकेत झालेला करार).

अशा करारांच्या अंमलबजावणीसंदर्भात कुठल्याही वेगळ्या वैधतेच्या वा आक्षेपांच्या प्रक्रियेची गरज नसते. हे करार त्यांचे निहित उद्दिष्ट गाठेपर्यंत अस्तित्त्वात असतात. ते उद्दिष्ट साध्य झाले, की असे करार अधिकृत सुचनेद्वारे संपविले जाऊ शकतात.

## बहुपक्षीय करार (बहुराष्ट्रीय करार) (Multilateral Treaty)



आंतरराष्ट्रीय कायद्याचे नवे तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी वा प्रस्थापित संकेतात्मक/प्रमाण तत्त्वांना कायद्याचे रुप देऊन आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध व्यवहारांना नियमित करण्यासाठी अनेक देशांनी मान्य केलेला समझौता/करार म्हणजे बहुपक्षीय करार. अशा करारांचे स्वरुप देशांतर्गत लागू होणाऱ्या कायद्यासारखे असते. अशा करारामुळे त्या देशांमधील संबंधांना समान नियम लागू होतात. एकोणिसाव्या शतकापासून असे बरेच बहुपक्षीय करार झाले आहेत. सर्वसाधारपणे बहुपक्षीय करारांना वचननामा किंवा संकेत असे संबोधले जाते. स्वाक्षऱ्या, वैधता वगैरे तांत्रिक सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर अशा बहुपक्षीय करारात सहभागी झालेल्या देशांना त्यांच्या कार्यक्षेत्रात करारातील तरतुदींशी सुसंगत असे कायदे करावे लागतात. उदाहरणार्थ 'ट्रीप्स करारामुळे' (TRIPS Agreement ) भारत सरकारला स्वामीत्त्व हक्क कायदा, व्यापारी बोधचिन्ह कायदा यासारख्या कायद्यांमध्ये अनुरुप बदल घडवून आणावे लागल आहेत.

## आंतरराष्ट्रीय संकेत आणि वचननामे (आंतरराष्ट्रीय अभिसंधि आणि प्रसंविदा) (Convention and Covenant )

नवे नियम वा संकेत प्रस्थापित करण्यासाठी वा अस्तित्त्वात असलेल्या आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या तत्त्वांमधील विसंगती दूर करण्यासाठी अनेक देशांनी एकत्र येऊन केलेल्या समझौत्याला/कराराला 'आंतरराष्ट्रीय संकेत किंवा वचननामा' असे म्हणतात. राष्ट्रामधील करार करण्याच्या प्रक्रियेतील तांत्रिकता पूर्ण झाल्यानंतरही एखादा सहभागी देश त्यानुसार स्थानिक पातळीवर कायदे करण्यासाठी बराच अवधी घेऊ शकतो. काही वेळा अशा संकेताबाबतच्या संघर्षांच्या मुद्द्यावर सहभागी देश द्विपक्षीय कराराद्वारे तोडगा शोधू शकतात. मात्र वचननाम्याबाबत त्यातील तत्त्वांनुसार स्थानिक पातळीवर कायदे करण्याचे बंधन सहभागी देशांवर असते. सर्वसाधारपणे जगभरातील लोककल्याणाच्या

दृष्टीने राष्ट्रीय पातळीवर व्यक्तीच्या हितांचे रक्षण करण्यासाठी शासनव्यवस्थेची कर्तव्ये काय असतात याचे मार्गदर्शन वचननाम्यात केलेले असते. नागरी आणि राजकीय हक्क, आर्थिक-सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क यासंबंधाने प्रसृत करण्यात आलेल्या वचननाम्यांमुळे अनेक सरकारांना त्यानुसार व्यक्तींना हमी देणयात आलेल्या अनेक प्रकारच्या अधिकारांची आणि कर्तव्ये यांची पुनर्रचना करावी लागली आहे.

## जाहीरनामा/घोषणापत्र (Declaration)

संयुक्त राष्ट्रांसारख्या एखाद्या आंतरराष्ट्रीय संघटनेने घालून दिलेली तत्त्वे आणि सदस्य राष्ट्रांनी त्यांचे पालन करावे या हेतूने त्याचे विषद केलेले महत्त्व याला 'जाहीरनामा' असे म्हटले जाते. जाहीरनामा हे मुख्यत्त्वे धोरणविषयक विधान असते. त्यात त्या संघटनेचा दृष्टिकोन स्पष्ट करण्यात आलेला असतो. त्यामुळे जाहीरनाम्याला कायदेशीर वैधता नसते आणि तो सदस्य राष्ट्रांवर बंधनकारक नसतो. सदस्य राष्ट्रे अशा जाहीरनाम्यांतील तत्त्वांवर तपशीलवार चर्चा करून त्याचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी द्विपक्षीय करार वा संकेत प्रस्थापित करू शकतात. उदाहरणार्थ १९४८ साली संयुक्त राष्ट्रांनी स्वीकारलेल्या मानव अधिकार विषयक वैश्विक जाहीरनाम्यातील तत्त्वांच्या आधारे नंतर १९६६ मध्ये नागरी आणि राजकीय हक्कांचा वचननामा आणि आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा वचननामा बनविण्यात आला.

## परिशिष्ट मसुदा (Protocol)

परिशिष्ट मसुदा (राजशिष्टाचार) या संकल्पनेला इंग्रजीत "protocol" असे म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात प्रोटोकॉल या शब्दाला राजशिष्टाचार असाही अर्थ आहे. परंतु आंतरराष्ट्रीय करारनाम्याच्या संदर्भात तो अर्थ अभिप्रेत नाही. कधीकधी समझौत्यामध्ये सहभागी देशांना त्यात काही बदल घडवून आणावेसे वाटतात. त्यात काही तरतुदी नव्याने समाविष्ट कराव्याशा वाटतात वा काही काढून टाकाव्याशा वाटतात. अशा दुरुस्त्या वा सुधारणा सर्वसाधारपणे लिखित स्वरुपात असतात आणि वाटाघाटी, लिखित आशय, सह्या, वैधता वगैरे साऱ्या औपचारिकता पार पडल्यानंतर त्या स्वीकारल्या जातात आणि करार, संकेत वा वचननामा आदींच्या मुख्य मसुद्याला परिशिष्ट मसुदा म्हणून जोडल्या जातात. एखाद्या देशाने कराराच्या मूळ मसुद्याला मान्यता दिलेली असते मात्र परिशिष्टाला नाही. अर्थातच अशा परिस्थितीत त्या मसुदा परिशिष्टातील तरतुदी त्या देशाला लागू होत

नाहीत. उदाहरणार्थ भारताने नागरी आणि राजकीय हक्कांबाबतच्या वचननाम्याला मान्यता दिली आहे मात्र त्याच्या मसुदा परिशिष्टाला नाही. त्यामुळे भारताचा कोणताही नागरिक सरकारकडून झालेल्या मानव अधिकार भंगाबाबत देशांतर्गत पातळीवर काही निवाडा मिळाला नाही तर त्याविरुद्ध संयुक्त राष्ट्रांच्या मानव अधिकार आयुक्तांकडे दाद मागू शकत नाही.

### परिषद (Conference)

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संदर्भात परिषदांचे कार्य महत्त्वाचे असते. बहुपक्षीय करारनामा करण्यासाठी एखाद्या विषयावर सदस्य देशांमध्ये जी चर्चा घडून येते त्याला 'परिषद' असे म्हणतात. काही वेळा परिषदांमधून सर्वसाधारण तत्त्वे मांडली जातात वा अस्तित्त्वात असलेल्या कायद्यांचा आढावा घेतला जातो वा त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाय सुचविले जातात. उदाहरणार्थ १९९३ सालच्या मानव अधिकार विषयक परिषदेने अशा अनेक तत्त्वांचे सुतोवाच केले, की जे पुढे स्वतंत्रपणे संकेत, ठराव वा संयुक्त राष्ट्रांचे जाहीरनामे म्हणून स्वीकारले गेले. सर्व देशांनी मानव अधिकार विषयक शिक्षण देण्याला सक्तीने प्रोत्साहन द्यावे, अशी त्यात शिफारस करण्यात आली होती.

### ठराव (Resolutions)

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेने वा आमसभेने वा इतर कोणत्याही संयुक्त राष्ट्रांच्या गटाने तयार केलेल्या कायदेशीर मसुद्याला 'ठराव' असे म्हणतात. संयुक्त राष्ट्रांनी अशा पद्धतीने केलेले ठराव सदस्य राष्ट्रांवर बंधनकारक असतात.

### विधी व सनद (शासनपत्र व संविधी) (Charter and Statute)

एखाद्या आंतरराष्ट्रीय संघटनेचे कार्य, रचना आणि अधिकार यासंबंधीची तत्त्वे मांडणाऱ्या आणि सार्वभौम देशांनी तशी रितसर मान्यता दिलेल्या कायदेशीर मसुद्यास वा समझौत्यास/करारास त्या संघटनेचे 'घोषणापत्र वा सनद' असे म्हटले जाते. उदाहरणार्थ संयुक्त राष्ट्रांचे घोषणापत्र किंवा आंतरराष्ट्रीय न्यायालयाची सनद.

### कार्यकारी आदेश (Executive Orders)

एखादा आंतरराष्ट्रीय करार स्वीकारल्यानंतर तो अंमलात आणण्यासाठी एखाद्या देशाच्या

सार्वभौम सत्ताधीशांनी दिलेले आदेश म्हणजे 'कार्यकारी आदेश'. त्यासंबंधी एखाद्या मुद्द्याबाबत काही विसंगती वा विरोधाभास आढळला तर अशा आदेशाद्वारे सरकारला आपली नेमकी भूमिकाही स्पष्ट करता येते. मानव अधिकार विषयक वा इतर विषयांमधील आंतरराष्ट्रीय कायद्यांबाबत काही तंटा निर्माण झाल्यास तो सोडविण्यासाठीही या आदेशांचा वापर करता येतो.

## सारांश

- देशांमधील दैनंदिन संबंधांना नियमित करणारा आणि कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक असलेला समझौता म्हणजे 'करार'.
- एखाद्या आंतरराष्ट्रीय कायद्यातील वादग्रस्त तरतुदीबाबत निराकरण करण्यासाठी वा आपसातील संबंधांवर अंकुश ठेवणारी तत्त्वे प्रस्थापित करण्यासाठी दोन देशांनी केलेल्या समझौत्याला 'द्विपक्षीय करार' असे म्हणतात.
- आंतरराष्ट्रीय कायदा आणि त्याच्या विविध शाखा याबाबत समान नियम करण्याच्या उद्देशाने दोनापेक्षा जास्त देशांनी एकत्र येऊन केलेला समझौता म्हणजे 'बहुपक्षीय करार'.
- 'संकेत' म्हणजे असा बहुपक्षीय समझौता की ज्यामध्ये सदस्य राष्ट्र आंतरराष्ट्रीय कायद्याची सर्वसाधारण तत्त्वे मांडतात. बहुतेकवेळा संयुक्त राष्ट्रासारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या व्यासपीठावरून हे समझौते केले जातात.
- 'वचननामा' हा आंतरराष्ट्रीय संघटनेच्या पुढाकाराने लागू करण्यात आलेला बहुपक्षीय मसुदा असतो. एखादा देश त्यावर सही करतो आणि नंतर त्यावर वैधतेचे शिक्कामोर्तब करतो तेव्हा त्या देशाला त्यातील तत्त्वानुसार स्थानिक कायदे करणे वा सुसंगत करणे बंधनकारक असते.
- नवे संकेत प्रस्थापित करण्यासाठी देशांच्या राजनैतिक प्रतिनिधींदरम्यान झालेली चर्चा म्हणजे 'परिषद'.
- अस्तित्त्वात असलेल्या समझौत्यातील त्रुटी वा उणीवा दूर करण्यासाठी वा नवीन तरतुदींची भर घालण्यासाठी म्हणून जोडण्यात आलेला अतिरिक्त दस्तऐवज म्हणजे 'परिशिष्ट दस्तऐवज'.
- 'घोषणापत्र वा सनद' म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटनेचे कार्य, रचना आणि अधिकार स्पष्ट करणारा आणि सदस्य देशांनी मान्यता दिलेला कायदेशीर दस्तऐवज.
- कायदेशीर तत्त्वांचे पालन करण्याचे आदेश देणारा कायदेशीर दस्तऐवज म्हणजे 'ठराव'.
- आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संदर्भात अंतर्गत ध्येयधोरणाची दिशा ठरविणारा आणि राष्ट्रप्रमुखांनी प्रस्तुत केलेला आदेश म्हणजे 'कार्यकारी आदेश'.

**एका शब्दात उत्तरे लिहा**

१) **घोषणापत्र म्हणजे ------------ आहे.**
कायदेशीर दस्तऐवज

२) **एखाद्या देशाच्या सरकारने अंतर्गत ध्येयधोरणांच्या संदर्भात प्रसृत केलेला मसुदा म्हणजे?**
कार्यकारी आदेश

३) **समझौत्यातील तत्त्वांनुसार स्थानिक कायदे करणे सदस्य राष्ट्रांना कोणत्या बाबतीत बंधनकारक असते?**
वचननामा

४) **आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संदर्भात सर्व समझोत्यांना करार असे म्हणतात. चूक की बरोबर ?**
चूक

५) **कोणत्या तांत्रिक सोपस्कारानंतर एखादा आंतरराष्ट्रीय समझौता सदस्य राष्ट्रांवर बंधनकारक असतो ?**
वैधता

**बहुपर्यायी प्रश्न**

१) **करार म्हणजे काय?**
(अ) कागदपत्रे (ब) टिपण
(क) प्रासंगिक कागदपत्रे (ड) कायदेशीर समझौता

२) **कार्यकारी आदेशांचा संबंध कशाशी जोडता येतो?**
(अ) अंतर्गत ध्येयधोरणे (ब) बाह्यदेशांबाबत ध्येय धोरणे
(क) आंतरराष्ट्रीय कायदा (ड) तांत्रिक तपशील

३) **आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संदर्भात ठराव कोण करतो?**
(अ) राज्य (ब) आंतरराष्ट्रीय कायद्याच्या कक्षेतील घटक
(क) आंतरराष्ट्रीय संघटना (ड) या पैकी कोणताही पर्याय नाही

४) **घोषणापत्र वा चार्टर (सनद) चा संबंध कशाशी आहे?**
(अ) आंतरराष्ट्रीय नियम (ब) मानव अधिकार
(क) आंतरराष्ट्रीय संघटना (ड) आंतरराष्ट्रीय संघटनेचा एखादा विशिष्ट घटक

**उत्तरे: (१) ड (२) अ (३) क (४) क**


# घटक – ४ संयुक्त राष्ट्रे आणि मानव अधिकार

या घटकात आंतरराष्ट्रीय संदर्भात मानव अधिकारांबाबतच्या विविध वैधानिक तरतुदींचा विकास आणि महत्त्व याची ओळख करुन देण्यात आली आहे. त्यानंतर संयुक्त राष्ट्रांच्या सनदेमध्ये असलेल्या मानव अधिकारांविषयक तरतुदींचेही थोडक्यात स्पष्टीकरण या घटकात करण्यात आले आहे. त्याखेरीज मानव अधिकारांसंबंधी जाहीरनाम्याच्या प्रस्तावनेत (UDHR) नमूद करण्यात आलेल्या उद्दिष्टांचीही ओळख आणि संयुक्त राष्ट्रांचा जाहीरनामा कसा तयार करण्यात आला याचीही माहिती या घटकात करुन देण्यात आली आहे. त्यानंतर त्यातील प्रत्येक कलमाचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

## संयुक्त राष्ट्रांच्या व्यवस्थेवर दृष्टिक्षेप

जगामध्ये शांतता आणि सुरक्षा प्रस्थापित करणे तसेच प्रत्येकाला स्वतंत्र,समान आणि अत्याचारांपासून मुक्त असे जगण्याची परिस्थिती उपलब्ध करुन देणे हेच आंतरराष्ट्रीय कायद्याचे मुलभुत उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हे संबंधित राष्ट्राचे कायदे करणाऱ्या अधिकाऱ्यांनी मानव अधिकारांवर नेहमीच भर दिला आहे. त्यानुसार आंतरराष्ट्रीय कायदेविषयक धोरणांमध्ये लिंग, धर्म आणि वंशभेद विरहित मानव अधिकारांना प्रोत्साहन व संरक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे. त्याच्या परिणामस्वरुप मानव अधिकारांना केवळ आंतरराष्ट्रीय समुदाय आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांच्याच नव्हे, तर देशांतर्गत कायद्यांच्याही संदर्भात मूलभूत तत्त्वांचे महत्त्व प्राप्त होत गेले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर विजयी राष्ट्रांनी (ज्यांना मित्र राष्ट्रे असेही त्यावेळी संबोधले गेले होते, त्यामध्ये इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, तत्कालिन सोविएत युनियन आणि चीन यांचा समावेश होता.) भविष्यात युद्धजन्य परिस्थिती निर्माण होऊ नये आणि कोणतेही वाद शांततामय मार्गाने सुटावेत म्हणून एकत्र येण्यासाठी प्रयत्न सुरु केले. त्यासाठी अनेक चर्चा आणि परिषद सत्र घेण्यात आले, ज्यामुळे भविष्यात जगातील सर्व राष्ट्रांना आणि लोकांना जास्त विश्वासाने आणि स्वातंत्र्याने व प्रतिष्ठेने जीवन जगता येईल. त्यानुसार एक आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याचे ठरवण्यात आले, जी संघटना सदस्य राष्ट्रांमधील सहसंबंधांबाबत एक कायद्याची चौकट निर्माण करेल. अमेरिकेचे तत्कालिन अध्यक्ष फ्रँकलिन डी रुझवेल्ट यांनी १९४२ साली या प्रस्तावित संघटनेसाठी 'संयुक्त राष्ट' असे नाव सुचविले. संयुक्त राष्ट्र संघटना ही जगातल्या स्वतंत्र राष्ट्रांच्या आणि त्यातील जनतेच्या ऐक्याची आणि युद्धाची संकल्पना दूर करून कायमस्वरुपी शांतता प्रस्थापित करण्याच्या निर्धाराचे प्रतीक आहे, अशी त्यांची कल्पना होती. त्यांच्या या कल्पनेला मोठ्या प्रमाणावर स्विकृती मिळाली आणि अखेर १९४५ साली संयुक्त राष्ट संघटनेची स्थापना झाली.






## आमसभा (General Assembly)



संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्व सदस्य देशांच्या प्रतिनिधींचा आमसभेत समावेश असतो. संयुक्त राष्ट्र संघाची सध्याची सदस्य संख्या १९३ इतकी आहे. आमसभेची वर्षातून एकदा म्हणजे सर्वसाधारणपणे सप्टेंबरमध्ये बैठक होते. प्रत्येक सत्राचे अध्यक्ष दरवर्षी निवडले जातात. मानव अधिकारांसंबंधीच्या विविध मुद्द्यांवर देखरेख ठेवण्याचे अधिकार आमसभेला देण्यात आले आहेत.

## सुरक्षा परिषद (Security Council)



जागतिक शांतता आणि सुरक्षा राखण्याची जबाबदारी सुरक्षा परिषदेकडे आहे. या परिषदेची सदस्य संख्या १५ आहेत. त्यातील पाच सदस्य स्थायीस्वरुपी (इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, रशिया आणि चीन)असतात; तर उर्वरित दहा सदस्य अस्थायी स्वरुपाचे असतात. या अस्थायी सदस्यांची नियुक्ती दोन

वर्षांसाठी केलेली असते आणि त्यामध्ये भौगोलिक प्रतिनिधीत्त्व राहील याची खबरदारी घेतली जाते. सुरक्षा परिषद हा सर्वोच्च विभाग असून कोणत्याही मुद्द्यांवर त्या परिषदेचे निर्णय अंतिम असतात. मात्र निर्णयांची अंमलबजावणी होण्यासाठी त्याला परिषदेच्या किमान दहा सदस्य राष्ट्रांची मंजूरी असावी लागते. परिषदेच्या अध्यक्षाचे पद परिषदेच्या प्रत्येक सदस्य राष्ट्राकडे महिनाभरासाठी वर्णनानुक्रमाने येत असते. परिषदेची बैठक केव्हाही घेता यावी यासाठी परिषदेच्या सदस्य राष्ट्रांच्या प्रतिनिधींना न्यूयॉर्कमध्ये सदैव उपलब्ध असावे लागते.

## सचिवालय (Secretoriat)

संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्व विभागांच्या कामांमध्ये समन्वय साधण्याचे काम सचिवालय करीत असेल. सर्व प्रशासकीय कामांचे मुख्य असलेल्या सरचिटणीसांच्या नेतृत्त्वाखाली हे काम होत असेल. सरचिटणीसपदी पाच वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती केली जाते. सरचिटणीसपदी नियुक्त झालेल्या व्यक्तीला बेमुदत मुदतवाढ देण्याची तरतुद आहे, मात्र आजपर्यंत सरचिटणीपदी असलेल्या कोणालाही दोनपेक्षा जास्त मुदतवाढ देण्यात आलेली नाही. सुरक्षा परिषदेच्या शिफारशीवरून आमसभा सरचिटणीसपदी नियुक्ती करते. सरचिटणीस पदावरील व्यक्ती निवडतानाही साधारणपणे भौगोलिक विभागनिहाय प्रतिनिधीत्त्वाचा निकष विचारात घेतला जातो. संयुक्त राष्ट्र संघाच्या विविध विभागांच्या बैठकांसाठी लागणारे अभ्यास, माहिती तसेच इतर सुविधा पुरविण्याची जबाबदारी सचिवालयाकडे असते. सदस्य राष्ट्रांमधील सर्व वैधानिक करारनामेही सचिवालयाकडे जपून ठेवलेले असतात. संयुक्त राष्ट्र संघाच्या विविध विभागांनी सांगितलेल्या कामांची अंमलबजावणी करणे हे सचिवालयाचे काम असते.

संयुक्त राष्ट्र संघाचे सध्याचे सरचिटणीस बान कि मून दक्षिण कोरियाचे असून त्यांची २००७ साली या पदावर निवड झाली. आणि २०१२ सालापासून सुरू होणाऱ्या पाच वर्षांच्या दुसऱ्या कार्यकाळासाठीही त्यांना मुदतवाढ मिळाली आहे. संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस म्हणून आजवर खालील व्यक्तींनी काम केले आहे.-

- ग्लॅडविन जेब, इंग्लंड (२४ ऑक्टोबर १९४५ ते फेब्रुवारी १९४६)- जेब यांनी तदर्थ सरचिटणीस म्हणून काम केले होते.
- ट्रीग्वे ली, नॉर्वे(फेब्रुवारी १९४६ ते १० नोव्हेंबर १९५२)-राजीनामा दिला
- डॅग हॅमर्सजोल्ड, स्वीडन (१० एप्रिल १९५३ ते १८ सप्टेंबर १९६१) - (विमान अपघातात त्यांचे निधन झाले.)

- उ थांट, म्यानमार (३० नोव्हेंबर १९६१ ते ३१ डिसेंबर १९७१)
- कुर्ट वाल्डहेम, ऑस्ट्रीया (१ जानेवारी १९७२ ते ३१ डिसेंबर १९८१)
- जेवीयर पेरेझ डी यूलर, फ्रान्स (१ जानेवारी १९८२ ते ३१ डिसेंबर १९९१)
- बुट्रॉस बुट्रॉस घाली, इजिप्त (१ जानेवारी १९९२ ते ३१ डिसेंबर १९९६)
- कोफी अन्नान, घाना (१ जानेवारी १९९७ ते ३१ डिसेंबर २००६)
- बान की मून, दक्षिण कोरिया (१ जानेवारी २००७ पासून ३१ डिसेंबर २०१६)
- ॲटोनिमो गुटे रीस (१ जानेवारी २०१७ पासून)

## आर्थिक आणि सामाजिक परिषद (Economic and Social Council)



आर्थिक आणि सामाजिक परिषद ही संयुक्त राष्ट्र संघाचा एक मुख्य अंग आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या विविध आर्थिक आणि सामाजिक कार्यांना ही परिषद जबाबदार असते. या परीषदेचे ५४ सदस्य आहेत. ते आमसभेकडून तीन वर्षांच्या कालावधीसाठी निवडले जातात. जगातील विविध भौगोलिक प्रदेशांना प्रतिनिधीत्त्व मिळेल या आधारे ही निवड केली जाते. या परिषदेची दरवर्षी बैठक होते. मानव अधिकारांसंबंधी प्रश्नांवर मुख्यत्त्वे ही परिषद काम करते आणि शिफारशी करते.

## विश्वस्तव्यवस्था परिषद (Trusteeship Council)



पारतंत्र्यातील देशांमधील नागरिकांमध्ये सलोख्याचे संबंध प्रस्थापित व्हावेत आणि हे देश स्वतंत्र व्हावेत हे या परिषदेचे उद्दिष्टे आहेत. लीग ऑफ नेशन्सच्या जबाबदारीखाली असलेल्या किंवा दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहतवादी देशांकडून काढून घेण्यात आलेल्या प्रदेशातील लोकांचे हित जपण्याच्या उद्देशाने या परिषदेची स्थापना करण्यात आली होती. १९४५ साली विविध वसाहतींमधील लोकांच्या हिताचे रक्षण करण्याची आणि हित साधण्याची

जबाबदारी या परिषदेवर टाकण्यात आली. एकेक करुन विविध वसाहतींना मुक्त करुन तसेच जबाबदारी सोपविण्यात आलेल्या प्रदेशातील लोकांच्या अधिकारांचे रक्षण करुन या परिषदेने तिचे उद्दिष्ट साध्य केले आहे. या परिषदेने जगातील विविध भागात विशेषतः आफ्रिकेत यासंबंधाने मोठे यश मिळविले आहे. परिषदेने आफ्रिकेतील अनेक वसाहतींना त्यांच्या पारतंत्र्यातून मुक्त केले आहे. (जो देश त्याच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठी दुसऱ्या देशावर अवलंबून आहे त्याला या परिभाषेत 'विश्वस्त देश' असे संबोधले जाते. वसाहतीखाली असलेल्या देशांच्या विकासाची प्रक्रिया अधिक पारदर्शक पद्धतीने व्हावी म्हणून वसाहतवादी देशाच्या अधिपत्याखाली ती होण्याऐवजी ती आंतरराष्ट्रीय समुदायाच्या देखरेखीखाली व्हावी म्हणून या परिषदेची स्थापना करण्यात आली.) ज्या अकरा प्रशासित प्रदेशांची जबाबदारी या विश्वस्त परिषदेकडे सोपविण्यात आली होती त्या प्रदेशांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील विविध कार्ये करुन परिषदेने आपले उद्दिष्ट पूर्ण केले आहे. एकेक करुन हे प्रदेश वसाहतवादी देशांपासून स्वतंत्र झाले. अशा प्रकारे स्वतंत्र होणारी शेवटची वसाहत म्हणजे पलाऊ. १९९४ साली ती स्वतंत्र झाल्यानंतर आता या विश्वस्त परिषदेच्या कामाची तशी परिपूर्ती झाली आहे. परंतु तरीही संयुक्त राष्ट्र संघाने परिषदेचे पूर्ण विसर्जन केलेले नाही. भविष्यात एखादा प्रदेश वसाहतीखाली आला तर त्याची जबाबदारी या परिषदेकडे सुपुर्त करता यावी म्हणून परिषद पूर्णतः विसर्जित करण्यात आलेली नाही. याखेरीज अविकसित देशांमध्ये मानव अधिकारांबाबत विधायक काम करण्यासाठीही या परिषदेच्या सेवांचा उपयोग करता येऊ शकला हा देखील विचार त्यामागे आहे.

### आंतरराष्ट्रीय न्यायालय (International Court of Justice)

'आंतरराष्ट्रीय न्यायालय' हा संयुक्त राष्ट्र संघाचा मुख्य न्यायविषयक प्रमुख विभाग आहे. द नेदर्लंड्समधील हेग येथील पीस पॅलेस येथे या न्यायालायचे कार्यालय आहे. सदस्य राष्ट्रांनी दाखल केलेल्या खटल्यांवर हे न्यायालय निर्णय देते तसेच संयुक्त राष्ट्र संघाला विविध विषयावर कायदेशीर सल्लाही देते. या न्यायालयात सदस्य राष्ट्र संघामधून १५ न्यायाधीशांची निवड करण्यात येते. ही निवड ९ वर्षांच्या कालावधीसाठी असते.

दर तीन वर्षांनी एक तृतीयांश न्यायाधीशांच्या निवृत्तीमुळे होणाऱ्या रिक्त पदांसाठी निवडणूक घेण्यात येते. न्यायमूर्तींच्या या मंडळातून मुख्य न्यायाधीशांची निवड करण्यात येते. या पुस्तकाच्या शेवटी परिशिष्टात देण्यात आलेल्या तक्त्यामध्ये मानव अधिकार विषयक मुद्दे आणि त्यासंबंधी सदस्य राष्ट्रांच्या माध्यमातून काम करणाऱ्या विविध संस्थांची माहिती दिली आहे.



## मानव अधिकार विषयक संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदीमधील तरतुदी

जगातून युद्धांचे उच्चाटन करणे, मानव अधिकारांच्या संरक्षणाला प्रोत्साहन देणे आणि मूलभूत मानवी प्रतिष्ठा आणि मानवी आयुष्याचा दर्जा उंचावत जाणे ही संयुक्त राष्ट्र संघाच्या प्रस्तावनेत प्रतीत झालेली उद्दिष्टे आहेत. आंतरराष्ट्रीय कायद्यातील सिद्धांतानुसार मान्य झालेले मुलभुत मानव अधिकार प्रत्यक्षात येण्यासाठी, न्याय्य आणि योग्य अशी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती निर्माण करण्याकरिता जगभरातील देशांमध्ये सहकार्य वाढविणे हेही संयुक्त राष्ट्र संघाचे एक उद्दिष्ट आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदीमध्ये अनेक ठिकाणी मानव अधिकारांबाबत तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे–

१. या सनदीच्या पहिल्या कलमामध्येच संयुक्त राष्ट्र संघाचे उद्देश स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक असमानता कमी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदयात सहकार्य निर्माण करणे हे एक आंतरराष्ट्रीय संघटना म्हणून संयुक्त राष्ट्र संघाचे कर्तव्य असल्याचे म्हटले आहे. याखेरीज वंश, लिंग, भाषा किंवा धर्माचा कोणताही अडथळा न येता सर्वांना मूलभूत स्वातंत्र्य आणि मानव अधिकार उपभोगण्यास मिळावे या दृष्टीने राष्ट्रांनी प्रयत्न करावे यासाठी प्रोत्साहनपर परिस्थिती निर्माण करणे तसेच त्या दृष्टीने देखरेख ठेवणे हे देखील एक उद्दिष्ट आहे.

२. कलम ८ मध्ये असे म्हटले आहे की, संयुक्त राष्ट्र संघटनेतील प्रमुख किंवा उपसंस्थांमध्ये कोणत्याही पातळीवर सहभागी होण्यासाठी कोणत्याही व्यक्तीवर प्रतिबंध घालण्यात येऊ नये. या तरतुदीनुसार संयुक्त राष्ट्र संघातील विशिष्ट पदासाठी आवश्यक असलेली पात्रता धारण करीत असल्यास जगातील कोणतीही व्यक्ती त्या पदासाठी पात्र ठरू शकतो. संयुक्त राष्ट्र संघातील नोकरी, उमेदवारी, प्रकल्प हे जगातील कोणाही व्यक्तीला तिच्या वंश, लिंग, भाषा वा इतर कोणत्याही प्रकारे भेदभाव विचार न करता मिळू शकतात.

३. कलम १३ नुसार, संयुक्त राष्ट्र संघाच्या सनद मध्ये उल्लेखण्यात आलेली उद्धेश आणि उद्दिष्टे विशेषतः मानव अधिकारासंबंधीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संयुक्तिक पावले उचलण्याची जबाबदारी आमसभेवर (कारण आमसभेमध्ये सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधीत्त्व असते) सोपवण्यात आली आहे. व्यक्तीला मूलभूत स्वातंत्र्यासोबतच आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक स्वातंत्र्यही मिळावे यासाठी आमसभेने ही पावले उचलायची आहेत.

४. कलम ५५ नुसार सदस्य राष्ट्रांमधील नागरिकांना चांगले राहाणीमान मिळावे, सर्वांना रोजगार मिळावा तसेच त्यांची आर्थिक आणि सामाजिक प्रगती व्हावी यासाठी त्यांच्यामध्ये शांतता आणि सलोखा राहावा यादृष्टीने सर्व कायदेशीर आणि संवैधानिक पावले उचलणे हे देखील संयुक्त राष्ट्र संघाचे एक कर्तव्य जबाबदारी आहे.

अ) सदस्य राष्ट्रांमध्ये चांगल्या दर्जाचे आर्थिक, सामाजिक, आरोग्यविषयक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक सहकार्य प्रस्थापित व्हावेत म्हणून विविध उपाय सुचविणे.

आ) कोणत्याही भेदभावाचा विचार न करता सर्वांना मूलभूत मानव अधिकार मिळाले पाहिजेत या तत्त्वाला वैश्विक मान्यता आणि आदर मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.

कलम ५५ मध्ये उल्लेखण्यात आलेल्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी आर्थिक आणि सामाजिक परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. ही परिषद संयुक्त राष्ट्र संघटनेचा एक महत्त्वाचा घटक असून मानव अधिकारांचे संवर्धन करण्याच्या कामात ही परिषद आमसभेला मदत करीत असते.

५. कलम ७६ नुसार सदस्य राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये विश्वस्त परिषद नावाचा आणखी एक विभाग निर्माण केला.

६. जागतिक पातळीवर सर्वांसाठी मूलभूत मानवी स्वातंत्र्य प्रस्थापित व्हावे म्हणून वर उल्लेख केलेल्या तरतुदी प्रमुख आहेत. कलम ७ नुसार वर उल्लेख केलेले ६ प्रमुख घटक स्थापण्यात आले आहेत. मानव अधिकारांची जपवणूक आणि संवर्धन यासह इतरही प्रमुख उद्दिष्टांसाठी सदस्य राष्ट्रांशी संबंध ठेवणे हे या साऱ्याच घटक संस्थाचे कार्य आहे.

७. एखादे राष्ट्र जर या उद्दिष्टांचा विशेषतः मानव अधिकारासंबंधी उद्दिष्टांचा अनादर करीत असेल वा त्यातील तरतुदींचे पालन करीत नसेल तर किंवा दुसऱ्या राष्ट्राकडून याबाबत त्या राष्ट्राला काही धोका उत्पन्न झाला असेल तर त्याविरुद्ध उपाय योजण्याचे अधिकार सुरक्षा परिषदेला देण्यात आले आहेत. मानव अधिकारांच्या संवर्धन आणि जपणूकीसाठी तसेच शांतता आणि सुरक्षेसाठी गरज पडल्यास सुरक्षा परिषद युद्धही घोषित करु शकते. (कलम ५१)

८. या खेरिज कलम ५५ नुसार सुरक्षा परिषद प्रादेशिक संघटनांना (संयुक्त राष्ट्र संघाच्या सदस्य राष्ट्रांनी त्यांच्यातील प्रादेशिक पातळीवरच्या मतभेदांच्या मुद्द्यांवर उपाय शोधण्यासाठी तसेच प्रादेशिक सहकार्य वाढविण्यासाठी युरोपियन युनियन, सार्क यासारख्या प्रादेशिक संघटना स्थापित केल्या आहेत.) यासंबंधाने काही निर्देश देऊ शकते.

## मानव अधिकारांचा वैश्विक जाहीरनामा: काही तांत्रिक पार्श्वभूमी

**मानव अधिकारांचा वैश्विक जाहीरनामा तयार करणाऱ्या मसुदा समितीच्या अध्यक्ष प्रमुख आणि या जाहीरनाम्याच्या एक मुख्य शिल्पकार तसेच अमेरिकेच्या माजी अध्यक्षांच्या पत्नी असलेल्या एलिनॉररुझवेल्ट या जाहीरनाम्याच्या मसुद्याकडे पाहताना** मानव अधिकारांसंबंधी आंतरराष्ट्रीय विधेयक तयार करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी १५ फेब्रुवारी १९४६ रोजी एक छोटी समिती स्थापन केली. त्याच वर्षी एप्रिलमध्ये श्रीमती एलिनॉर रुझवेल्ट यांची या समितीच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर समितीची लगेचच प्राथमिक बैठक झाली आणि त्यामध्ये समितीची सदस्यसंख्या १८ करण्याची सूचना करण्यात आली. (त्यामध्ये ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, बायलोरशिया, चिली, चीन, इजिप्त, फ्रान्स, भारत, इराण, लेबनॉन, पनामा, फिलीपाईन्स, इंग्लंड, अमेरिका, (तत्कालिन) सोविएत युनियन, ऊरुग्वे आणि युगोस्लाव्हिया या देशांच्या प्रतिनिधींचा त्यामध्ये समावेश करण्यात आला होता. नंतर २१ जून १९४६ साली आर्थिक आणि सामाजिक परिषदेने या समितीला मानव अधिकारांचा वैश्विक जाहीरनामा तयार करण्याच्या दृष्टीने आराखडा निश्चित करून दिली. हा आराखडा निश्चित झाल्यानंतर या समितीचे रुपांतर मानव अधिकारांसंबंधी आयोगामध्ये करण्यात आले. हा आयोग २००६ पर्यंत कार्यरत होता. त्यानंतर २००६ साली आमसभेने या आयोगाचे मानव अधिकार परिषद या आंतरशासकीय संस्थेमध्ये रुपांतर केले. आजमितीस ४७ देश या परिषदेचे सदस्य आहेत.




मानव अधिकार आयोगाने त्यानंतर कॅनडाचे जॉन पीटर्स हॅम्फ्रे यांची मसुदा समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. त्यानुसार त्यांनी या वैश्विक जाहीरनाम्याचा पहिला मसुदा तयार केला. त्यानंतर फ्रान्समधील कायद्याचे प्राध्यापक आणि न्यायमूर्ती रेने कासिन यांनी मानव अधिकारांच्या वैश्विक जाहीरनाम्याचा तीस कलमी अंतिम मसुदा तयार केला. या कामासाठी त्यांना १९६८ सालचा शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला.

त्यानंतर संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ रोजी मानव अधिकारांसंबंधीचा वैश्विक जाहीरनामा मंजूर केला. तेव्हापासून १० डिसेंबर हा दिवस 'जागतिक मानव अधिकार दिन' म्हणून पाळण्यात येतो. मात्र हा जाहीरनामा सदस्य राष्ट्रांवर कायदेशीररित्या बंधनकारक वा वैध नसल्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाने आयोगाला त्या जाहीरनाम्याच्या आधारे दोन संवैधानिक आणि कायदेशीर मसुदे तयार करण्यास सांगितले. या जाहीरनाम्यात नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अशा मानव अधिकारांचा एकत्रच उल्लेख असल्याने सदस्य राष्ट्रांना त्याची अंमलबजावणी करणे कठीण गेले असते.

त्यामुळे या सूचनेनुसार आयोगाने आणि त्याच्याअंतर्गत येणाऱ्या विविध समित्यांनी बऱ्याच परिश्रमानंतर दोन स्वतंत्र विधेयकांचा आराखडा तयार केला. त्यांना आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांसंबंधी वचननामा आणि नागरी आणि राजकीय हक्कांसंबंधी वचनानामा असे म्हणण्यात येते. ते १९६६ साली स्वीकारण्यात आले आणि १९७६ साली अंमलात आले. पहिल्या वचननाम्यावर १६० देशांनी तर दुसऱ्यावर (जुलै २०११ पर्यंत) १६७ देशांनी अधिनियमित केले आहे. नंतर दोन्ही वचननाम्यांना अतिरिक्त परिशिष्ट मसुदे जोडण्यात आले आहेत.

नागरी आणि राजकीय हक्कांना 'न्यायरक्षित हक्क' (Justiciable Rights) असे म्हटले जाते. भारतीय घटनेमध्ये देण्यात आलेल्या मूलभूत हक्कांशी त्याची तुलना करता येईल. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क असे न्यायरक्षित नसतात. ते राष्ट्रांसाठी मार्गदर्शक स्वरुपाचे असतात. विविध घटक लक्षात घेऊन राज्यव्यवस्थेने त्यांचा पुरस्कार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे अपेक्षित असते. (आपल्या राज्यघटनेमध्ये असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांशी त्यांची तुलना करता येईल.) या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी राज्यव्यवस्थेने प्रयत्न करणे अपेक्षित असते. मात्र त्याची अंमलबजावणी न झाल्यास त्याविरुद्ध न्यायालयात सहसा दाद मागता येत नाही. मात्र, गेल्या दोन दशकांमध्ये दिलेल्या अनेक निकालांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने हे निःसंदिग्धपणे स्पष्ट केले आहे की, न्यायरक्षित नसलेल्या हक्कांची अंमलबजावणी न होण्यामुळे मूलभूत हक्कांच्या सार्थ पालनावर गदा येत असेल, तर मात्र अशा न्यायरक्षित नसलेल्या हक्कांसाठीही न्यायालयात दाद मागता येऊ शकते.

आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांच्या वचननाम्याला २००८ साली एक पर्यायी मसुदा परिशिष्ट जोडण्यात आले. त्यानुसार एखाद्या देशातील राज्यव्यवस्थेने सनदीमधील तरतुदींची अंमलबजावणी न केल्यास त्याविरूद्ध व्यक्तीला संयुक्त राष्ट्र संघाच्या मानव अधिकार विषयक व्यवस्थेकडे तक्रार करता येते. त्या अर्थाने हे एक ऐतिहासिक परिशिष्ट समजले जाते. कारण त्यामुळे पहिल्यांदाच व्यक्तीला अशा प्रकरणी देशाच्या राज्यव्यवस्थेविरुद्ध संयुक्त राष्ट्रांच्या मानव अधिकारासंबंधी उच्चायुक्तांकडे तक्रार करण्याचा हक्क देण्यात आला आहे. अर्थात, असे करण्यापूर्वी

त्या व्यक्तीने न्याय मिळविण्यासाठी त्या देशातील सर्वोच्च न्यायालयासह सर्व स्थानिक पर्याय वापरले असले पाहिजेत. या मसुदा परिशिष्टावर ३६ देशांच्या सह्या आहेत आणि तीन देशांनी त्याला अधिनियमित केले आहे. परंतु, ही तरतुद अजून प्रत्यक्षात यायची आहे. ही फारच मूलगामी तरतुद असल्याने ती विविध देशांतील राज्यव्यवस्थांनी ती स्वीकारण्यास वेळ लागेल हे उघड आहे.

नागरी आणि राजकीय वचननाम्याला दोन मसुदा परिशिष्ट जोडण्यात आले आहे. त्यातील पहिला १९६६ साली स्वीकारण्यात आला आणि नंतर १९७६ साली तो प्रत्यक्षात अमलात आला. व्यक्तीच्या नागरी आणि राजकीय हक्कांवर राज्यव्यवस्थेकडून गदा आली आणि त्याविरूद्ध देशांतर्गत उपलब्ध असलेले सारे न्यायालयीन पर्याय वापरूनही न्याय मिळाला नाही असे वाटले तर व्यक्तीला राज्यव्यवस्थेविरुद्ध संयुक्त राष्ट्रांकडे तक्रार करण्याचा हक्क हे परिशिष्ट देते. (अर्थात या परिशिष्ट मसुद्याला अधिनियमित करणाऱ्या देशांच्या नागरिकांना हा हक्क प्राप्त होऊ शकतो. भारताने हा मसुदा अद्याप वैध मानला नसल्याने भारतीय नागरिकांना या संबंधित काही तक्रार करता येत नाही.) जुलै २०११ पर्यंत जगभरातील ११४ देशांनी या मसुद्याला वैध मानले आहे.

दुसरा परिशिष्ट मसुदा १९८९ साली स्वीकारण्यात आला आणि १९९१ साली तो प्रत्यक्षात आमलात आला. जुलै २०११ पर्यंत त्याला ७३ देशांची वैधता प्राप्त झाली होती. गुन्हेगारांना मृत्यूदंडाची शिक्षा देण्याची तरतुद रद्द करणे या परिशिष्टाने बंधनकारक केले आहे. भारताने हा परिशिष्ट मसुदा अद्याप स्वीकारलेला नाही.

## मानव अधिकारांच्या वैश्विक जाहीरनाम्याचे महत्त्व

मानव अधिकार आणि स्वातंत्र्याचे आंतरराष्ट्रीय पातळीवर रक्षण आणि संवर्धन करणे हे संयुक्त राष्ट्रांच्या सनदीचे एक उद्दिष्ट आहे. त्यानुसार मानव अधिकार विषयक वैश्विक जाहीरनामा संयुक्त राष्ट्र संघाने स्वीकारला आहे. हा जाहीरनामा म्हणजे सदस्य राष्ट्रांनी सनदीद्वारे स्वीकारलेल्या विचारप्रणालीचेच एक विस्तारीत रुप आहे.

- या वचननाम्याच्या सार्थ पालनामुळे शांतता आणि सुरक्षा प्रस्थापित होईल.
- बंधनकारक नसलेल्या या जाहीरनाम्याला कोणताही अपवाद न येता जागतिक मान्यता मिळाली असून आंतरराष्ट्रीय समुदायाने तो स्वीकारला आहे.
- सुरुवातीला या जाहीरनाम्याबद्दल साशंक असलेल्या (तत्कालिन सोविएत युनियन आणि युगोस्लाव्हिया यासारख्या साम्यवादी देशांसह) अनेक देशांना हळूहळू या जाहीरनाम्याचे महत्त्व पटत गेले आणि नंतर तेही त्याचे समर्थन करू लागले.

- या जाहीरनाम्याचा नंतर सतत विविध पातळ्यांवर संदर्भ येत गेला. त्यातील तरतुदी विकसित होत गेल्या. त्यातून आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा तसेच नागरी आणि राजकीय हक्कांचा वचननामा तयार झाला. त्याखेरीज मानव अधिकारांसंबंधी विविध मुद्द्यांवरच्या भूमिका विकसित होण्यासही त्याची मदत झाली. या सगळ्यांमुळे या जाहीरनाम्याला आंतरराष्ट्रीय कायद्यासंबंधीच्या कोणत्याही चर्चेत महत्त्वाचे स्थान दिले जाते.
- हा जाहीरनामा संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदीचाच एक विस्तार होता. सुरक्षा परिषद आणि आमसभेसह संयुक्त राष्ट्र संघाच्या विविध घटकांनी त्यांच्या अनेक ठरावांमध्ये आणि मसुद्यांमध्ये या जाहीरनाम्यातील तरतुदींचा संदर्भ दिला आहे.
- १९९३ साली व्हिएन्ना येथे झालेल्या मानव अधिकारांसंबंधी जागतिक परिषदेनेही या जाहीरनाम्याचा आदरयुक्त उल्लेख केला होता.
- अनेक राष्ट्रांनी या जाहीरनाम्यातील विविध उल्लेख आणि तरतुदींच्या आधारे आपले दावे सिद्ध केले आणि हितसंवर्धन केले. (विशेषतः विकसनशील राष्ट्रांनी या जाहीरनाम्यातील तरतुदींच्या आधारे त्यांच्या नागरिकांच्या मानव अधिकारांच्या संवर्धनासाठी विकसित राष्ट्रांकडून सवलती वा सहकार्य मिळविले आहे.)
- आंतरराष्ट्रीय न्यायालयाने तसेच अनेक देशांतील सर्वोच्च न्यायालयांनी त्यांच्या अनेक निकालांमध्येही या जाहीरनाम्यातील तरतुदींचा उल्लेख केला आहे. त्यामुळे न्यायिक वर्तुळामध्येही या जाहीरनाम्याला एक मान्यता आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.
- १९७८ साली म्हणजे या जाहीरनाम्याच्या तिसाव्या वर्धापन साली तेहरान येथे झालेल्या मानव अधिकार परिषदेमध्ये ८४ देशांनी या जाहीरनाम्याचा गौरवपूर्ण उल्लेख करीत त्याला एक प्रकारे मानवंदनाच दिली आहे.
- या जाहीरनाम्यातील सिद्ध न केलेल्या, अद्याप पूर्ण न होऊ शकलेल्या उद्दिष्टांच्या आधारे संयुक्त राष्ट्र संघाने सहस्त्रकासाठीची उद्दिष्टे (millennium goals) तयार केली आहेत. हा एक प्रकारे या जाहीरनाम्याचा एक वेगळा सन्मानच आहे. या उद्दिष्टांच्या आधारे विविध राष्ट्रे त्यांची कर्तव्ये पार पाडतील आणि त्यानीच या जाहीरनाम्याद्वारे स्वीकारलेल्या जबाबदारीची पूर्तता करतील अशी त्यामागची भूमिका आहे.
- या जाहीरनाम्याला अशी जागतिक स्विकृती आणि प्रतिष्ठा मिळत गेल्याने अभ्यासक त्याला जगाची महासनद असे संबोधू लागले आहेत. या सनदीमुळे व्यक्तीचे मूलभूत स्वातंत्र्य आणि हक्क यांना एक भक्कम आधार लाभला आहे असे त्यांना वाटते.

## जाहीरनाम्याचे विश्लेषण


या जाहीरनाम्यामध्ये प्रस्तावना आणि ३० कलमांचा समावेश आहे. प्रस्तावनेच्या कलमांमध्ये जाहीरनाम्याची नेमकी उद्दिष्टे, नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क स्पष्ट करण्यात आले आहेत. त्याखेरीज काही कलमांमध्ये यासंबंधी सर्व घटकांची कर्तव्ये स्पष्ट करण्यात आली आहेत. (यामध्ये राष्ट्रांची त्यांच्या नागरिकांप्रति, इतर राष्ट्रांप्रति आणि एकूणच मानवांप्रति असलेली किमान आणि मूलभूत हमी नमूद आली आहेत. त्यासोबतच त्यामध्ये समाजाचे व्यक्तीप्रति आणि व्यक्तीचे समाजाप्रति आणि आंतरराष्ट्रीय समुदायाप्रति असलेले नैतिक आणि कायदेशीर उत्तरदायित्त्वही स्पष्ट करण्यात आले आहे.) त्यामुळे जगात शांतता आणि सुरक्षा नांदावी आणि जग युद्धाच्या भीतीपासून मुक्त व्हावे या उद्देशाने करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीचा हा जाहीरनामा एक मुख्य आधारस्तंभ आहे.

मानव अधिकारांच्या संकल्पनेचा आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत समावेश होऊन फक्त सहा दशकेच झाली असली तरी आज आंतरराष्ट्रीय कायद्याच्या सर्व शाखा-उपशाखांवर मानव अधिकाराच्या तत्त्वांचा आणि प्रघातांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. इतकेच नव्हे तर अनेकदा आंतरराष्ट्रीय संबंधांना नियमित करणारी तत्त्वे आणि संकेत प्रस्थापित करताना मानव अधिकारांचाही आधार घेतला जातो. (जगभरातील लोकांना समजावे आणि त्याचे पालन करणे सोपे जावे म्हणून संयुक्त राष्ट्र संघाने कोणत्याही अपवादाशिवाय ह्या जाहीरनाम्याचे एक दोन नव्हे तर तब्बल ३६० भाषांमध्ये भाषांतर केले आहे. केवळ यावरूनही या जाहीरनाम्याला असलेले महत्त्व लक्षात येऊ शकते.)

## जाहीरनाम्याची प्रस्तावना

जाहीरनाम्याच्या प्रस्तावनेतच त्याची प्रेरणा आणि महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे. लोकांनी आणि राष्ट्रांनी जर या जाहीरनाम्यातील तत्त्वांचे मनापासून पालन केले तर शांतता, परस्पर मैत्रीतून सुरक्षा आणि प्रगती निश्चितपणे साध्य करता येईल. जाहीरनाम्यातील तत्त्वे आणि प्रेरणा खाली सोप्या शब्दात आणि चित्रांसह स्पष्ट करण्यात आली आहे.

**या अर्थी, मानवी कुटुंबातील सर्व व्यक्तींची स्वाभाविक प्रतिष्ठा व त्यांचे समान व अहरणीय अधिकार यांना मान्यता देणे, जगात शांतता, न्याय आणि स्वातंत्र्य यांच्या प्रस्तावनेचा पाया आहे.**



प्रत्येक व्यक्तीला, ज्यात देश आणि आंतरराष्ट्रीय समुदायाचाही समावेश होतो, तिचे नैसर्गिक आणि अविभाजनीय असे व्यक्तीत्त्व सिद्ध करण्याचा आणि आत्मसन्मान जपण्याचा हक्क कोणताही भेदभाव न मानता मिळावा असे पाहणे ही सर्व मानवजातीचीच जबाबदारी आहे. माणसांचा एकमेकांशी मैत्रीपूर्ण व्यवहार हाच जागतिक शांतता, स्वातंत्र्य आणि न्यायाचा आधार आहे.

**ज्या अर्थी मानव अधिकारांची अवहेलना व अप्रतिष्ठा झाल्याने अमानुष कृत्ये घडून आली आणि त्यायोगे मानवजातीच्या सद्सद्विवेकबुद्धीवर भयंकर आघात झाला आहे आणि म्हणून मानवांना भाषण स्वातंत्र्याचा व श्रद्धा स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल व भय व इच्छा यापासून मुक्ती होईल अशा जगाची उभारणी करणे ही सामान्य लोकांची सर्वोच्च आकांक्षा म्हणून घोषित करण्यात आली आहे.**

लोकांकडे झालेले दुर्लक्ष, दुसऱ्यांच्या न्याय्य हक्कांचा अनादर आणि प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजे महाराजे यांच्या वैयक्तिक क्षुद्र स्वार्थामुळे अनेक लढाया आणि युद्धे झाली आहेत. शासकांच्या अशा वर्तनामुळे जगभरात विविध क्रांत्या झाल्या, उठाव झाले. लोकांसाठी ही सारी मोठी कठीण आणि परीक्षा घेणारी परिस्थिती होती. त्यामुळे आपल्याला किमान शांततेने जगता तरी येईल काय अशी एक भीती लोकांच्या मनात निर्माण झाली. अनेकवेळा तर लोकांनी शासकांना प्रेम किंवा आपुलकीमुळे नव्हे तर या भीतीपोटी समर्थन दिले. यामुळे लोक आणि शासनकर्ते यांच्यात एक अंतर आणि दुरावा निर्माण झाला. शासकांच्या, सत्ताधीशांच्या अशा वैयक्तिक आणि अवाजवी महत्त्वाकांक्षांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला प्रत्युत्तर म्हणून नैसर्गिक हक्कांच्या संकल्पनेचा उदय झाला (घटक २ पहा) आणि त्यातून शेवटी लोकशाही आणि मानव अधिकारांच्या संकल्पना प्रस्थापित होत गेल्या. काही मुठभर हितसंबंधी गटांच्या महत्त्वाकांक्षेपोटी हजारो लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले गेले आणि त्यातून दोन महायुद्धे झाली. अशा काही व्यक्तींच्या अपायकारक प्रवृत्तींना आणि कृतींना वेसण घालायची असेल आणि त्यातून जागतिक शांतता आणि सुरक्षा प्रस्थापित करायची असेल तर लोकांना त्यांची मते निर्भयपणे मांडण्याच्या स्वातंत्र्याची हमी देण्याची गरज आहे. लोकांच्या मूलभूत गरजांची पूर्तता व्हायची असेल तर कोणताही भेदभाव न पाळता सर्वांना मानव अधिकार मिळेल असे जागतिक नेत्यांच्या लक्षात आले आहे.

**ज्या अर्थी, जुलूम व दडपशाही यांविरुद्ध अखेरचा उपाय म्हणून मानवाला बंड करणे भाग पडू नये यासाठी मानव अधिकारांचे संरक्षण कायद्याने करणे अत्यावश्यक आहे.**

वर उल्लेखल्याप्रमाणे जर कोणत्याही व्यक्तीला तिच्या इच्छेविरुद्ध कृती करायला भाग पाडले गेले नाही तर सामाजिक चळवळी, बंड, उठाव, हिंसक लढे यांना स्थानच राहाणार नाही. अगदी लोकशाही देशांमध्येसुद्धा जर राज्यकर्ते वा राज्यवस्थेचा एखादा घटक आपली घटनात्मक कर्तव्ये पार

पाडत नसेल वा लोकांच्या हक्काप्रति पक्षपात वा अनादर दाखवित असेल तर तिथे सामाजिक चळवळी या उभ्या राहाणारच. उदाहरणार्थ, विकासातील असमतोल, भ्रष्टाचार आदि गोष्टींमुळे जगभरातील अनेक लोकशाहीवादी देशांमध्येही सामाजिक चळवळी उभ्या राहिल्या आहेत.

**ज्या अर्थी, राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये मित्रत्त्वाचे संबंध वृद्धींगत करण्याच्या कार्यास चालना देणे अत्यावश्यक आहे.**

इतर देशांसोबत मैत्रीपूर्ण आणि सलोख्याचे संबंध विकसित करणे ही प्रत्येक देशाची जबाबदारी आहे. या मूलभूत तत्त्वांचे सार्थ पालन व्हावे म्हणून जगातील देशांनी आंतरराष्ट्रीय कायद्यांप्रति आपला विश्वास आणि आदर व्यक्त केला आहे. या कायद्यांमुळे आपसातील संबंध शांततामय मार्गाने प्रस्थापित आणि नियमित होऊ शकतात असा त्यांचा विश्वास आहे. राष्ट्रांची भौगोलिक एकात्मता, सार्वभौमत्त्व जपणे आणि कोणताही द्वेषभाव, भेदाभेद न मानता सर्व नागरिकांचे सार्वभौमत्त्व आणि हक्क यांचा आदर करणे हेही राष्ट्रांचे आणि तेथील राज्यव्यवस्थेचे कर्तव्यच ठरते. जागतिक पातळीवर राष्ट्रा-राष्ट्रांमधील सलोख्याच्या संबंधांमुळेच शांतता आणि सुरक्षा येऊ शकते. तसे व्हावे म्हणूनच जगातील देशांनी एकत्र येऊन संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना केली आहे. सर्वमान्य आणि कायदेशीर चौकटीत राहून राष्ट्रांनी त्यांच्यातील मतभेद आणि झगडे दूर करावे अशीही त्यामागची कल्पना आहे. (सर्वसाधारणपणे आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत असे मतभेद वा झगडे वाटाघाटी, मध्यस्थी, समजावणी, त्रयस्थ हस्तक्षेप (आर्बिट्रेशन), न्यायालयीन निवाडा अशा विविध मार्गाने सोडविता येतात. युद्ध हा अगदी शेवटचा आणि अपवादात्मक पर्याय मानला जातो).

स्पष्टपणे वाचण्यातून असे दिसून येते की, प्रत्येक व्यक्तीचे अधिकारांचा मुक्त उपभोग हे दोन देशांमधील मैत्रीपूर्ण संबंधांवर अवलंबून असतात. प्रत्येक देशाचे कर्तव्य असते कमी, त्यांनी देशामधील तफावती मैत्रीपूर्ण संबंधांमधून दूर कराव्यात आणि शांततेत राहावे, हे सर्व वैयक्तिक स्वातंत्र्य वाढविण्याचे काम करते. हे सर्व प्राप्त करण्यासाठी प्रत्येक वर्षी, दिनांक २१ सप्टेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय शांतता दिवस' म्हणून साजरा केला जातो त्यालाच 'जागतिक शांतात दिन' असे ही म्हणतात.





हा शांती दिवस साजरा करण्यासाठी, दर वर्षी संयुक्त राष्ट्र संघाच्या मुख्यालयात न्यूयॉर्क येथे एक शांती घंटा वाजवली जाते. ही घंटा मुलांनी दान केलेल्या पैशातून घडवली आहे, सोबत त्याच्या बाजूने 'विश्व शांती चिरायू होवो' असे कोरले आहे. महान भारतीय' लंदाज (क्रिकेटर), सचिन

तेंडूलकर यांनी ही घंटा दान केली आहे. सचिन तेंडूलकर यांनी ही घंटा दान केल्यामुळे युद्धाच्या मानवी खर्चाचे स्मरण म्हणून निर्देशित केली आहे. अनेकवेळा संयुक्त राष्ट्र संघ आणि त्यांचे घटक आणि सामाजिक संघटना हे सर्व जगात प्रसिद्ध असलेल्या व्यक्तींची राजदूत म्हणून नेमणूक करतात कारण ते एक विश्व व एक मानवता ह्या आदर्शांना उत्तेजन देण्यासाठी माणुसकीच्या लोलकाच्या माध्यमातून मानव अधिकारांना प्रोत्साहन देतात.

**ज्या अर्थी, संयुक्त राष्ट्र संघटनेतील सदस्य राष्ट्रांनी सनदेत मूलभूत मानव अधिकार, मानवाची प्रतिष्ठा व महत्त्व, स्त्रीपुरुषांचे समान अधिकार यावरील आपली श्रद्धा निश्चयपूर्वक पुन्हा व्यक्त केली आहे आणि अधिकाधिक स्वातंत्र्याच्या वातावरणात सामाजिक प्रगती घडवून आणण्याचा व जीवनमान सुधारण्याचा निर्धार केला आहे.**

**ज्या अर्थी, सदस्य राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सहकार्याने, मानव अधिकारांना व मूलभूत स्वातंत्र्यास जागतिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे आणि त्यांचे पालन करण्याचे ध्येय साध्य करण्याची प्रतिज्ञा केली आहे.**

**ज्या अर्थी, या प्रतिज्ञेच्या परिपूर्तीसाठी, उक्त अधिकार व सार्वत्रिक सर्व प्रकारचे स्वातंत्र्य यांच्याबाबत जाणीव होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.**

**त्या अर्थी आता, ही साधारण सभा हा मानव अधिकारांचा जागतिक जाहीरनामा सर्व लोकांसाठी व देशांसाठी ध्येयसिद्धीचा एक समान आदर्श म्हणून उद्घोषित करते व त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने व समाजातील प्रत्येक घटकाने हा जाहीरनामा सतत डोळ्यापुढे ठेऊन अध्यापन व शिक्षण यांच्याद्वारे या अधिकारांचा व स्वातंत्र्याचा मान राखला जाण्यासाठी आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा प्रागतिक स्वरूपाच्या उपाययोजनांच्याद्वारे, सदस्य राष्ट्रांच्या लोकांमध्ये व त्यांच्या क्षेत्राधिकाराखालील प्रदेशातील लोकांमध्ये त्यांना जागतिक मान्यता मिळवून देण्यासाठी व त्यांचे परिणामकारक पालन केले जाण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.**

जागतिक नेत्यांनी, प्रतिष्ठेने जगण्यासाठी, मैत्रीपूर्ण वातावरण प्रोत्साहित करण्यासाठी व विश्वशांती आणि सुरक्षिततेसंबंधित चिंतेचे पुष्टीकरण करण्यासाठी, या आंतरराष्ट्रीय संघटनेला ‘संयुक्त राष्ट्र संघ’ असे नाव दिले आहे. पश्चिम आणि पूर्व दरम्यान भाषा, संस्कृती आणि इतर मुद्द्यांवर फरक असले तरी, संयुक्त राष्ट्र संघ जगभरातील लोकांच्या एकतेचे प्रतिनिधित्त्व करतो. ही संघटना स्थापन करून काहीही झाले तरी ज्या संघटनेचे प्रतिक कोणताही भेदभाव न ठेवता व मानवजातीने एकच घटक म्हणून राहावे ही नेत्यांची संघटनेच्या स्थापनेमागची मुख्य आस्था आणि कल्पना होती. मानव अधिकाराच्या जाहीरनाम्यातील प्रस्तावनेचा उद्देश साध्य करण्यासाठी त्याप्रमाणे स्त्री, अल्पसंख्यांक, मुले, अपंग इत्यादी वंचित घटकांची दुर्दशा संपवून अनेकतेत एकतेचा विकास करण्यासाठी संयुक्त राष्ट्र

कार्य करते. (संयुक्त राष्ट्र संघाच्या विविध कार्यासाठी त्यांच्या http://www.un.org/wotks. या संकेत स्थळाला भेट देऊ शकता. जागतिक स्तरावर वेगवेगळ्या आघाड्यांवर लाखो लोकांचे दु:ख दूर करुन त्यांचे अश्रू पुसण्यासाठी आणि त्यांना जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक लोकांच्या माध्यमातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्राचा असलेला समावेश संयुक्त राष्ट्राच्या या संकेत स्थळावर आपण पाहू शकतो. या सर्व कृतीवर होणारा खर्च सदस्य राज्यांच्या वार्षिक योगदानातून केला जातो त्यातून उत्तम आदर्श/दर्जेदार जीवनमान विकसित करण्याचा राज्यांचा निर्धार दिसून येतो. states have to develop the better standards of life).

हे चित्र सहस्त्रकातील आठ महत्वाच्या ध्येयाचे प्रतिनिधित्त्व करते जे साध्य करण्याची प्रतिज्ञा संयुक्त राष्ट्र संघ व संयुक्त राष्ट्र संघाच्या सदस्यांनी केली आहे. ज्यांना संयुक्त राष्ट्राने जगभरातील लोकांच्या सहाय्याने साध्य करण्याचे ठरविले आहे, अशी आठ उद्दिष्टे ही आठ चित्रे दर्शवितात. यासाठी दरवर्षी अनेक कार्यक्रम व प्रत्येक क्षेत्रात तरुण विद्यार्थ्यांसाठी संशोधन आणि विविध प्रकल्पांसाठी अंतर्वासितेची संधी प्रदान करण्यात येते. खरेतर विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये संयुक्त राष्ट्रासोबत संलग्न होऊन संयुक्त राष्ट्राचे निर्धारित उद्देश साध्य करण्यासाठी व्यापक वाव आहे. एका वाक्यात सांगायचे झाले म्हणजे, प्रत्येकजण स्वत:च्या क्षेत्रात स्व-योगदानाने उत्तम जीवन मानक साध्य करून व संयुक्त राष्ट्रांशी संबंधित होऊन राहू शकतो. खालील चित्रे आणि चिन्हे ठराविक ध्येय दर्शवितात:





ध्येय १ – उपासमार व दारिद्र्य निर्मूलन करणे.



ध्येय २ – प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण साध्य करणे.



ध्येय ३ – स्त्री पुरुष समानता व महिला सशक्तीकरणाला प्रोत्साहित कर



ध्येय ४ – बाल मृत्यूचे प्रमाण कमी करणे.



**ध्येय ५ – माता आरोग्य सुधारणे .**




**ध्येय ६– एचआयव्ही , हिवताप आणि इतर रोगांचे निराकरण करणे.**




**ध्येय ७ – पर्यावरण शाश्वती सुनिश्चित करणे.**




**ध्येय ८ – विकासाकरिता जागतिक भागीदारी विकसित करणे.**




वरील आठ गोष्टी संयुक्त राष्ट्र संघाद्वारे विकसित आठ अधिकृत ध्येये आणि चित्रे आहेत. या प्रत्येक ध्येयाची प्रगती व त्यांच्या उन्नतीसाठी उचललेल्या पावलांचा मागोवा घेण्यासाठी, संयुक्त राष्ट्र संघाने त्यांना सहाय्य करण्यासाठी भागीदार म्हणून प्राद्योगिकी (तंत्रज्ञान) क्षेत्रातील दिग्गज कंपनी गुगलशी अलीकडेच एक करार केला आहे.

संयुक्त राष्ट्र सनदेचे उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी, संयुक्त राष्ट्र संघ महासभेने एक घोषणापत्र (जाहीरनामा) स्वीकारले. या घोषणापत्राचे स्वीकार केल्यानंतर व त्यातील अपेक्षापूर्तीसाठी, तसेच सर्व राष्ट्रांच्या अधिकारांचा व व्यक्तींच्या संरक्षणाचा परीघ विस्तार करण्याच्या दिशेने आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये अनेक बदल करण्यात आले आहेत. मानव अधिकारांच्या आंतरराष्ट्रीय कायद्यामधील प्रगतीशील संहिताकरणाने तसेच अनेक आंतरराष्ट्रीय नियमावली, घोषणापत्र, करार, परिषद आणि प्रोटोकॉलमुळे देशांच्या दृष्टिकोनात आणि आंतरराष्ट्रीय मुद्राकोश व विश्वबँक सहित इतर आंतरराष्ट्रीय संघटनांवर लक्षणीय प्रभाव पडला आहे. तथापि, आपण माणसांमध्ये असलेले मतभेद आणि स्वार्थीपणामुळे, देशातील लोकांच्या संरक्षण व विकासासाठी प्रत्येक राष्ट्राचे स्वतःचे धोरण आहे. सनद आणि घोषणापत्रानुसार, सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट करण्यासाठी, संयुक्त राष्ट्र संघ आंतरराष्ट्रीय कायद्याच्या माध्यमातून ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी काम करीत आहे.

## कलम १ स्वातंत्र्य आणि समान प्रतिष्ठा व अधिकार

**सर्व व्यक्ती जन्मतःच स्वतंत्र आहेत व त्यांना समान प्रतिष्ठा व समान अधिकार आहेत. त्यांना विचारशक्ती व सद्सद्विवेकबुद्धी लाभलेली आहे व त्यांनी एकमेकांशी बंधुत्त्वाच्या भावनेने आचरण करावे.**

वरील मजकूर असे निर्दिष्ट करतो की, जन्मतः सर्व व्यक्तींना समान अधिकार आहेत आणि कोणत्याही भेदभावाशिवाय ते समान प्रतिष्ठा व आदरास पात्र आहेत. तथापि, कठोर सामाजिक-कायदेशीर दृष्टिकोनातून, विश्लेषणात्मक दृष्टिकोनाची आवश्यकता आहे.

राजकीय स्थापित तत्त्वानुसार, कोणत्याही समाजात जन्मलेल्या सर्व व्यक्तींना कायद्यासमोर सर्व बाबतीत समान अधिकार आहेत. कुठल्याही समाजात एकमेकांप्रति भेदभाव करण्याची परवानगी नाही आणि आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय कायदेशीर परिस्थितीत, सर्व प्रकारे समान अधिकार व स्वातंत्र्य सुनिश्चित करणे आवश्यक आहे. तथापि, कलमातील तरतुदींच्या सविस्तर परीक्षणाने स्पष्ट दिसून येते की, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीमुळे, समानतेच्या संकल्पनेला अमलात आणण्यासाठी काही कायदेशीर बंधने आहेत. स्वातंत्र्याला देखील स्वतःच्या काही मर्यादा आहेत. उदाहरणार्थ, भारतीय संदर्भात, १८ वर्षावरील सर्व व्यक्तींना त्यांच्या मताधिकाराचा वापर करण्याचा किंवा कोणत्याही निर्बंधाविना मतदान करण्याचा संपूर्ण अधिकार आहे. या अधिकाराच्या प्रयोगावर कुठल्याही प्रकारे प्रतिबंध असू नये. कायदेशिररित्या या अधिकाराला राजकीय समानतेचे प्रतिक मानले जाते, परंतु त्यांच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून, लोकांची जीवनशैली बदलू शकते.

सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिकरित्या व इतर दृष्टिकोनातून राज्यसंस्थेतील गरजू लोकांना सवलती देऊन इतर विकसित घटकांच्या बरोबरीने आणण्याची जबाबदारीही राष्ट्राची आहे. संयुक्त राष्ट्र संघ सहस्राब्दी ध्येयाद्वारे सुद्धा न्यूनतम आर्थिक समानता साध्य करण्यासाठी व गरिबी समाप्त करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. म्हणजे, जरी आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक मतभेद असले, तरी कायद्याच्या दृष्टीने सर्व नागरिक समान आहेत आणि प्रत्येक व्यक्तीची क्षमता ही राष्ट्राच्या प्रमुख जिव्हाळ्याचा विषय आहे. या कलमांतर्गत लैंगिक समानताही समाविष्ट करण्यात आली आहे जेणेकरून जीवनात प्रत्येक क्षेत्रात स्त्री व पुरुष समान लेखले जातील.

याव्यतिरिक्त असेही म्हणता येईल की, समानतेच्या दृष्टीने सगळ्यांची मानसिक व शारीरिक क्षमता ही सारखी नसते. एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास, ती व्यक्ती ज्या पर्यावरणात वाढते आणि ज्या परिस्थितीत राहाते यावर अवलंबून असतो. व्यक्ती ज्या परिवेशात राहाते आणि जे सांस्कृतिक दृष्टिकोन अवलंबते, यावर प्रामुख्याने तिची मानसिक परिपक्वता आणि बौद्धिक क्षमता अवलंबून असते. मूलभूत सोयीसुविधांद्वारे मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करणे आणि प्रत्येक व्यक्तीची अर्थाजन क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हे राष्ट्राचे आणि आंतरराष्ट्रीय समुदायाचे कर्तव्य आहे. तसेच या संदर्भात, समाजातील प्रत्येक वर्गाच्या उन्नतीसाठी शक्य तेवढा सहयोग देणे प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. म्हणूनच, राष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक स्थितींवर अवलंबून, समाजातील प्रत्येक गरजू वर्गानुसार आपली नीती किंवा धोरण निर्धारित करत असते.




पुढील चित्र असे दर्शवते की केवळ प्रेम आणि आपुलकीच्या माध्यमातून 'समतेची संकल्पना' साध्य होऊ शकते. आर्थिक, सामाजिक, मानसिक व शारीरिक दृष्टीने असमर्थ व्यक्तींची समाजाकडून काळजी घेण्याची आवश्यकता आहे आणि त्यांना प्रेमाने व आदराने वागवण्याची गरज आहे, जेणेकरून, त्यांचे व्यक्तिमत्व पूर्णपणे विकसित करता येईल. या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी, आंतरराष्ट्रीय मानव अधिकार कायद्यानुसार प्रत्येकाचे वैयक्तिक कर्तव्य आहे की, मानव अधिकारांच्या प्रगतीशील विकास आणि परिपूर्तीसाठी, दुसऱ्यांच्या सन्मानाचा व अधिकारांचा आदर करणे आवश्यक आहे यावर हे कलम भर देते .

## कलम २ भेदभाव प्रतिबंध

**या जाहीरनाम्यात नमूद केलेले सर्व अधिकार व सर्व प्रकारचे स्वातंत्र्य प्रत्येकास आहे व त्याबाबत वंश, वर्ण, लिंग भेद, भाषा, धर्म, राजकीय किंवा इतर मतप्रणाली राष्ट्रीय किंवा सामाजिक मूलस्थान संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जा यांसारखे कोणतेही भेदभाव केले जाता कामा नयेत.**

**आणखी असे की, एखादी व्यक्ती ज्या देशाची किंवा परदेशाची रहिवासी असेल त्या देशाच्या किंवा परदेशाच्या, मग तो देश किंवा परदेश स्वतंत्र असो, विश्वात व्यवस्थेखालील असो, स्वायत्त शोषण नसलेला असो अथवा कोणत्याही प्रकारच्या सार्वभौमत्त्वाखालील असो, राजकीय, क्षेत्राधीकार्त्मक किंवा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कारणास्तव कोणताही भेदभाव करता कामा नये.**






सदर चित्र व कलमानुसार कोणत्याही व्यक्तीचे अधिकार, कोणत्या कारणास्तव किंवा कोणत्याही परिस्थितीत, कमी करता कामा नये. याचा अर्थ असा, एखादी व्यक्ती विकसित, विकासशील, विकासांतर्गत, कमी विकसित किंवा भूमीबंद (नेपाळ किंवा भूतान सारखे समुद्र सीमा नसलेले राष्ट्र) राष्ट्रांशी संबंधित असेल, त्या व्यक्तीला आंतरराष्ट्रीय कायद्यांतर्गत समान वागणूक देण्यात येईल. याव्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये इतर प्रकारच्या राष्ट्रांनाही मान्यता आहे जसे सूक्ष्म-राष्ट्र, स्थूल-राष्ट्र, गैर-स्वयंशासित प्रदेश, आश्रित (निर्भर) राष्ट्र आणि विद्रोही (बंड करून उठणारे) व युद्धार्त

राष्ट्र (चळवळीने काही लोकांच्या संघटनेद्वारा एखाद्या प्रदेशावर नियंत्रण प्रस्थापित करणे आणि देशाच्या सार्वभौमत्त्वाला आव्हान देणे किंवा एक नवीन देश स्थापन करण्यासाठी लढाई करणे). कोणत्याही प्रकारचे क्षेत्र असो किंवा सरकार असो, युरोप असो, अमेरिका असो, आशिया असो किंवा आफ्रिका असो, काळा असो किंवा गोरा असो, लहान असो किंवा तरूण असो, स्त्री किंवा पुरुष असो, अपंग किंवा विकलांग असो, सर्व व्यक्ती समान आहेत व सर्वांना समान अधिकार आहेत हा या कलमाचा उद्देश आहे.

कायद्याचा वापर करण्यात, कोणतेही राष्ट्र किंवा आंतरराष्ट्रीय समुदाय कोणत्याही प्रकारे भेदभाव करू शकत नाही. तसेच, अंतर्गत समस्या किंवा इतर कोणत्याही कारणास्तव, एखाद्या व्यक्तीने जर स्वत:च्या देशातून पलायन करून इतर राष्ट्रामध्ये आश्रय घेतला असेल (आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये 'शरणार्थी' असे संबोधले जाते) तर त्या राष्ट्राचे कर्तव्य आहे की अशा व्यक्तीच्या प्रति कोणताही भेदभाव दर्शविला जाऊ नये.

वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजकीय किंवा इतर मत, राष्ट्रीय किंवा सामाजिक उत्पत्तीस्थान, संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जा इत्यादीवर आधारित कलमात नमूद केलेले भेदभाव, उद्भवण्याचे कारण साधारणपणे समाजात कायद्याबद्दल असणारा सामंजस्याचा व नैतिक मूल्यांचा अभाव हे आहे. कायदा, न्याय, समता, प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, नैतिक मूल्ये व अधिकार यांच्या मूलभूत सिद्धांताच्या संदर्भात अपुरे ज्ञान व सामंजस्य यामुळे अधिकारांना दुय्यम स्थान प्राप्त होते. त्यामुळे भेदभाव आणि दु:खासारखी परिस्थिती उद्भवते. अशावेळी, मूल्यांच्या वाढीस पाठपुरावा करणे व योग्य ते तंत्र अवलंबणे आणि पुढेही त्यांच्या उन्नतीसाठी आवश्यक मर्यादेपर्यंत सवलती विस्तारित करणे हे आंतरराष्ट्रीय समुदायाचे कर्तव्य आहे.

## कलम ३ जगण्याचे, स्वातंत्र्य उपभोगण्याचे आणि सुरक्षेचे अधिकार

**प्रत्येकास जगण्याचा, स्वातंत्र्य उपभोगण्याचा व सुरक्षित असण्याचा अधिकार आहे.**

हे एक कलम संपूर्ण जाहीरनाम्यातील सर्वात संक्षिप्त कलम आहे. तथापि, हे सर्व अधिकारांमध्ये सर्वाधिक महत्त्वाचे अधिकार आहेत. आंतरराष्ट्रीय समुदाय आणि राष्ट्रांनी आपल्या संविधानात लोकांना त्यांच्या किमान गरजा पूर्ण होतील असे जीवन प्रदान करणे ही त्यांची जबाबदारी आहे असे हे अधिकार सुचवितात. या किमान गरजा विशेषत: अन्न, वस्त्र आणि निवारा या आहेत आणि या गरजा लोकांना एक मुक्त जीवन जगण्यासाठी आणि अधिकारांचा मुक्तपणे प्रयोग करण्यासाठी सक्षम बनवतात. संयुक्त राष्ट्र संघटनेने या जीवनावश्यक गरजा पुरविण्यासाठी अनेक पाऊले उचलली आहेत




आणि कायदेशीर दस्तावेज स्वीकारले आहेत आणि त्याचे अनुकरण करण्यासाठी राष्ट्रांना अनुरोध केला आहे. भारताचे महान सुपुत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रीय स्तरावर, अशी समता प्रदान करण्यासाठी, सामाजिक ऐक्यावर आधारित संविधानाच्या तरतुदी लिहिल्या आहेत ज्यामध्ये लोकांना दुर्बलता (शारीरिक, मानसिक व नैतिक) मुक्त जीवन प्रदान करण्याची जबाबदारी राष्ट्रावर सोपवली आहे. ही तरतुद, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने (भारतीय राज्यघटनेतील कलम २१ हे जागतिक मानव अधिकाराच्या जाहीरनाम्यातील कलम ३ सारखे आहे) अनेक खटल्यांमध्ये सतत पुरोगामी दृष्टिकोनातून आणि मूलभूत अधिकारांच्या विस्तृतीकरणाद्वारे स्पष्ट केले आहे.

या कलमाचा विस्तार करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने नागरिक आणि राजनैतिक अधिकारांशी संबंधित द्वितीय मसुदा (Protocol II) स्वीकारला आहे त्यात फाशीची शिक्षा रद्द करण्यासाठी तरतुद केली आहे. हा मसुदा समाविष्ट करण्यामागे संयुक्त राष्ट्रांची अशी विचारधारा आहे की, व्यक्ती जेव्हा जन्माला येते, तेव्हा त्याचे जीवन हिरावून घेण्याचा अधिकार कोणत्याही परिस्थितीत कोणालाही नाही, अगदी कायद्यालासुद्धा नाही. म्हणूनच जरी, एखाद्या व्यक्तीने गंभीर गुन्हा केला असला तरी त्या व्यक्तीला जास्तीत जास्त जन्मठेपेची शिक्षा दिली जाऊ शकते. यामागील संयुक्त राष्ट्राचा आणखी एक महत्त्वाचा उद्देश असा आहे की, जर शिक्षा ठोठावलेली एखादी व्यक्ती कालांतराने निर्दोष आहे असे न्यायालयाला आढळून आले तर त्या व्यक्तीचे जीवन परत आणणे कधीच शक्य नाही. यानुसार अगदी दुर्ळातील दुर्मिळ घटनेत देखील मृत्यूदंडाच्या शिक्षेला प्रतिबंधित केले आहे. संयुक्त राष्ट्र संघाने रोमचा कायदा स्वीकारून आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय स्थापन केले आहे त्यामुळे व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य व सुरक्षा याबाबत कोणतीही तडजोड न करता व राष्ट्राचे कोणतेही बेकायदेशीर उद्देशांचा याचा विचार न होता व्यक्तीवरील खटला स्वतंत्र व निष्पक्ष पध्दतीने चालेल.

तसेच व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य व सुरक्षा नेहमी साध्य करण्यासाठी व मानव अधिकारांच्या उल्लंघनापासून संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय मानव अधिकार आयोग स्थापन करण्याची विनंती संयुक्त राष्ट्रसंघाने राज्यांना केली आहे.

## कलम ४ गुलामगिरी प्रतिबंध

**कोणालाही गुलामगिरीत किंवा दास्यात ठेवता कामा नये; सर्व प्रकारच्या गुलामगिरीस व गुलामांच्या व्यापारास मनाई करण्यात आली पाहिजे.**

मानवी इतिहासात, गुलामगिरीने विशेष जागा व्यापलेली आहे, जी प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत अस्तित्वात होती. पण जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये, आपण गुलामगिरीला संपूर्णतः नष्ट करण्यास अक्षम ठरलो आहोत आणि अजूनही गुलामगिरी विविध प्रकारे समाजामध्ये अस्तित्वात आहे. भांडारदार गुलामी, वेठबिगार, भिकारी, मानवी तस्करी आणि श्रम सक्ती या प्रकारात गुलामगिरी अस्तित्वात आहेत.



जंगम मालमत्तेवरील गुलामगिरीचा अर्थ आहे, मनुष्याला जनावारांसारखी वागणूक देणे व एखाद्या वस्तूसारखे बाजारात विकणे. एकदा मालकाने, एखाद्या व्यक्तीला खरेदी केल्यानंतर त्या मालकाला सर्व अधिकार प्राप्त होतात आणि खरेदी झालेल्या व्यक्तीला सोपवण्यात आलेली सर्व कामे करणे बंधनकारक असते.

## बंधिस्थ कामगार (वेठबिगार)

कोणतीही व्यक्ती किंवा त्याचे कुटुंब कोणत्याही श्रीमंत व्यक्ती किंवा सावकाराकडून घेतलेले कर्ज फेडण्यास असमर्थ असेल तर, संपूर्ण कुटुंब त्यांचे कर्ज परत फेडण्यासाठी कोणत्याही वेतनाशिवाय त्याच्याकडे काम करते.

## मानवी तस्करी

एका देशातून दुसऱ्या देशांमध्ये किंवा एका स्थानावरून दुसऱ्या ठिकाणी, मानवाचे (विशेषतः स्त्रिया व मुले यांचे) श्रम आणि शारीरिक शोषण करण्यासाठी किंवा विविध कारणांसाठी वाहतूक करणे म्हणजे 'मानवी तस्करी' होय.



## श्रमशक्ती

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या सक्तमजुरी/कामगारी संबंधित संकेत १९३२ नुसार, कोणत्याही व्यक्तीच्या ऐच्छिक संमतीशिवाय तिच्याकडून कोणतेही काम किंवा सेवा, दंड करण्याच्या धमकीने किंवा ते काम करण्यास भाग पाडणे म्हणजे 'सक्तीचे काम' होय.








आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या च्या आकडेवारीनुसार जगभरात सुमारे १२ दशलक्षपेक्षा जास्त लोक सक्तीचे श्रम करत आहेत.

या कलमानुसार वेश्याव्यवसाय, मुलांना कैदेत ठेवणे, बाल सैनिक, अत्यंत गरिबीमुळे स्त्री व मुलांना विकणे इत्यादी देखील वेठबिगार आणि गुलामगिरीची आधुनिक साधने आहेत. १९२६ मध्ये राष्ट्र संघाने (संयुक्त राष्ट्राची पूर्वार्थी संघटना) विविध स्वरूपातील वेठबिगारी आणि गुलामगिरीला थांबवण्यासाठी एक गुलामगिरी प्रतिबंधात्मक नियमावली स्वीकारली. पुढे या निय'ावलीशिवाय संबंधित तरतुदीचा विस्तार करण्यासाठी, १९५६ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने एक पुरक नियमावली स्वीकारली ज्याअंतर्गत ज्यांचे परिवर्तन गुलामगिरीत होऊ शकते अशा प्रथा किंवा आधुनिक साधने यांचा समावेश करण्यात आला. गुलामगिरीच्या नियमावलीशिवाय संयुक्त राष्ट्र संघाने, मानवी जीवन, स्वातंत्र्य व सुरक्षा इत्यादीला कोणत्याही स्वरुपात होणारी हानी टाळण्यासाठी, वेश्याव्यवसाय, बालतस्करी, अपहरण इत्यादींशी संबंधित अनेक नियमावली स्वीकारल्या आहेत. संयुक्त राष्ट्र संघाने २ डिसेंबर ही तारीख 'गुलामगिरी विरोधी दिन' म्हणून घोषित केली आहे. गुलामगिरीस वाव मिळेल असे राष्ट्रांचे कोणतेही कृत्य यावर आंतरराष्ट्रीय कायद्याने काटेकोरपणे प्रतिबंध घातले आहेत. भारतीय संविधानाचे कलम २३ आणि २४ हे सर्व प्रकारच्या गुलामगिरीस व मानवी तस्करी करण्यास प्रतिबंध करते.

हे कलम असे ही निदर्शनास आणते की, जोपर्यंत मानवजाती पूर्ण विनम्रतेने, इमानदारीने आणि बंधुत्त्वाच्या भावनेचे आचरण करत नाही, तोपर्यंत आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर कितीही कायदेशीर उपाय योजिले तरी, सर्व उपाय हे कागदावरच राहातील आणि लाखो व्यक्तींचे अधिकार रद्दबातल राहातील. म्हणूनच फक्त स्वत:च्या अधिकारांचा व सोयींचा विचार न करता इतरांच्या अधिकारांचाही विचार करणे आणि शक्य त्याप्रमाणे त्यांना संरक्षण देणे हे सर्व मानवजातीचे कर्तव्य आहे, जेणेकरून गुलामगिरीस प्रवृत्त करतील आणि इतरांच्या जीवनाला व स्वातंत्र्याला हानी करतील अशा कोणत्याही प्रकारच्या कार्यास प्रतिबंध घालता येईल.

## कलम ५ यातना/छळ प्रतिबंध

**कोणाचाही छळ करता कामा नये किंवा त्यास क्रूर, अमानुष किंवा कमीपणा आणणारी वागणूक किंवा शिक्षा देता कामा नये.**

संयुक्त राष्ट्राच्या, छळ व अन्य अमानवीय अपराधिक अपमानजनक व्यवहार नियमावली, १९८४ नुसार **छळ किंवा यातना म्हणजे, अशी कोणतीही कारवाई, जी तीव्र वेदना किंवा दु:ख, शारीरिक अथवा मानसिकरित्या, हेतूपुरस्कर काही प्राप्त करण्याच्या उद्देशाने करणे किंवा तिसऱ्या व्यक्तीच्या माहिती किंवा कबुलीजबाबावरून, त्याला किंवा तिसऱ्या व्यक्तीला प्रतिबद्धतेखाली किंवा प्रतिबद्ध होण्याच्या संशयाखाली शिक्षा करणे किंवा कोणत्याही प्रकारचे भेदभाव आधारित, कोणत्याही कारणास्तव, त्याला किंवा तिसऱ्या व्यक्तीला भिती घालणे किंवा भाग पाडणे; अशा वेदना किंवा दु:ख, एखाद्याद्वारा किंवा एखाद्याच्या चिथावणीवरून किंवा संमतीने किंवा सार्वजनिक अधिकाऱ्याच्या मुकसंमतीवरून, किंवा जी व्यक्ती आधिकारीक क्षमतेने कार्य करत आहे, याद्वारे होणे. या मध्ये फक्त मूळ किंवा प्रासंगिक कायदेशीर मान्यतेमुळे उद्भवणारे दु:ख किंवा वेदना समाविष्ट नाहीत.**

यातना हा मानव अधिकारांच्या उल्लंघनातील एक महत्त्वाचा पैलू आहे. यातना विविध मार्गांने प्रवृत्त केल्या जातात. यात शारीरिक, मनोवैज्ञानिक, मानसिक इत्यादी भिन्न स्वरुपात शिक्षा दिली जाते. याचा वापर शक्तिशाली व्यक्ती कमकुवत व्यक्तीविरुद्ध बदला घेण्यासाठी किंवा त्रास देण्यासाठी किंवा एखाद्या व्यक्तीकडून माहिती मिळविण्यासाठी केला जातो. काही वेळा अगदी छळवादातून मिळणाऱ्या आनंदासाठी किंवा कोणत्याही कारणाशिवाय देखील याचा उपयोग केला जातो. अनेक वेळा याचा वापर कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था अपराध्यांच्या विरुद्ध किंवा गुन्हे अन्वेषणामध्ये आरोपीविरुद्ध माहिती मिळविण्यासाठी करतात. अनेक वेळा पुरुष कर्मचारी महिलांच्या विरुद्ध यातनेचा/छळाचा अवलंब करतात.

यातना/छळ यावर मानव अधिकारांच्या आंतरराष्ट्रीय कायद्याने बंदी घातली आहे. संयुक्त राष्ट्राने १० डिसेंबर १९८४ रोजी, अत्याचार व अन्य क्रूर, अमानवीय किंवा अपमानजनक व्यवहार किंवा दंडविरोधी कराराचा स्वीकार केला. तसेच विएन्ना घोषणापत्र व कृती कार्यक्रम १९९३, म्हणजच विश्व मानव अधिकार सभा, स्पष्ट शब्दांमध्ये अत्याचाराचा निषेध करते,.

क्रूर, अमानवीय किंवा अपमानात्मक व्यवहार हे एक प्रकारे यातनेचे स्वरूप आहे, यात विशिष्ट स्थितीवर अवलंबून दिल्या जाणाऱ्या दंडाचे प्रकार समाविष्ट आहेत. उदाहरणार्थ शारीरिक शिक्षा, अंधाऱ्या खोलीत बंधिस्त करणे, बंदिवासात ठेऊन व्यक्तीच्या हालचालींवर निर्बंध घालणे, व्यक्तीमधे भय निर्माण करण्यासाठी कोणत्याही चुकीच्या पद्धतीचा वापर करणे, कैद्यांवर औषधांचा प्रयोग करणे,

वृषण काढून टाकणे (स्त्रियांमध्ये अंडाशय काढून टाकणे) किंवा इतर पद्धती अवलंबणे, जननांग विकृत करणे, मूलभूत जीवनावश्यक विशेषत: अन्न व पाणी अशा गरजांपासून वंचित करणे, निर्जन कैद, किंवा इतर कुठल्याही पद्धतींचे एका व्यक्ती किंवा व्यक्तींच्या समूहाविरुद्ध कोणत्याही प्रकारे उत्पिडन करणे, यांचा समावेश यातनेच्या व्याख्येत होतो.

यातना, क्रूर, अमानवी किंवा अपमानजनक व्यवहाराला प्रतिबंध घालण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने सदस्य राष्ट्रांद्वारे नियुक्त दहा तज्ज्ञांची एक समिती स्थापन केली आहे. ही समिती नियमावलीतील तरतुदींच्या अंमलबजावणीचे परीक्षण व राष्ट्रांद्वारे पालन करण्यासाठी वेळोवेळी शिफारसी करते. या समितीद्वारे नियमितपणे केलेले निरीक्षण व शिफारशींचा सारांश सामान्य सभेत सादर केला जातो. राष्ट्रांद्वारे केल्या जाणाऱ्या कोणत्याही प्रतिबंधात्मक कृत्य प्रकारावर आणि लज्जास्पद कारवायांवर प्रतिबंध करण्यासाठी, अलीकडेच जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी यासारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी देशांना कर्ज न देण्याच्या कारणांमध्ये यातना/छळ या संबंधित प्रकाराचे कारण देखील समाविष्ट केले आहे. यातना टाळण्यासाठी आणि एक फौजदारी गुन्हा म्हणून विचार होण्यासाठी भारताने भारतीय दंड विधानाच्या कलम ४९८ (अ) अंतर्गत अधिनियम केला आहे.

## कलम ६ कायद्यापुढे माणूस म्हणून मान्यता मिळविण्याचा अधिकार

### प्रत्येकाला सर्वत्र कायद्याच्या दृष्टीने माणूस म्हणून मान्यता मिळण्याचा अधिकार आहे

याचा अर्थ कुठल्याही व्यक्तीला त्यांच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक किंवा सांस्कृतिक स्थिती निरपेक्ष सर्वमान्य असलेले मानव अधिकार असतात. यानुसार एखाद्या देशातील नागरिकाला प्रत्येक देशात किमान मूलभूत अधिकारांचा आनंद उपभोगण्यासाठी किमान समान पद्धतीने योग्य वागणूक देणे आवश्यक आहे. एखाद्या देशातील बिगर-नागरिकाला व्यक्तीला त्या देशात वास्तव्य करताना काही मूलभूत अधिकार आहेत आणि ते कुणालाही काढून घेण्याचे अधिकार नाहीत. उदाहरणार्थ भारतातील 'अ' नामक व्यक्ती कुठल्यातरी कारणास्तव इंग्लंडचा प्रवास करताना, प्रवासादरम्यान वेगवेगळे देश ओलांडून जाताना, त्या व्यक्तीला त्या त्या देशातील कायद्यानुसार शक्य



त्या सोयीसुविधा व आदर सन्मान देणे आवश्यक आहे, जेणेकरून 'अ' या व्यक्तीला जीवन आणि स्वातंत्र्य उपभोगण्याचा आनंद घेता येईल. स्थलांतरित कामगार आणि अनिवासी लोक किंवा शारीरिक व मानसिकरित्या अक्षम (अपंग) लोकांना संरक्षण दिले पाहिजे. ही जबाबदारी व्यक्ती आणि समाजावर देखील आहे. कोणत्याही परिस्थितीत जीवन आणि स्वातंत्र्याला हानी पोहचविण्याची परवानगी

नाही. संयुक्त राष्ट्राची घोषणा स्पष्ट करते की, आम्ही म्हणजे जगातील सर्व लोक नैसर्गिकरीत्या कायद्यासमोर समान आहोत. युनेस्को आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या इतर संघटना विविध देशातील कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देतात आणि कोणत्याही प्रकारचे उल्लंघन टाळण्यासाठी विविध मार्ग अन् तंत्रे सुचवितात.

कायद्यासमोर समानता साध्य करण्यासाठी, राष्ट्राला लोकांच्या कोणत्याही समुदायासाठी विविध घटकांवर अवलंबून कोणत्याही सवलतींचा विस्तार करण्याचा अधिकार आहे. त्याच बरोबर, राष्ट्राच्या सुरक्षिततेखाली येणाऱ्या व्यक्तींनी हे लक्षात घ्यायला हवे की, जर कोणत्याही समुदायाला दिलेल्या सवलतींची उद्देश्यपूर्ती झाली असेल, तर गरज वाटल्यास त्या सवलती कधीही काढून घेतल्या जाऊ शकतात. यानुसार विकसित आणि विकसनशील देशातील अंतर कमी करण्यासाठी त्यांच्या एकमेकांशी विविध क्षेत्रातील असलेल्या संबंधांमध्ये अनेक सवलती मंजूर केल्या जातात.

तथापि, जगभरात सतत होणाऱ्या अनेक अशोभनीय घटना ऐकण्यात येतात. कुठल्याही व्यक्ती किंवा समुदायाविरुद्ध कोणत्याही देशात होणारी अशी अशोभनीय कृत्ये अत्यंत निंदनीय असतात. या कलमाचा सारांश असा आहे की, प्रत्येक व्यक्तीला जीवन आणि स्वातंत्र्य उपभोगण्याचे अधिकार आहेत आणि म्हणूनच स्वत:च्या अधिकारांचा उपयोग करताना दुसऱ्याच्या प्रति समानता, सन्मान, जीवन, स्वातंत्र्य व इतर अधिकारांचा आदर करून त्यांना उत्तेजन दिले पाहिजे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

## कलम ७ कायद्यापुढे समानता

सर्व लोक कायद्याच्या दृष्टीने समान आहेत व कोणताही भेदभाव न करता कायद्याचे समान संरक्षण मिळण्याचा त्यांना हक्क आहे. या जाहीरनाम्याचे उल्लंघन करून कोणत्याही प्रकारचे भेदभाव झाल्याच्या बाबतीत व असा भेदभाव करण्यास चिथावणी देण्यात आल्याच्या बाबतीत सर्वांना समान संरक्षण मिळण्याचा हक्क आहे.

हे कलम, कलम २ आणि ६ चे विस्तारित स्वरूप आहे. या कलमानुसार, व्यक्तीचे समाजात कोणतेही स्थान असो, कुठल्याही परिस्थितीत कायद्यासमोर सर्व समान आहेत. कधीकधी स्त्रिया, मुले, अपंग व्यक्ती, अल्पसंख्यांक किंवा विविध सामाजिक मागासलेले वर्ग यासारख्या कमजोर व संवेदनशील वर्गांच्या अधिकारांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांचा विकास करण्यासाठी जर त्या देशाच्या कायद्यामध्ये काही विशेष अधिकार देण्यात आले असतील तर त्याला असमान मानले जाणार नाही.

प्रस्तुत कलम भारतीय संविधानाच्या कलम १४ सारखे आहे. जे समानतेच्या सिद्धांतावर आधारित आहे. तथापि, जगातील लोकांमध्ये सामान्य बंधुभावाचे महत्त्व याबाबत असणाऱ्या सामंजस्याचा अभाव किंवा नैतिक व मौलिक कर्तव्यांना बाजूला सारल्याने अस्थायी प्रमाणात जगभरातील लोक, स्वत:च्या हिताच्या रक्षणासाठी, इतरांच्या जीवन व स्वातंत्र्याच्या अधिकाराची किंमत मोजून एकमेकांविरुद्ध अनेक मानहानिकारक पद्धतींचा अवलंब करत आहेत. याप्रकारचे बेकायदेशीर हेतू, अनेक वेळा व्यक्तींच्या आपापसांतील अनावश्यक संघर्षाचे आणि विकास कार्यातील अडथळ्यांचे कारण ठरले आहे.

हे कलम अप्रत्यक्षरित्या असे निदर्शनास आणते की, कायद्याच्या नजरेत असमान वागणूक दिली जाणार नाही. प्रत्येक देशाने स्वीकारलेली व पूर्ण करण्यासाठी वचनबद्धता असलेली, संयुक्त राष्ट्र सनद व आंतरराष्ट्रीय कायद्याच्या खऱ्या हेतूंची अंमलबजावणी (कार्यान्वयन) करणे हे त्या देशाचे कर्तव्य आहे. राष्ट्राबरोबर आपण म्हणजेच संयुक्त राष्ट्र संघाच्या लोकांनी राष्ट्रांचे भागीदार म्हणून सामान्य बंधुता व आंतरराष्ट्रीय कायदा आणि मानव अधिकारांच्या खऱ्या उद्देशांना साध्य करण्याची जबाबदारी आहे.

## कलम ८ प्रभावी उपाय अधिकार

**घटनेने किंवा कायद्याने हमी दिलेल्या मूलभूत हक्कांचा भंग करणाऱ्या कृत्यांच्या बाबतीत सक्षम राष्ट्रीय अधिकारणांमामत परिणामकारक उपाययोजना करण्याचा प्रत्येकास अधिकार आहे.**

या कलमास मागील दोन्ही कलमांसह संयुक्तपणे वाचायला हवे. या कलमातील ‘प्रत्येकास’ हा शब्द जास्त महत्त्वाचा आहे. त्यानुसार राज्याद्वारे, कायद्याच्या दृष्टीने माणूस म्हणून जगण्याच्या अधिकाराच्या अंमलबजावणीत, नागरिक, परदेशी किंवा राष्ट्रहीन व्यक्तींदरम्यान फरक केला जाऊ नये. कोणत्याही व्यक्तीसाठी त्यांच्या संवैधानिक किंवा कायदेशीर अधिकारांचे उल्लंघन केल्याप्रकरणी स्थानिक न्यायालयाद्वारे परिणामकारक उपाययोजनेची तरतुद करणे हा या कलमाचा उद्देश आहे. अशा प्रकरणामध्ये उपाय म्हणून फक्त त्या देशाच्या स्थानिक कायद्यांतर्गत दावा केला जाऊ शकतो, वैश्विक घोषणापत्राअंतर्गत नाही. त्याचप्रमाणे, एखाद्याने जर कोणताही अपराधिक गुन्हा केला असेल आणि तो आंतरराष्ट्रीय कायद्यानेही गुन्हा ठरत असेल तर, अशा अपराधांशी आंतरराष्ट्रीय न्यायाधिकरण संबंधित असते. तथापि, आंतरराष्ट्रीय अपराध्यांच्या (जसे की माजी राज्यकर्ते, आंतरराष्ट्रीय गुन्हेगार किंवा दहशतवादी गुन्ह्याचे खटले चालवण्यासाठी प्रथमत: कोणतीही यंत्रणा नसल्याने, अनेक वेळा राष्ट्र, तदर्थ हंगामी न्यायाधिकरणाची रचना करायचे पण ते काही दृष्टीने पक्षपाती असायचे.

असे दुरुपयोग टाळण्यासाठी, संयुक्त राष्ट्राने हेग, द नेदरलँड्स (The Netherlands) येथे २००२ मध्ये आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयाची स्थापना केली. परंतु भारत आणि यूएसए सह इतर अनेक राष्ट्र अजूनही याचे सदस्य नसल्यामुळे या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राखाली येत नाही. म्हणून पुढे, २००५ मध्ये आमसभेने एका घोषणापत्राद्वारे काही मार्गदर्शक तत्त्वे व सिद्धांत स्वीकारले आहेत ज्याचे अनुसरण राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय गुन्हेगाराच्या मानव अधिकारांचे रक्षण करण्यासाठी देखील करायचे आहे.

जरी अद्याप, अनेक राष्ट्रांनी रोम संविधीवर स्वाक्षरी करायची असली तरी, राष्ट्रांच्या सहयोगाने व संयुक्त राष्ट्राच्या प्रयत्नाने, पिडीतांना त्यांचे अधिकार कायम राखण्यासाठी एक व्यासपीठ नक्की मिळले अशी अपेक्षा आहे.

**आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालय, हेग, द नेदरलँड्स**

## कलम ९ अनियंत्रित अटकेस प्रतिबंध

**कोणालाही अनियंत्रितपणे: अटक, स्थानबद्ध किंवा हद्दपार करता कामा नये.**



या जाहीरनाम्यातील आधीच्या दोन्ही कलमानंतरचे हे कलम, एखाद्या व्यक्तीचे जीवन व स्वातंत्र्याचे अनियंत्रित कायदेशीर कारवायांपासून संरक्षणाचे आश्वासन देते. अनेकदा अशा अनियंत्रित कारवाया मुख्यत: देशातील कार्यकारी अधिकाऱ्यांद्वारे केल्या जातात. या कलमातील तरतुदीनुसार, कोणत्याही व्यक्तीला संशयाखाली अटक करणे किंवा तुरुंगात ठेवणे किंवा एखाद्या व्यक्तीला अव्यक्त गंतव्य ठिकाणी पाठवणे अशी कोणतीही कारवाई न्यायालयास न कळवता करता कामा नये. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या या सामान्य नियमाचे कोणत्याही विचलनाशिवाय त्याचे पालन करणे सर्व राष्ट्रांना आवश्यक आहे.




अनुचित अटक



स्थानबद्दता



(अंदमान आणि निकोबार बेटावरील कारागृहामध्ये) हद्दपारी

कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था किंवा एजन्सीद्वारे फौजदारी कायद्याखाली कारवाया करताना केवळ संशयावरून अनियंत्रित अटक, स्थानबद्धता किंवा अव्यक्त गंतव्य ठिकाणी पाठवणे अशा अनियंत्रित कारवायांपासून हे कलम स्वातंत्र्याची हमी देते.

'प्रतिबंधात्मक स्थानबद्धता' याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीला गुन्हा करण्यापासून रोखण्यासाठी पोलिसांच्या ताब्यात ठेवणे. पण अनेकदा, लोकशाहीच्या अधिकाराची अंमलबजावणी टाळण्यासाठी, पोलिस कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली लोकांना अटक करतात. न्यायालायाद्वारे खटला आणि दोषारोपण झाल्याशिवाय, एखाद्या व्यक्तीला कोणताही गुन्हा घडण्याच्या शक्यतेच्या किंवा संशयाच्या कारणाने पोलिसांनी ताब्यात घेणे म्हणजे प्रतिबंधक स्थानबद्धता असा याचा कायदेशीर अर्थ आहे. उदाहरणार्थ, स्वातंत्र्यलढ्यादरम्यान, ब्रिटीश सरकार अनेक लोकांना लहानसहान कारणांवरून अटक करीत असे व खटला न चालवता अनेक वर्ष त्यांना कोठडीत ठेवत असे, काही वेळा तर त्यांना हद्दपार केले जाई किंवा अज्ञात स्थानी पाठवून दिले जात असे.

प्रतिबंधात्मक स्थानबद्धता ही यूएसए, ब्रिटन आणि कॅनेडा या देशांसह अनेक लोकशाही राष्ट्रांची सामान्य वैशिष्ट्ये आहेत. तथापि या देशांमध्ये याचा वापर शांततेच्या काळात नव्हे तर केवळ युद्धजन्य परिस्थिती दरम्यान केला जातो. पण भारतीय संविधानात यांचा समावेश सुरक्षेच्या कारणास्तव, शांती व सुव्यवस्था ठेवण्यासाठी आणि काही वेळा समुदायास आवश्यक सेवा व पुरवठा कायम ठेवण्यासाठी केला जाऊ शकतो. तसेच भारतात, विधानमंडळाला प्रतिबंधक स्थानबद्धता कायदे करण्याचे अधिकार आहेत, व त्याद्वारे आवश्यक कृती करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकाऱ्यांना मिळतात. तथापि अनेक वेळा, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था त्यांना दिलेल्या अधिकारांचा दुरुपयोग करून मानव अधिकारांचे उल्लंघन करतात. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून मानव अधिकारांच्या उल्लंघनाची परिसीमा गाठली जाते, ज्यामध्ये खटला चालू असलेल्या अनेक आरोपींना न्यायिक उपाय/तोडग्याशिवाय वर्षानुवर्ष कारागृहामध्ये झुरत ठेवले जाते. ही स्थिती लक्षात घेऊन भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून कायद्याच्या अधिकारांद्वारे होणारे निष्पाप लोकांच्या मानव अधिकारांचे उल्लंघन प्रतिबंधित करण्यासाठी व त्याचे अनुसरण करण्यासाठी वेळोवेळी अनेक मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित केली आहेत.

(डी. के. बसू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य, AIR १९९७ SC ६१०; सुबेसिंघ विरुद्ध हरीयाणा राज्य AIR २००६ SC ११७; रामलीला मैदान विरुद्ध गृहः सचिव MNU/SC/०१३१, २०१२, ३रा राष्ट्रीय पोलीस आयोग अहवाल) हे कलम, जगभरातील राष्ट्रांवर व नागरी समाजांवर विशेषतः स्थानबद्ध करण्याविषयी कोणत्याही प्रकारच्या शक्ती/सत्ता किंवा अधिकारांचा गैरवापर टाळण्यासाठी बंधने घालते. स्थानबद्धता शब्दशः आणि प्रत्यक्षात, मुक्तपणे फिरण्याचा अधिकार, बोलण्याचा, भाषण



करण्याचा अधिकार, जीवन व स्वातंत्र्याचा अधिकार इत्यादी अनेक मानव अधिकारांचे उल्लंघन करते. चित्रात ग्वान्टानामो बे दर्शिवले आहे त्याचे रुपांतर सन २००२ मध्ये अमेरिकन सरकारने कारागृहात केले. त्याठिकाणी अफगाणिस्तान आणि इराकच्या युद्ध कैद्यांना हद्दपार करण्यासाठी व शिक्षा देण्यासाठी पाठवले जायचे. येथे कैद्यांना दिली जाणारी वागणूक मानव अधिकाराच्या दृष्टीने अत्यंत दु:खद होती. स्वातंत्र्याच्या लढ्यादरम्यान ब्रिटीश सरकारद्वारे भारतीयांना दिली जाणारी काळ्या पाण्याची शिक्षा यासारखी ही परिस्थिती होती.

## कलम १० नि:पक्ष न्यायचौकशीचा अधिकार

**प्रत्येकाला समान भूमिकेवरून त्याचे अधिकार व जबाबदाऱ्या निश्चित करण्याच्या संबंधात किंवा त्यांच्यावरील कोणत्याही दंडनीय आरोपाचा न्यायनिर्णय करण्याच्या संबंधात स्वतंत्र व नि:पक्षपाती अधिकारणामार्फत न्याय व जाहीर सुनावणी केली जाण्याचा हक्क आहे.**

दिलेल्या कलमानुसार, वाद कोणत्याही प्रकारचे असो (दिवाणी किंवा फौजदारी), एखाद्या व्यक्तीला त्याच्या प्रकरणात, न्यायालयाच्या किंवा देशातील इतर प्रचलीत कायदेशीर साधनांच्या माध्यमाने, प्रतिवाद (बचाव) करण्याचा अधिकार आहे. वरील कलम ९ मध्ये चर्चा केली आहे त्याप्रमाणे अनेक राष्ट्रांद्वारे, विशेषतः विकसित देशांमध्ये युद्ध गुन्ह्यांशी संबंधित स्थापित प्रक्रियेचा गैरवापर टाळण्यासाठी, संयुक्त राष्ट्राने आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला.




भारतात, समाजातील विविध वर्गांमधील संविधानाचे पुरेसे ज्ञान व कायदेशीर बारकाव्यांशी संबंधित जागरूकतेचा अभाव असल्याने कायदा अंमलबजावणी करणारे अधिकारी नागरी विवादामध्ये हस्तक्षेप करण्याचा आणि मध्यस्थाच्या भूमिकेत त्यांना सोडविण्याचा प्रयत्न करतात. अनेक वेळा हे, मानव अधिकारांच्या उल्लंघनाचे कारण ठरते. उदाहरणार्थ, देशात विशेष करून गावांमध्ये, अनेकदा श्रीमंत आणि शक्तिशाली व्यक्ती अधिकाऱ्यांच्या सहाय्याने त्यांचे वाद स्वतःच्या बाजूने निकाली काढण्याचा व गरीब लोकांना न्यायालयीन मदत मिळविण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करतात. असे प्रकार रोखण्यासाठी न्यायपालिकेने अनेक निर्णयामध्ये कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याद्वारे अवलंबल्या जाणाऱ्या प्रक्रियांची आणि खटल्यांमध्ये एखाद्या साक्षीदाराच्या उलट तपासणीच्या पद्धतींची निंदा केली आहे. (सदानंद बाई विरूद्ध व्ही. सी. एन. रवी थ. झ.(श). छे. १७४००,२००८; जे. लक्ष्मण आणि

इतर विरुद्ध लखमी; अरू विरुद्ध पोलीस आयुक्त व इतर, MNU/AP/११८९/२००४) आणि इतर त्यानुसार वेळोवेळी न्यायालयाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांद्वारे या गोष्टींवर भर दिला आहे की, मानव अधिकार घोषणापत्र व घटनात्मक तरतुदींना एकत्रित विचार करावा आणि असे ही सांगितले आहे की, फौजदारी व दिवाणी खटल्यामध्ये, खटल्यांची सुनावणी सक्षम न्यायिक अधिकाऱ्याद्वारे केली जावी. खटल्यांचे निकाल शक्यतो कमी वेळेत लावण्यात यावेत. फौजदारी प्रकरणांच्या निकालामध्ये जास्त वेळ लागत असल्याचे निदर्शनास आल्यावर, व्यक्तींच्या मूलभूत मानव अधिकारांना बळ मिळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयांना फौजदारी खटल्यांना जलदरित्या निकाली काढण्याचे आदेश दिले.

## कलम ११ निरपराधित्व गृहीत धरणे आणि दंडात्मक कायद्याची पूर्वव्यापी उपाययोजना न करणे

**१. दंडनीय अपराधाचा आरोप ज्यावर ठेवण्यात आला आहे अशा प्रत्येक व्यक्तीस जाहीर न्याय चौकशीत तो दोषी असल्याचे सिद्ध होईपर्यंत तो निरपराध आहे असे गृहीत धरले जाण्याचा अधिकार आहे. अशा न्याय चौकशीत त्याच्या बचावासाठी आवश्यक असलेली सर्व प्रकारची हमी त्यास देण्यात आलेली असली पाहिजे.**

**२. जे कोणतेही कृत्य किंवा वर्तन ज्यावेळी घडले त्या वेळी जर ते राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कायद्याने दंडनीय अपराध ठरत नसेल, तर त्या कृत्याच्या किंवा वर्तनाच्या संबंधित कोणालाही कोणत्याही दंडनीय अपराधांचा दोषी समजता कामा नये. त्याचप्रमाणे दंडनीय अपराध घडला असेल त्या वेळी त्याबद्दल जी शिक्षा करण्याजोगी असेल त्या शिक्षेपेक्षा अधिक कडक शिक्षा त्यास देता कामा नये.**


दुसऱ्या महायुद्धा नंतरचा न्युरेंबर्ग खटला

सदरचे चित्र 'आंतरराष्ट्रीय न्यायाधिकरण' न्यायालयातील आहे. याची निर्मिती १९४५ मध्ये केली गेली. दुसऱ्या जागतिक युद्धानंतर विजयी राष्ट्रांद्वारे (अमेरिका, ब्रिटन अशी दोस्तराष्ट्रे व इतर) मानवजातीची सुरक्षा व शांतीचे उल्लंघन करणाऱ्या व युद्धातील लोकांना ॲडोल्फ हिटलरसह व राष्ट्रांना (पराभूत अक्ष राष्ट्रे, विशेषतः जर्मनी आणि जपान) शिक्षा देण्यासाठी याची निर्मिती केली गेली. सदर चित्र नुरेम्बर्ग (Nuremberg) सुनावणीचे आहे, हे इतिहासात आंतरराष्ट्रीय कायद्यातील पहिले असे प्रकरण आहे, ज्या निकालात असे सांगण्यात आले की, एका व्यक्तीला सुद्धा मानवजातीच्या विरुद्ध केलेल्या गुन्ह्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याखाली शिक्षा होऊ शकते. या महत्त्वपूर्ण

निर्णयामुळे राष्ट्राप्रमाणेच व्यक्तीसुध्दा हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे विषय आणि वस्तू बनले. न्यायाधिकरणाच्या स्थापनेमुळे हे निःसंशयपणे सिद्ध केले, की कोणत्याही दोषी व्यक्तीला, तो कितीही उच्च पदावर असला तरी, सक्षम न्यायालयाद्वारे कायदेशीर दंडाची शिक्षा केली जाऊ शकते.

१९४६ मध्ये टोकियो न्यायाधिकरणाची स्थापना, युद्ध काळात काही जपानी लोकांच्या कथित युद्ध अपराध्यांच्या सुनावणीसाठी करण्यात आली. महान भारतीय विधीवेत्ता राधाबिनोद पाल (हे प्राध्यापक एस. के. अग्रवाल, कायदा विभाग प्रमुख व संस्थापक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे ते मार्गदर्शक/शिक्षक होते) यांच्या विरोधी मताने आधुनिक काळात मानव अधिकारांच्या विकासावर विशेषतः आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याच्या प्रगतीवर सकारात्मक परिणाम केला आहे. (अन्यथा याला आंतरराष्ट्रीय युद्धाचा कायदा म्हणून देखील ओळखले जाते, ज्याचे पालन विजयी राष्ट्राने युद्धाच्या काळात व युद्धाच्या नंतर युद्ध कैद्यांशी वागताना करावायचे आहे.) या दोन्ही न्यायाधिकरणाच्या स्थापनेनंतर अनेक तात्कालिक न्यायाधिकरण विशेषतः रवांडा, युगोस्लाविया इत्यादी देशांमध्ये स्थापित करण्यात आले. अशा तत्कालीन न्यायाधिकरणांची वाढती संख्या आटोक्यात आणण्यासाठी व त्यांच्याद्वारे अवलंबल्या जाणाऱ्या चुकीच्या पद्धती लक्षात घेता, संयुक्त राष्ट्राने आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयाची स्थापना केली. या घटनामोडींचा एक चांगला परिणाम आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी कायदा किंवा आंतरराष्ट्रीय फौजदारी कायद्याच्या विकासावर झाला.



सुप्रसिद्ध टोकियो न्यायाधिकरण

हे कलम प्रामुख्याने चार महत्त्वाचे सिद्धांत सांगते, ते खालील प्रमाणे

## १. निरपराधित्व गृहीत धरणे

या सिद्धांतानुसार प्रत्येक व्यक्ती ज्याला संशयाच्या कुठल्याही कारणास्तव किंवा कोणत्याही फौजदारी गुन्ह्याचे आरोप लावण्यात आले असले तरी, जो पर्यंत ते आरोप न्यायालयामध्ये सिद्ध होत नाहीत तोपर्यंत त्या व्यक्तीला दोषी म्हणून गृहीत धरले जाणार नाही. अनेक देशांमध्ये ताब्यात घेतलेल्या एखाद्या व्यक्तीला काही कायदेशीर अटींवर (म्हणजे जामीन) सोडण्याची तरतुद आहे, जेणेकरून त्या व्यक्तीला त्याच्या किंवा तिच्या मानव अधिकार किंवा वैयक्तिक स्वातंत्र्याचा वापर प्रलंबित सुनावणीच्या काळात सक्षमरित्या करता येईल.

## २. संरक्षणाचे अधिकार

या कलमातील हमी ह्या शब्दाचा अर्थ, कोणत्याही गुन्ह्यातील आरोपी व्यक्तीला त्याचे अपराध देशातील सर्वोच्च न्यायालयामध्ये सिद्ध होऊन अंतिम निर्णय होईपर्यंत त्या व्यक्तीला स्वत:चा बचाव करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. याच कारणामुळे, कनिष्ठ न्यायालयापासून देशातील सर्वोच्च न्यायालयापर्यंत उपलब्ध सर्व कायदेशीर उपायांचा वापर करून अपील करता येतो (म्हणजे कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयास उच्च न्यायालयामध्ये आव्हान करणे). काही प्रकरणात, जर एखादी आरोपी व्यक्ती गरीब असेल आणि स्वत:च्या प्रकरणाचा वैयक्तिकरित्या बचाव करण्यास अक्षम असल्यास, देशाच्या संविधानाच्या तरतुदीनुसार मानव अधिकार किंवा मूलभूत अधिकारांच्या हमीसाठी, अशा व्यक्तीचा बचाव करण्यासाठी त्या व्यक्तीला संपूर्ण मर्यादेपर्यंत कायदेशीर प्रतिनिधीत्त्व प्रदान करणे हे राष्ट्राचे कर्तव्य आहे.

## ३. सार्वजनिक सुनावणींचे अधिकार

आणखी हा एक महत्त्वपूर्ण सिद्धांत आहे की, एखाद्या अपराधिक गुन्ह्याच्या आरोपी व्यक्तीची योग्य सुनावणी कायदेशीररित्या सक्षम न्यायालयाद्वारे न करता त्या व्यक्तीला शिक्षा करता येत नाही. हा सिद्धांत, न्याय हा फक्त केला जाऊ नये तर तो होतानाही दिसायला हवा (“justice should not only be done but should be seen to be done.”) या एका कायदेशीर म्हणीवर अवलंबलेला आहे. कोणताही खटला गुप्तरित्या किंवा कोणत्याही चौकशीविना केल्यास, न्यायाची प्रक्रियाच बिघडून जाईल. त्या खटल्यातील आरोपी व्यक्तीला त्याचा निरपराधीपणा सिद्ध करण्यासाठी किंवा योग्य परिक्षण न करता किंवा कोणतेही पुरावे सादर करण्याची संधी प्रदान न केल्याने त्या व्यक्तीच्या मानव अधिकारांचे उल्लंघन होऊ शकते.

## ४. अपूर्वव्यापी कायदा (Non-retroactivity of law)

मानव अधिकारांच्या वाढीसाठी व संरक्षणासाठी हा एक महत्त्वाचा सिद्धांत आहे. या सिद्धांतानुसार, कोणत्याही परिस्थितीमध्ये एका गुन्हेगार व्यक्तीला गुन्हा घडण्याच्या वेळी अंमलात असलेला कायदा वगळता इतर कोणत्याही कायद्यानुसार शिक्षा करता येत नाही. एखाद्या आरोपी व्यक्तीचा गुन्हा सुनावणीनंतर सिद्ध झाला असेल तर आणि त्या सुनावणीच्या कालावधीनंतर जर नवीन कायदा अस्तित्त्वात आला ज्यामध्ये शिक्षेची मात्रा वाढवण्यात आली असेल तर या नवीन कायद्यानुसार त्या आरोपीला नवीन  वाढीव शिक्षा करता येत नाही.

### ५. दुहेरी संकट (Double Jeopardy)

जरी कलमामध्ये हे सिद्धांत स्पष्टपणे उल्लेखित नसले तरी, ते मानव अधिकारांचे स्वयंचलित सिद्धांत म्हणून काम करतात. हे सिद्धांत एखाद्या व्यक्तीला समान गुन्ह्यासाठी परत सुनावणी पासून व दोनदा शिक्षा होण्यापासून कायदेशीर संरक्षण देतात. ही प्रत्येकासाठी एक वैयक्तिक घटनात्मक हमी आहे. हा एक प्रक्रियात्मक भाग आहे आणि प्रत्येक राष्ट्राच्या संविधानाच्या माध्यमातून किंवा कायद्याच्या तरतुदीद्वारे याची हमी असते. कोणत्याही विचलनाशिवाय सर्व राष्ट्रांनी याचे सक्तीने पालन करणे आवश्यक आहे.

## कलम १२ गोपनीयतेचा/खाजगी जीवनाचा अधिकार

**कोणाचेही खाजगी जीवन, त्याच्या कुटुंब, घर अथवा त्याचा पत्रव्यवहार यांच्या संबंधात अनियंत्रित ढवळाढवळ होता कामा नये. त्याचप्रमाणे त्याची प्रतिष्ठा किंवा नावलौकिक यावर हल्ला होता कामा नये. अशी ढवळाढवळ किंवा हल्ला झाल्यास त्याविरुद्ध प्रत्येकास कायद्याने संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे.**

'गोपनीयता' हा शब्द लॅटिन शब्द 'प्रायव्हेटस' (privatus) पासून तयार केला आहे त्याचा अर्थ इतरांपासून वेगळे असणे होय. याचा दुसरा अर्थ असा, एखाद्या व्यक्तीला त्याचा किंवा तिच्या आवडीप्रमाणे आणि कोणाच्याही हस्तक्षेपाशिवाय जगण्याचे पूर्ण स्वतंत्र्य आहे. याचे मूळ अधिकाराच्या नैसर्गिक कायदा सिद्धांताशी संलग्न आहे. यानुसार प्रत्येक व्यक्ती त्याच्या पसंतीने जीवन जगण्यास मुक्त आहे. तथापि, यामुळे दुसऱ्याचे अधिकार प्रभावित होता कामा नये. सामान्य कायदा सिद्धांतावर आधारित, प्रत्येकास वैयक्तिक व संपत्तीचे स्वरक्षण प्राप्त आहे. बॅरीस्टर सॅम्युईल. डी. वॉरेन आणि अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच माजी न्यायाधीश लुईस. डी. ब्रेन्डेइस यांनी त्यांच्या हार्वर्ड लॉं रिव्ह्यू, मधील १८९० च्या लेखात, अमेरिकन संदर्भात प्रथमच गोपनीयतेची कायदेशीर संकल्पना प्रस्तुत केली. हे लेख आजही गोपनीयतेच्या कायद्याच्या विकासात अध्वर्यू मानले जातात. या शोधकार्याच्या आधारे अमेरिकन कायदा प्रणालीमध्ये अनेक परिवर्तने घडली आहे, परिणाम स्वरूप अमेरिकन संविधानाच्या चौथ्या घटनादुरुस्तीद्वारे एक मूलभूत अधिकार म्हणून 'गोपनीयतेचा' समावेश करण्यात आला. एलन वेसटीन (१९६८) यांनी त्यांचे पुस्तक 'गोपनीयता आणि स्वातंत्र्य' मध्ये गोपनीयतेचा अधिकार याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, प्रत्येक व्यक्ती सतत वैयक्तिक समायोजन प्रक्रियेत गुंतलेली आहे, ज्यात ती प्रकटीकरणासह गोपनीयतेसाठी तसेच तो राहात असलेल्या पर्यावरणीय परिस्थिती आणि समाजाने आखलेल्या सामाजिक रुढींच्या प्रभावाखाली अन्य लोकांशी स्वतःचा संपर्क स्थापित करण्यासाठी संतुलन स्थापित करण्याचा प्रयत्न करतो.

समकालीन युगामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील (सांस्कृतिक अधिकाराचा भाग म्हणून) जलद विस्ताराने गोपनीयता हा एक महत्त्वाचा पैलू बनला आहे. आज गोपनीयतेत अनेक क्षेत्रे समाविष्ट केली गेली आहेत, ज्यामध्ये घर, कुटुंब आणि प्रतिष्ठेचाही समावेश करण्यात आला आहे. या अधिकाराचे कार्यान्वयन आणि संरक्षण कायदेशीर दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचे आहे. भारतीय संदर्भात विचार केला तर, भारताच्या संविधानाने या अधिकाराची स्पष्ट व्याख्या दिलेली नाही. पण, संविधानाच्या कलम २१ च्या तरतुदींचा विस्तार करत, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने जीवन व स्वातंत्र्याच्या अधिकाराचे एक अविभाज्य अंग म्हणून या अधिकाराचा समावेश केला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध तऱ्हेने होणारे अनुचित हस्तक्षेप उदाहरणार्थ डेटा किंवा दूरध्वनी संभाषण टेप करणे, संदेश ध्वनिमुद्रित करणे इत्यादी लक्षात घेता व अनेक प्रगत राष्ट्रांशी जुळवून घेण्यासाठी, भारत सरकार गोपनीयतेचा अधिकार सुनिश्चित करण्यासाठी नवीन कायदा अमलात आणण्याचा विचार करत आहे. या कलमानुसार, एखाद्या व्यक्तीची माहिती त्या व्यक्तीच्या कायदेशीर परवानगीशिवाय जर कोणत्याही व्यक्तीने काढली तर हे त्या व्यक्तीच्या जीवन, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेच्या अधिकाराचे उल्लंघन आहे. यानुसार, माहितीचा अधिकार कायद्यातील कलम ८ नुसार, गोपनीयतेला एक महत्त्वाचा पैलू समजून, एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक किंवा खाजगी माहिती घेणे प्रतिबंधित आहे.

### कलम १३ संचार, निर्गमन आणि पुन्हाप्रवेशाचे स्वातंत्र्य

**१. प्रत्येकास प्रत्येक राष्ट्राच्या हद्दीत संचार व वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य असण्याचा अधिकार आहे.**

**२. प्रत्येकास स्वत:चा देश सोडून कोणत्याही देशात जाण्याचा अथवा स्वत:च्या देशात परत येण्याचा अधिकार आहे.**

**३. वर उल्लेखित अधिकार, कायद्याने प्रदान केलेले निर्बंध आणि राष्ट्रीय सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य किंवा नैतिकता किंवा इतरांच्या अधिकाराचे व स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी आवश्यक आणि इतर मान्यताप्राप्त अधिकारांसह सुसंगत आहेत असे निर्बंध वगळता, कोणत्याही निर्बंधाच्या आधीन केले जाणार नाही.**

**४. कोणालाही स्वत:च्या देशात प्रवेश करण्याच्या अधिकारापासून अनियंत्रितपणे वंचित करता कामा नये.**

या कलमातील तरतुदींचा (परिच्छेद ३ व ४) विस्तार पुढे नागरी व राजकीय अधिकार कराराच्या कलम १२ अंतर्गत करण्यात आला. या कलमातील तरतुदीनुसार, प्रत्येक व्यक्तीला देशाच्या

सीमा ओलांडून मुक्तपणे संचार करण्याचा आणि त्याच्या आवडीच्या ठिकाणी वास्तव्य करण्याचा अधिकार आहे. तसेच कोणत्याही कारणास्तव विशेषतः लिंग, धर्म, भाषा इत्यादी आधारावर, व्यक्तीच्या संचारावर कोणीही आक्षेप घेता कामा नये. हा अधिकार एखाद्या व्यक्तीला, एका देशातून दुसऱ्या देशात स्थानांतर करण्यासाठी, त्या देशातील कायदा व आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तरतुदीनुसार पूर्ण स्वातंत्र्य प्रदान करतो. म्हणजेच, एखादी व्यक्ती जर अस्थायीपणे देश सोडून गेली असेल, तर ती व्यक्ती राष्ट्रीयत्त्वाचा त्याग करीत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीला देशात परत येण्याचा अधिकार आहे.



हे अधिकार निश्चित स्वरूपाचे किंवा अमर्यादीत अधिकार नाहीत असे हे कलम स्पष्ट करते. हे अधिकार कायद्याच्या निमयाच्या स्वाधीन आहेत. राष्ट्र एखाद्या विशिष्ट ठिकाणी, आपत्कालीन स्थिती किंवा अंतर्गत कलह किंवा कोणत्याही कारणास्तव, लोकांच्या प्रवेशास मनाई करू शकते. परिणामतः यामुळे निश्चितपणे अधिकार हिरावून घेतले जातात. तथापि, सुरक्षेच्या कारणास्तव नियंत्रणाबाहेरील परिस्थिती असेल आणि लोकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्र अशी पाऊले उचलू शकते.

## कलम १४ आश्रयाचे अधिकार

**१. प्रत्येकास छळापासून मुक्तता करून घेण्यासाठी इतर देशात आश्रय मिळविण्याचा व तो उपभोगण्याचा अधिकार आहे.**

**२. अराजकीय स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या संबंधात अथवा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या उद्दिष्टांशी व तत्त्वांशी विरुद्ध असलेल्या कृत्यांच्या संबंधात वस्तुतः उद्भवलेल्या खटल्यांच्या बाबतीत प्रस्तुत अधिकाराचा आश्रय घेता येणार नाही.**



आश्रय हे एक कायद्याची प्राचीन संकल्पना आहे. त्या देशाच्या कायद्यांचे तथाकथित उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा समुदायाला राज्यातून निष्कासित करण्यासाठी ह्या संकल्पना उपयोग आला. आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या सामान्य सिद्धांतानुसार, कोणत्याही देशातील गैर-राष्ट्रीय व्यक्ती स्वतःच्या देशात उद्भवलेल्या कोणत्याही कारणास्तव, (असे कारण बहुधा राजनैतिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक किंवा कायदेशीर मुद्द्यांवरून उद्भवू शकते), दुसऱ्या देशामध्ये कायदेशीररित्या किंवा बेकायदेशीररित्या अस्थायी निवारा मिळविण्यासाठी प्रवेश करतात, अशा निवाऱ्याला आश्रय असे संबोधले जाते.

एखाद्या व्यक्तीला देशात राहाण्याची परवानगी देणे किंवा न देणे हा प्रत्येक राष्ट्राचा अधिकार आहे. या अधिकाराचा वापर प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात राष्ट्रांद्वारे स्वैरपणे केला जात असे. तथापि, समकालीन कालखंडात, आश्रय हा अनेक नियमावलींच्या विनियमनाच्या आधीन आहे, ज्यामध्ये राष्ट्राने आपल्या क्षेत्रात आश्रय घेतलेल्या निर्वासित लोकांना आश्रय देण्याचे राष्ट्रांवर उत्तरदायित्व आहे.

तथापि, राष्ट्रे सार्वभौम असल्यामुळे आश्रयाची मागणी एक अधिकार म्हणून केली जाऊ शकत नाही. सर्वांगीण कायदेशीर नियम आणि मानव अधिकार करार केल्यानंतरही, आश्रय हा एक सर्वात वादग्रस्त विषय आहे आणि अद्यापही राष्ट्र त्यांच्या निरंकुश विवेकाधीन अधिकाराचा वापर करतात. या अधिकाराचे लाभ प्रदान करण्यासाठी, याचा स्वतंत्रपणे उपयोग करण्यासाठी, तसेच राष्ट्रांच्या विवेकाधीन स्वेच्छाधिकारांचे नियमन करून करार स्वीकारण्यासाठी संयुक्त राष्ट्र शक्य ती सर्व पाऊले उचलत आहे. म्हणूनच आजही आश्रय मिळविणे हे दुसरे काही नसून राष्ट्राचा विवेकाधीन स्वच्छाधिकार आहे.

जर एखादी व्यक्ती एखाद्या देशातील अपराधी आहे किंवा त्या व्यक्तीने आंतरराष्ट्रीय गुन्हा केला आहे किंवा ते आंतरराष्ट्रीय मानव अधिकारांचे उल्लंघनकर्ते किंवा शांती आणि सुरक्षिततेचे उल्लंघनकर्ते आहेत अशा व्यक्तींना आश्रय न देण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार संबंधित राष्ट्राला या कलमातील भाग २ द्वारे प्रदान केला जातो.

## कलम १५ राष्ट्रीयत्त्वाचा आधिकार

**१. प्रत्येकास राष्ट्रीयत्त्व मिळण्याचा अधिकार आहे.**

**२. कोणाचेही राष्ट्रीयत्त्व स्वैरपणे हिरावून घेतले जाता कामा नये. तसेच कोणासही आपले राष्ट्रीयत्त्व बदलण्याचा अधिकार नाकारता कामा नये.**

आंतरराष्ट्रीय कायद्याचा उद्देश 'एकच विश्व' ही संकल्पना प्रस्थापित करणे हा आहे, ज्यामध्ये फक्त एक राष्ट्र आणि कुठल्याही प्रादेशिक सीमा न बाळगता सार्वभौमिकरित्या लागू होणारा कायदा असेल,





ज्यामध्ये आपले म्हणजे संयुक्त राष्ट्र संघाच्या लोकांचे, केवळ मानवजातीचे सदस्य म्हणून एक राष्ट्रीयत्त्व असेल. एक विश्व प्रस्थापित करणे आणि राष्ट्रांची कल्पना दूर करणे ही केवळ एक आदर्श संकल्पना किंवा काल्पनिक अवधारणा असल्याने, राष्ट्रीयत्त्व अद्यापही एक महत्त्वाची

भूमिका बजावते. जरी एखादी व्यक्ती स्वतःच्या देशात किंवा परदेशात राहात असली तरी राष्ट्रीयत्त्व त्या व्यक्तीस एक ओळख आणि सर्व प्रकारचे संरक्षण निरंतर पुरवते. येथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, काही राष्ट्रांमध्ये नागरिकत्त्व हे राष्ट्रीयत्त्वाला पर्यायी शब्द म्हणून वापरले जाते. पण खरे पाहता, नागरिकत्त्व राष्ट्रीयत्त्वाला पर्यायी शब्द नाही.

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या सामान्य सिद्धांतानुसार जगातील सर्व व्यक्ती त्यांच्या देशाचे राष्ट्रीयत्त्व किंवा नागरिकत्त्व मिळविण्यास पात्र आहेत. केवळ हेच लोकांना हमीकृत मानव अधिकारांचा आनंद घेण्यासाठी सक्षम करते. पण, जगभरात अजूनही कुठल्याही देशाचे राष्ट्रीयत्त्व नसलेले (अन्यथा ज्यांना आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये राज्यविहीन किंवा स्थितीविहीन म्हणून ओळखले जाते) लाखो व्यक्ती आहेत.



राज्यविहीन व्यक्तींचे जीवन

राज्यविहीन म्हणजे एखाद्या व्यक्तीला एखाद्या राष्ट्राचे कोणतेही कायदेशीर बंधन किंवा संरक्षण नसणे. अशा लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते ज्यामध्ये जीवन, स्वातंत्र्य आणि समानतेचे मूलभूत मानवाधिकार नाकारणे हे ही समाविष्ट आहे. अनेकवेळा त्यांना, ते राहात असलेल्या देशातील, राष्ट्रीय अभिकरणाद्वारे वेगवेगळ्या गुन्ह्यांचे लक्ष्य केले जाते. त्यांना तर सामाजिक सुरक्षा, शिक्षण, आरोग्य इत्यादी सारख्या आवश्यक मूलभूत सेवा सुद्धा मिळू शकत नाहीत. अशा प्रकारच्या जीवनाची कल्पना करणेही कठीण आहे. अशा परिस्थितीला प्रतिबंध करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या निरंतर प्रयत्नामुळे १९५४ मध्ये राज्यविहीन व्यक्तींच्या स्थितीशी संबंधित परिषद घेतली. सध्या, फक्त ६५ राष्ट्र या परिषदेचे सदस्य आहेत. ही परिषद राज्यविहीन व्यक्तींना मूलभूत अधिकारांची हमी देते आणि त्यांच्या मानव अधिकारांचे संरक्षण व संवर्धनाला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने राष्ट्र सदस्यांवर त्यांच्या कर्तव्यांचे निर्वहन करण्यासाठी जबाबदारी थोपवते.

राज्यविहीन व्यक्तींची (निर्वासितांची) वाढती संख्या विचारात घेऊन संयुक्त राष्ट्राने १९६३ मध्ये निर्वासितांची संख्या कमी करण्यासाठी एक मसुदा स्वीकारला, ज्याचे केवळ ३७ राष्ट्र सदस्य आहेत. या व्यतिरिक्त १९५१ साली संयुक्त राष्ट्राने स्वीकारलेला निर्वासितांवरील करार देखील आहे. ज्याद्वारे संयुक्त राष्ट्र निर्वासितांसाठीचे उच्च आयुक्त (UNHCR) नामक एका संस्थेची स्थापना केली आहे. संयुक्त राष्ट्र निर्वासितांसाठीचे उच्च आयुक्त मुख्यतः निर्वासित व्यक्तींच्या समस्या आणि त्यांच्या गरजा यांची काळजी घेते. उपलब्ध अंदाजपत्रकानुसार, जगभरात सुमारे १२-१३ हजार दशलक्ष निर्वासित व्यक्ती आहेत. वरील नमूद अभिसंधी (करार) व्यतिरिक्त, सामान्य आणि विशिष्ट अधिकारांशी संबंधित (जसे मुलांच्या अधिकारांशी संबंधित करार, इत्यादी) मानव अधिकारांवरील सर्वच करार, परिषद आणि नियमावली, राज्यविहीनतेला नष्ट करण्यासाठी त्यांच्या प्रतिबद्धतेचे पुनःउच्चारण करतात.

## कलम १६ विवाह करण्याचा आणि कौटुंबिक जीवन जगण्याचा अधिकार

**१. वयात आलेल्या पुरुषांना व स्त्रियांना वंश, राष्ट्रीयत्त्व अथवा धर्म यांचे कोणतेही बंधन, कोणताही निर्बंध न ठेवता विवाह करण्याचा व कौटुंबिक जीवन जगण्याचा अधिकार आहे. विवाहाच्या संबंधात वैवाहिक जीवन चालू असताना आणि विवाह विच्छेदनाच्या वेळी त्यांना समान अधिकार मिळण्याचा अधिकार आहे.**

**२. नियोजित जोडीदारांनी स्वेच्छेने व पूर्ण संमती दिली असेल तरच विवाह करावा.**

**३. कुटुंब हा समाजाचा एक स्वाभाविक व मूलभूत सामुहिक घटक आहे व त्यास समाजाकडून आणि शासनाकडून संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे.**

हे कलम लग्नसंस्थेचा विचार करता सर्व प्रकारचे भेदभाव आणि बेकायदेशीर चालीरितींना व अनुरुप पद्धती यांना बंदी घालते. जरी जगभरात विविध प्रकारची कुटुंब रचना आणि पद्धती अस्तित्त्वात असली तरी प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार ज्या व्यक्तीसोबत लग्न करायचे आहे त्याची निवड आणि लग्न करण्याचे स्वातंत्र्य आणि त्याच्या वैवाहिक जीवनात ढवळाढवळ न करणे या मूलभूत अधिकाराचे संरक्षण करणे हे या कलमाचे उद्दिष्ट आहे. मुक्त आणि पूर्ण संमती हे खूप समस्या निर्माण करतात, हे लक्षात घेता, विवाहासाठी संमती, किमान वय व नोंदणीच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रांनी १९६२ मध्ये एक परिषद भरवून अभिसंधी पारित करून घेतली. या अभिसंधीच्या तरतुदीनुसार, एखाद्या जोडप्याने लग्नासाठी एकमेकांना पूर्ण संमती देऊन व ज्या सामाजिक परिस्थितीत ते राहातात त्याठिकाणी होणारे परिणाम लक्षात घेता, सर्व पद्धतीचे विवाह तसेच आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह यांना सुद्धा मान्यता दिली गेली आहे. या कलमातील व मसुद्यातील तरतुदीनुसार मानव अधिकारातील जीवन जगण्याच्या, स्वातंत्र्याच्या आणि समानतेच्या अधिकारातील एक घटक, म्हणून समलिंगी विवाह व पूर्व विवाह संबंधात राहाणे यांना सुद्धा परवानगी देण्यात आली आहे. काही देशामध्ये, वर नमूद केलेल्या विवाह पद्धतीला मान्यता आहे. भारतासह अनेक देशांच्या न्यायालयाच्या निर्णयामध्ये त्यांनी अशा प्रकारच्या विवाह पद्धतीला वैयक्तिक स्वातंत्र्य आणि गोपनीयतेच्या अधिकारांना संरक्षण देण्याचे समर्थन केले आहे.

## कलम १७ मालमत्तेचा अधिकार

**१. प्रत्येकास एखाद्याच्या नावावर तसेच इतरांबरोबर मालमत्ता धारण करण्याचा अधिकार आहे.**

**२. कोणाचीही मालमत्ता अनियंत्रितपणे हिरावून घेतली जाता कामा नये.**

प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत, मनुष्याच्या आयुष्यात मालमत्ता हा महत्त्वाचा घटक आहे. व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी जगभरात झालेल्या अनेक लढ्यांमध्ये, मालमत्ता हा देखील एक प्रमुख

मुद्दा होता. त्यानुसार, मुक्त आणि सामान्य रितीने स्वतंत्र व प्रतिष्ठित आयुष्य जगण्यासाठी, मालमत्तेचा अधिकार हा जाहीरनाम्यात एक महत्त्वाचा अधिकार म्हणून ओळखला जातो. इतर अधिकार विशेषतः जीवन व स्वातंत्र्याचे अधिकार यांच्या हमीसाठी, संपत्तीचे अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून समावेश करण्यात आला आहे.

भारतात, मालमत्तेच्या अधिकाराला एक मूलभूत अधिकार म्हणून हमीच्या स्वरुपात समाविष्ट करण्यात आले होते. परंतु, १९७८ मध्ये ४४ व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून, मालमत्तेच्या अधिकाराचे रुपांतर मूलभूत अधिकारापासून घटनात्मक अधिकारात करण्यात आले. या बदलामुळे, जमीन धारकांकडून सार्वजनिक उद्देशासाठी बाजारभावापेक्षा कमी भरपाई देऊन कोणत्याही खाजगी संपत्तीचे अधिग्रहण करणे सरकारसाठी शक्य झाले आहे. जुलै २०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने, राध्येश्याम विरुद्ध ग्रेटर नोईडा निगम या खटल्यात असे सांगितले की, कोणत्याही व्यक्तीला, कायदेशीर अधिकार आणि व्यक्तिगत कारणांसाठी लागू होणाऱ्या कायद्याव्यतिरिक्त, मालमत्तेच्या अधिकारापासून वंचित करता येत नाही आणि त्याची अधिग्रहित केलेली जमीन सार्वजनिक हेतूसाठी नाही असे लक्षात आल्यास राज्याचा असा नियमबाह्य हेतू हा कायदेशीर अधिकार हिरावून घेऊ शकत नाही. संवैधानिक अधिकारांच्या स्वरुपात सुद्धा, व्यक्तीच्या मालमत्तेच्या अधिकाराचे एक मूलभूत अधिकार म्हणून संरक्षण सुनिश्चित करते.

## कलम १८ विचारस्वातंत्र्य, सद्सद्विवेकबुद्धी व धर्म स्वातंत्र्य

**प्रत्येकास विचारस्वातंत्र्य, आपल्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार वागण्याचे स्वातंत्र्य असण्याचा अधिकार आहे, या अधिकारात स्वतःचा धर्म अथवा श्रद्धा बदलण्याच्या स्वातंत्र्याचा आणि एकट्याने व इतरांसह सामुदायिकरित्या आपला धर्म अथवा श्रद्धा, शिकवणुकीत, व्यवहारात, उपासनेत व आचरणात जाहीर रितीने अथवा खासगी रितीने व्यक्त करण्याच्या स्वातंत्र्याचा समावेश होतो.**

जीवन, स्वातंत्र्य आणि समानता यानंतर विचारस्वातंत्र्य, सद्सद्विवेकबुद्धी, धर्म अथवा श्रद्धेचे स्वातंत्र्य हे सर्वात अत्यावश्यक मूलभूत स्वातंत्र्य आहेत. त्यांना आणीबाणीच्या परिस्थितीत सुद्धा निलंबित/स्थगित केले जाऊ शकत नाही. प्रत्येकास, राष्ट्रासह कोणाच्याही हस्तक्षेपाविना, स्वतःच्या धर्माचे पालन करण्याचे आणि विश्वासासह सिद्धांत आणि स्वतःच्या श्रद्धेचे पालन करण्याचे अधिकार आहेत. याचा अर्थ लोकांना त्यांच्या धर्मानुसार काही धार्मिक समारंभ पार पाडण्यासाठी किंवा धर्माद्वारे निर्धारित विशिष्ट वस्त्रसंहितेनुसार (dress code) आवश्यक वस्त्र परिधान करण्याचे स्वातंत्र्य आहे. पण, दहशतवादी कारवायांमुळे काही राष्ट्रांनी धार्मिक वस्त्र परिधान करणाऱ्यांवर दंड आकारण्यास सुरुवात




केली (जसे की फ्रान्स मध्ये मुस्लिम महिलांच्या बुरखा घालण्यावर प्रतिबंध लादल्याने त्यांच्या धार्मिक अधिकारात हस्तक्षेप करण्यात आले). राष्ट्रांचे असे कृत्य लोकांच्या धार्मिक व सांस्कृतिक श्रध्देचे पालन करण्याच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याचे उल्लंघन ठरते.

नोव्हेंबर १९८१ मध्ये संयुक्त राष्ट्र आमसभेने, एक ठराव संमत करून राष्ट्रांना सर्व प्रकारे असहिष्णुता आणि धार्मिक श्रद्धा व विश्वास याविरुद्ध कोणत्याही प्रकारचे भेदभाव न करण्याची विनंती केली. तसेच या ठरावानंतर, संयुक्त राष्ट्र मानव अधिकार आयोगाने (आत्ताचे मानव अधिकार परिषद) अशा परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक ठराव पारित केले आणि तत्त्वे योजिली आहेत.

मानव अधिकार परिषदने २०१० मध्ये राष्ट्रपक्षांद्वारे लोकांच्या धार्मिक स्वतंत्रता आणि श्रध्देच्या बाबत अवलंबल्या जाणाऱ्या सर्व मानहानीकारक पद्धतींची निंदा करत आणखी एक प्रस्ताव पारित केला. तसेच या प्रस्तावामध्ये, कोणत्याही प्रकारे भेदभाव न करता विचार, सद्सद्विवेकबुद्धी व धर्म स्वातंत्र्याचे संवर्धन करण्याच महत्त्व पुनःउच्चारीत केले आहे. तथापि, घोषणापत्र आणि अन्य कायदेशीर तरतुदींचे आणखी स्पष्टीकरण करण्यासाठी, लोकांनी सद्भावासह जीवन जगण्याची आणि सर्वांना त्यांच्या श्रध्देचे अवलंबन करण्याची अनुमती द्यायला हवी. केवळ या मार्गानेच हे अधिकार पूर्णपणे साध्य करणे शक्य होऊ शकते.

## कलम १९ मतस्वातंत्र्य व अभिव्यक्ती/भाषणस्वातंत्र्याचे अधिकार

**प्रत्येकास मतस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य असण्याचा अधिकार आहे. या अधिकारात कोणतीही ढवळाढवळ न होता मत बाळगण्याच्या स्वातंत्र्याचा, तसेच कोणत्याही माध्यमातून व सीमांचा विचार न करता माहिती व विचार ग्रहण करण्याचा प्रयत्न करणे, ती मिळविणे व इतरांना ती देणे या संबंधीच्या स्वातंत्र्याचा समावेश होतो.**

हे अधिकार लोकशाहीचे एक महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. या तरतुदीनुसार, माहिती देण्यासाठी आणि मुक्तपणे लोकांची कल्पना व्यक्त करण्यासाठी प्रसार माध्यमे राष्ट्राच्या जोखडातून मुक्त असणे आवश्यक आहे. केवळ ह्यामुळेच लोकशाही मध्ये सुशासनाचे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी सहाय्य करू शकते. हे अधिकार मुक्तपणे भाष्य करण्याची हमी देतात आणि अभिव्यक्तीशी संबंधित भीती प्रतिबंधित करतात. पण, कोणत्याही अधिकाराचा अतिरेक करण्याची परवानगी नाही. यामध्ये, कोणत्याही शक्य त्या माध्यमातून एखाद्या व्यक्तीचे विचार लिहिणे, बोलणे किंवा प्रसारित करणे याचाही समावेश होतो. या स्वातंत्र्याच्या आधारे माहितीचा अधिकार अस्तित्वात आला. जरी हे स्वातंत्र्य






व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थन करीत असले तरी त्याचबरोबर हे आपल्या प्रत्येकांवर आपल्या अधिकारांचा वापर पूर्ण सावधगिरीने करण्याची जबाबदारीही थोपवतात. तसेच सर्व लोकांचे जीवन, व्यक्तिगत स्वतंत्रता, शालीनता आणि इतर अधिकार व स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्राद्वारेही आवश्यक कायदेशीर नियमनाच्या माध्यमातून निर्बंध लागू केले जाऊ शकतात.

## कलम २० सभा व संघटनेचे स्वातंत्र्य

**१. प्रत्येकास शांततापूर्ण सभा व संघटना स्थापन करण्याचा अधिकार आहे.**

**२. कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही संघटनेचा सभासद होण्याची सक्ती असता कामा नये.**

मागील कलम आणि या कलमामध्ये आंतरसंबंध आहे. संघटनेचा अधिकार हा व्यक्तिगतरित्या किंवा एकत्रितपणे लोकांचे मत व्यक्त करण्यासाठी सर्वात महत्त्वाचा अधिकार आहे.




आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने (International Labour organization) कामगारांच्या स्वातंत्र्याची हमी देण्यासाठी त्यांच्या कायदेशीर मागण्या व्यक्त करण्यासाठी, संघटना स्थापित करण्यासाठी आणि मालकांच्या अनुचित कामगार प्रथांपासून न्याय सुरक्षा प्रदान करण्यासाठी अनेक प्रस्ताव व नियमावली स्वीकारल्या आहेत. एकीकडे, अनेकवेळा अनेक आंदोलन सरकारवर दबाव आणून त्यांच्या घटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावतात; तर दुसरीकडे, सरकार अनेकवेळा अशा हालचाली प्रतिबंधित करण्यासाठी विविध पद्धतींचा अवलंब करते, जे काहीवेळा उचित असू शकते पण नेहमी नाही.

## कलम २१ देशाच्या शासनात भाग घेण्याचा अधिकार

**१. प्रत्येकास आपण स्वत: अथवा आपल्या इच्छेनुसार निवडलेल्या आपल्या प्रतिनीधीमार्फत आपल्या देशाच्या शासनात भाग घेण्याचा अधिकार आहे.**

**२. प्रत्येकास आपल्या देशाच्या शासकीय सेवेत प्रवेश मिळण्याचा समान अधिकार आहे.**

लोकांची इच्छा ही सरकारच्या अधिकारांचा पाया असला पाहिजे. लोकांची ही इच्छा सार्वत्रिक आणि समान मताधिकार यावर आधारित नियमित आणि खऱ्या निवडणुकीद्वारे व्यक्त केली जाते, तसेच गुप्त मतदानाद्वारे किंवा समकक्ष स्वतंत्र मतदान प्रक्रियेद्वारे व्यक्त करण्यात येते. हे कलम अमेरिकेचे माजी अध्यक्ष, अब्राहम लिंकन यांच्या लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांद्वारे दिलेले शासन, या तत्त्वाचे पुन्हा उच्चारण करते. एका लोकशाहीमध्ये कुणालाही कोणतेही मंत्रीपद मिळाल्याने ते इतरांपेक्षा वरिष्ठ आहेत असे समजण्याचा काही अधिकार नाही. सर्व अधिकारी, मंत्री आणि राज्य प्रमुखांनी नेहमी हे लक्षात ठेवायला हवे की, ते फक्त लोक प्रतिनिधी आहेत व त्यांना जनतेने काही ठराविक कालावधीसाठी शासन चालविण्यासाठी निवडले आहे.



लोकशीही भावना कायम राखण्यासाठी पंचायत ते संसदे पर्यंत प्रत्येक पातळीवर नियमित कालावधीने निवडणुक घेणे हे प्रत्येक राष्ट्राचे कर्तव्य आहे. फक्त लोकशाहीच लोकांचे मन जिंकू शकते आणि फक्त लोकशाहीच्या माध्यमातूनच मानव अधिकारांची प्रगतशील वृद्धी सक्षमरित्या होऊ शकते. लोकशाहीच्या भावनेला कायम ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारे यापासून विचालनाची परवानगी नाही कारण याचे रुपांतर हुकुमशाही सत्तेमध्ये होऊ शकते. उदाहरणार्थ, मध्यपूर्वेत अलीकडील आंदोलनाने कोणत्याही बाबतीत कोणत्याही प्रकारे सरकारला त्यांच्या अधिकारांचे हनन करण्याची अनुमती न देता तेथील जनतेने प्रबलतेने सरकारचा विरोध केला. कोणत्याही पद्धतीने राज्यकारभारात सहभाग घेणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे व प्रत्येकाचा आपल्या क्षमतेनुसार त्यासाठी हातभार लागेल. देशाची मालमत्ता ही अप्रत्यक्षपणे त्या देशातील नागरिकाची आहे त्यामुळे हिंसा किंवा त्या मालमत्तेचे नुकसान न करणे हे प्रत्येक देशातील नागरिकाचे कर्तव्य आहे. केवळ शांततेच्या मार्गानेच बदल घडू शकतो हे कलम अप्रत्यक्षपणे महात्मागांधीजींच्या अहिंसा या तत्त्वाचे समर्थन करून सदासर्वकाळ जगभरात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी व लोकशाही पद्धतीने मानव अधिकाराची जाणीव होण्यासाठी या तत्त्वाचे अनुसरण करण्याचा पुरस्कार करते.



## आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकार

हक्क प्रदान करणे, नागरी व राजकीय अधिकारांचा वापर करणे आणि जीवन, स्वातंत्र्य व समानतेचा व इतर मूलभूत अधिकारांचा आनंद/उपभोग घेण्यासाठी, हे अधिकार सर्वात महत्त्वपूर्ण

भूमिका निभावतात. लोकांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी व मानवजातीच्या स्थिरतेसाठी पद्धती व साधने उपलब्ध करून देण्यासाठी सदर कलम राज्यासाठी निर्देश/मार्गदर्शन करते. परंतु, भारतासहित अनेक देशांमध्ये, न्यायपालिकेने आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांची व्याख्या दाव्याच्या अधिकारांचे अविभाज्य अंग म्हणून केली आहे. भारतीय सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दात म्हटले आहे की, जर गैर न्यायोचित अधिकारांचा (आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक) प्रभाव न्यायोचित अधिकारांना (नागरिक व राजनैतिक अधिकार) उपयुक्त पडत असल्यास तेही दाव्याच्या अधिकारांचे स्वरूप धारण करतात आणि यामुळेच या अधिकारानांही संरक्षणाचा विस्तार करून सुरक्षितता प्रदान करणे हे राष्ट्रांचे कर्तव्य आहे. परंतु हे केवळ दिशानिर्देश किंवा गैरन्यायोचित असल्या कारणाने यांचे स्वरूप पूर्णतः बदलता येत नाही. पण अनेकदा, जेव्हा न्यायपालिका किंवा इतर घटक (अधिकतर आंतरराष्ट्रीय घटक) याद्वारे या अधिकारांची अंमलबजावणी करण्यास निर्देशित केले जाते, तेव्हा राज्यकर्ते अनेकवेळा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पैलूंचे कारण पुढे करून या अधिकारांच्या अंमलबजावणीमध्ये अडथळा निर्माण करतात. आपल्या सर्वांना या अधिकारांची गरज आहे आणि आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर, या अधिकारांच्या यशस्वी अंमलबजावणी आणि उपयोगाने व्यक्तीचे स्वातंत्र्य सुनिश्चित करता येईल आणि 'संघर्षमुक्त' जग स्थापित करता येईल हे सर्वांचे आद्य कर्तव्य आहे.

## कलम २२ आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकार

**प्रत्येकास समाजाचा एक घटक या नात्याने सामाजिक सुरक्षितता प्राप्त करून घेण्याचा अधिकार आहे आणि राष्ट्रीय प्रयत्न व आंतरराष्ट्रीय सहकार्य यांच्याद्वारे व प्रत्येक राष्ट्राच्या व्यवस्थेनुसार व साधनसंपत्तीनुसार आपल्या प्रतिष्ठेस व आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या मुक्त विकासासाठी अनिवार्य असलेले आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार संपादन करण्याचा हक्क आहे.**

या कलमापासून कलम २७ पर्यंत आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकार दिलेले आहेत. मानवजातीच्या गरजांची पूर्तता करून देणे हे या कलमाचे ध्येय आहे. ही कलमे मानवजातीच्या संपूर्ण विकासासाठी आणि मानव अधिकारांच्या पूर्ततेसाठी आधारभूत अशी कलमे आहे. जरी ही कलमे घोषणापत्राच्या दुसऱ्या भागात समाविष्ट करण्यात आली असली तरी, नंतर संयुक्त राष्ट्राला अशी जाणीव झाली की मूलभूत गरजांशिवाय व्यक्ती त्यांच्या नागरी व राजनैतिक अधिकारांचा पूर्णतः प्रयोग/वापर सक्षमरित्या करू शकणार नाही. त्यानुसार करारनाम्याच्या अंमलबजावणीचे वेळी, पहिल्यांदा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अधिकारांचे करार आणि नंतर नागरी व राजकीय अधिकारांचे करार बनले.

संयुक्त राष्ट्राने पन्नास-साठच्या दशकात स्वातंत्र्य प्राप्त करणाऱ्या राष्ट्रांतील लोकांची दशा व आर्थिक परिस्थिती लक्षात घेता, त्यांचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाचे अधिकार सुनिश्चित करण्यासाठी, तद्नंतर तातडीची पावले उचलली आणि १९६६ मध्ये, महत्त्वपूर्ण आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकाराचे आंतरराष्ट्रीय करार स्वीकारले. ही काही कलमे, सविस्तरपणे या करारामध्ये विस्तारित करण्यात आली आहेत, ज्याचा प्रभाव ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रावर आणि नंतर व्यापारी करारांसह इतर अनेक करारांवर पडला आहे.

या कलमानुसार, वैयक्तिक व आंतरराष्ट्रीय पातळीवर सतत लोकांच्या मूलभूत गरजांच्या वृद्धीसाठी प्रयत्न करणे हे राष्ट्राची प्राथमिक कर्तव्य आहे. कुठल्याही निहित स्वार्थाविना जगातील संसाधानांचे विभाजन सर्व राष्ट्रांमध्ये सामायिकरित्या करणे आवश्यक आहे. कोणतेही राष्ट्र किंवा राष्ट्रांचे समूह (विशेषत: विकसित राष्ट्र) संसाधनांवर एकतर्फी सार्वभौम दावा करू शकत नाहीत. यानुसार, करारातील खरे हेतू साध्य करण्यासाठी, बाहय अतंराळ महासागर (ज्यांवर कोणत्याही राष्ट्राची अधीसत्ता नाही असा पृथ्वीवरील सागर व महासागरांचा भाग), अंटार्क्टीक आणि इतर काही प्रदेश हे निर्मनुष्य स्थान म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या भागात कोणतेही राष्ट्र संयुक्त राष्ट्रांच्या परवानगीशिवाय संसाधनाचे अन्वेषण आणि उपयोग करू शकत नाही. परवानगीच्या अवधी दरम्यान, राष्ट्र किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी संसाधनांचे अन्वेषण करायला हवे आणि संयुक्त राष्ट्राला संसाधनाच्या करारानुसार निश्चित केलेली रक्कम भरायला हवी. संयुक्त राष्ट्र या संसाधनाचे वितरण गरीब राष्ट्रांना आर्थिकदृष्ट्या विकसित करण्यासाठी करेल.

या कलमाच्या हेतूमुळे फार पूर्वी आंतरराष्ट्रीय स्तरावर आरक्षण किंवा सवलतींची उत्क्रांती विकसित राष्ट्रांद्वारे विकसनशील राष्ट्रांसाठी त्यांच्या असंख्य संबंधांमुळे झाली. या सवलतींमध्ये, अशा राष्ट्रांना समान रितीने सहभागी होण्यासाठी, आत्मनिर्भर बनवण्यासाठी, व्यापार क्षेत्रात संसाधन, विज्ञान व तंत्रज्ञान आणि इतर प्रत्येक संभाव्य क्षेत्रात स्वयंपूर्ण बनवून समान संधी उपलब्ध करण्यासाठी याचा समावेश आहे. हेच तत्त्व राष्ट्रीय स्तरावर अनेक राष्ट्रांद्वारे गरजू लोकांना आधार देण्याच्या दिशेने अवलंबले गेले आहे. हे अधिकार भारतासह इतर देशांच्या संविधानाचे भाग आहेत. यांना भारतात राज्यांच्या धोरणाची दिशा दाखवणारी मार्गदर्शक तत्त्वे म्हणून निर्दीष्टीत केले आहेत.

हे कलम पुढे असेही सांगते की, प्रत्येक व्यक्तीस किमान सामाजिक सुरक्षा विशेषतः शिक्षण, आरोग्य आणि किमान देखभाल भत्ता इत्यादी मूलभूत गरजांशी संबंधित सुरक्षा प्रदान करण्याचे राष्ट्रीय सरकारचे कर्तव्य आहे. हे कलम एकीकडे, स्वविकास आणि निर्धाराचे समर्थन करते आणि दुसरीकडे प्रत्येक भागधारकावर विकास, वृद्धी आणि संसाधनांच्या स्थिरतेदरम्यान पुढच्या पिढ्यांसाठी संतुलन राखण्याची जबाबदारीही स्पष्ट करते.

## कलम २३ काम करण्याचा अधिकार

**१. प्रत्येकास काम मिळण्याचा, आपल्या इच्छानुरूप काम निवडण्याचा, कामाच्या न्याय्य व अनुकूल शर्तींचा फायदा मिळण्याचा व बेकारीपासून संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे.**

**२. कोणत्याही प्रकारे भेदभाव न करता प्रत्येकास समान कामाबद्दल समान वेतन मिळण्याचा अधिकार आहे.**

**३. काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस स्वत:ला व आपल्या कुटुंबाला मानवी प्रतिष्ठेस साजेसे जीवन ज्या योगे जगता येईल असे न्यायोचीत व योग्य परिश्रमिक व गरज लागल्यास त्याशिवाय सामाजिक संरक्षणाची इतर साधने मिळण्याचा अधिकार आहे.**

**४. प्रत्येकास आपल्या हितसंबंधांच्या संरक्षणार्थ संघटना स्थापन करण्याचा व त्याचा सदस्य होण्याचा अधिकार आहे.**




हे कलम म्हणजे विविध आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकारांपैकी एक महत्त्वाचा अधिकार आहे. या वर्गातील इतर अधिकार जसे अन्नाचा अधिकर जगण्याचा अधिकार, आरोग्य अधिकार, सामाजिक सुरक्षितता अधिकार, हे सकारात्मक अधिकार आहेत. या उलट काम करण्याच्या अधिकारात सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही घटक आहेत. या अधिकाराचा नकारात्मक पैलू प्रत्येक व्यक्तीवर त्यांचा उदरनिर्वाह मिळविण्याचा मार्ग केवळ नैतिक आणि कायदेशीर असायला हवा ही जबाबदारी टाकतो. तसेच एखाद्या व्यक्तीने निवडलेल्या कोणत्याही प्रकारच्या कामाला समाजाची व त्या देशातील कायद्याची मान्यता असणे आवश्यक आहे. शिवाय, समाजाच्या विकास प्रक्रियेत सहभागी होऊन त्यांच्या ज्ञानाचे योगदान राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी करायला हवे असे निर्बंध प्रत्येकावर लादतो. त्यांच्या क्षमतेनुसार कुठल्याही प्रकारचे काम न करता उपजीविका करण्याची इच्छा बाळगणाऱ्या व्यक्तीला कुठेही स्थान नाही. त्याच बरोबर, प्रत्येकावर अप्रत्यक्षरित्या त्यांच्या अर्थार्जन क्षमतेनुसार मुलांची व वृद्धांची काळजी घेण्याची जबाबदारीही थोपवतो. याव्यतिरिक्त, मानवी प्रतिष्ठा अबाधित राखण्यासाठी हाताने मल साफ करणे अशा प्रकारचे अमानवीय काम प्रतिबंधित करतो.

सकारात्मक दृष्ट्या, हे कलम या गोष्टीचे समर्थन करते, की काम करणे हा एक मूलभूत मानव अधिकार आहे. हे सुचवते की, प्रत्येक व्यक्तीने समाज व राज्याच्या उत्पन्न आणि इतर उत्पादन उपक्रमामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. अशा सहभागाने, आपोआप प्रत्येक व्यक्तीने इतर व्यक्तीचा आदर करणे हे कर्तव्य होईल, मग ती व्यक्ती त्याच्या इच्छेने कुठल्याही प्रकारचे काम करीत असेल, तर

प्रत्येकाच्या देशाच्या कायद्यानुसार त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या समतुल्य वेतन अदा करणे हे सर्व नियोक्त्याचे/मालकांचे कर्तव्य आहे.

वरील चर्चेअनुसार (कलम १८-२०), या अधिकाराच्या उन्नतीसाठी व संघटना स्थापित करण्यासाठी हे महत्त्वपूर्ण भूमिका निभावते. संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेद्वारे (ILO) मालक व कर्मचारी यांच्या अधिकारांशी व कर्तव्यांशी संबंधित विविध पैलूंवर बारकाईने लक्ष ठेवते. संयुक्त राष्ट्राच्या सर्व घटकांमध्ये ILO ची एक अद्वितीय रचना आहे. याची संरचना त्रिपक्षीय आहे, ज्यामध्ये राष्ट्र सदस्य, नियोक्ता/मालक आणि कामगार एकत्रित निर्णय प्रक्रियेत सहभाग घेतात. इतर सर्व घटकांव्यतिरिक्त, कामाची आर्थिक व सामाजिक गुणवत्ता आणि सामाजिक सुरक्षा सुधारण्यासाठी आर्थिक व सामाजिक परिषद नियमितपणे कामाचे परिक्षण करते आणि राष्ट्रांद्वारे स्वीकारल्या जाणाऱ्या धोरणांसाठी एक चौकट निर्माण करते.

पुढे हे कलम, स्थलांतरित कामगारांना, एकतर एखाद्या देशाच्या प्रादेशिक सीमांच्या आत किंवा एका देशातून दुसऱ्या देशात शारीरिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय किंवा इतर कारणांमुळे परागंदा होणाऱ्या लोकांना, त्यांच्या काम करण्याच्या अधिकाराची हमी देते. स्थलांतर करणाऱ्या कामगारांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी, संयुक्त राष्ट्र संघाने १९९० मध्ये सर्व स्थलांतरित कामगार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या अधिकारांचे संरक्षणार्थ एक नियमावली स्वीकारली, जी २००३ मध्ये अंमलात आली. स्थलांतरित कामगारांची समिती त्यांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी सदस्य देश आणि संयुक्त राष्ट्राच्या संस्थासह समन्वयन स्थापित करण्याचे काम करते. तथापि, वरील उल्लेखित नियमावलीसह अनेक कामगार कल्याण नियमावलींना भारतासह अनेक राष्ट्रांनी अजून मंजुरी दिलेली नाही या गोष्टीची नोंद घ्यायला हवी.

## कलम २४ आराम व फुरसतीचा वेळ घेण्याचा अधिकार

**वाजवी मर्यादा असलेले कामाचे तास व ठराविक मुदतीने पगारी सुट्ट्या धरून प्रत्येकास विश्रांती व आराम मिळण्याचा अधिकार आहे.**

हे कलम आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने स्वीकारलेले धोरण प्रत्येक कर्मचारी आणि कामगाराचे कामाचे तास हे मर्यादित असायला हवे हे सुनिश्चित करते. ILO च्या नियमानुसार, कोणत्याही व्यक्तीने ८ तासापेक्षा जास्त काम करता कामा नये. तथापि, प्रतिदिन जास्तीत जास्त १२ तासापर्यंत हे भिन्न असू शकते. महिला व मुलांच्या बाबतीत, जे त्यांच्या आरोग्यासाठी हानीकारक आहे अशा उद्योग क्षेत्रात त्यांना काम करण्यास प्रतिबंध आहे. १४ वर्षेवयोमानाखालील मुलांना देखील रोजगारास लावता येत नाही आणि त्यांनी प्रतिदिन ६ तासापेक्षा जास्त वेळ काम करता कामा नये. तसेच महिला व मुलांना

संध्याकाळी ७ वाजल्यानंतर देखील कामास लावता येणार नाही. सर्व कामगारांना प्रत्येक देशाच्या किंवा प्रदेशाच्या कायद्यानुसार साप्ताहिक सुट्टी आणि इतर सुट्ट्या असणे आवश्यक आहे. या तरतुदी सर्व प्रकारच्या कर्मचाऱ्यांना लागू राहातील, विशेषतः कामाच्या हजेरी पटावरील नियमित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत याची अंमलबजावणी काटेकोरपणे करायला हवी. तसेच अपघात किंवा मृत्यू झाल्यास कामाच्या नुकसान भरपाईसाठी आणि निवृत्तीनंतर पेन्शन व इतर लाभास सर्व कामगार पात्र आहेत.

## कलम २५ पुरेसे मानक असलेले जीवन व आरोग्य असण्याचा अधिकार

**१. प्रत्येकास स्वतःचे व आपल्या कुटुंबियांचे आरोग्य व स्वास्थ्य यांच्या दृष्टीने समुचित राहाणीमान राखण्याचा अधिकार आहे. यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय मदत व आवश्यक सामाजिक सोयी या गोष्टींचा अंतर्भाव होतो. त्याचप्रमाणे बेकारी, आजारपण, अपंगत्व, वैधव्य किंवा वार्धक्य यामुळे किंवा त्याच्या आवाक्याबाहेरील परिस्थितीमुळे उदरनिर्वाहाचे दुसरे साधन उपलब्ध नसल्यास सुरक्षितता मिळण्याचा अधिकार आहे.**

**२. मातृत्व बाल्य ह्याबाबतीत विशेष देखरेख व मदत मिळण्याचा हक्क आहे. सर्व मुलांना, मग ती औरस असोत किंवा अनौरस असोत, सारखेच सामाजिक संरक्षण मिळाले पाहिजे.**






हे कलम अन्न, वस्त्र, घरगुती आवश्यकता या किमान मूलभूत गरजांचे आणि किमान सामान्य मानक जसे पाणी, वीज, स्वच्छता, प्रदूषण मुक्त पर्यावरण, आरोग्य आणि शिक्षण यांचे महत्त्व स्पष्ट करते. याची गरज प्रत्येक व्यक्तीला संतुष्टित जीवन व्यतित करण्यासाठी आहे. प्रत्येकास काम मिळविण्याचा व सर्व प्रकारचे स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार आहे असे हे कलम पुनश्च प्रतिपादीत करते. हे कलम आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार करार आणि आंतरराष्ट्रीय नागरी व राजकीय अधिकार करारातील तरतुदींशी संबंधित आहे. हे पुनश्च प्रतिपादीत करते की, लोकांच्या उदरनिर्वाहाचे आवश्यक साधन प्रदान करण्याचे कर्तव्य हे समाजाचे व राज्याचे आहे. प्रगतीशील विकासासाठी अत्यंत आवश्यक साधन म्हणून विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासाला प्रोत्साहित करण्याची भौतिक जबाबदारी ही राष्ट्राची आहे. या संबंधाने, संयुक्त राष्ट्राने सदस्य राष्ट्रांसाठी राष्ट्रीय स्तरावर लोकांसाठी जगण्याची किमान मानके साध्य करण्यास मदत करण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय करार संमत केले

आहेत. ह्या बदलत्या हे करार संसाधनांचा मुक्त वापर करण्याचे अधिकार आणि स्वनिर्धारणाचे अधिकार सुनिश्चित करतात. खरेतर, या अधिकाराने विकास करण्याच्या अधिकाराची वाढ एक महत्त्वाचा घटक म्हणून केली आहे.

हे कलम राष्ट्रावर पोषणाची पुरेशी पातळी गाठणे, उपासमार व कुपोषण दूर करणे ह्यासारखी उत्तरदायित्वे ठेवते. संयुक्त राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी यासह इतर संस्था आणि जागतिक बँकेच्या विविध शाखांवर विकासशील राष्ट्रांना किमान व्याजदराने पुरेसे कर्ज देऊ करण्याची जबाबदारी आहे. संयुक्त राष्ट्राच्या सर्व शाखांमध्ये, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) आणि आर्थिक व सामाजिक परिषद (ECOSOC), आवश्यक मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी नवीन धोरण विकसित करण्यासाठी नियमितपणे अनेक संशोधकांची मदत घेतात.


संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे साध्य व साधन यांच्यावर प्रकाशज्योत


सहस्त्रकाची उद्दीष्टे साध्य करण्यास आपण सिद्ध आहोत का?

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) यांनी 'आवास' नावाचे कार्यक्रम सुरु केले आहे. यानुसार, राष्ट्रांद्वारे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा नियमित आढावा घेतला जातो. सहस्त्राकाची आठ महत्वाची ध्येय साध्य करण्यात काही दोष असतील तर या आढाव्याच्या आधारे, दोष निवारण करण्यासाठी प्रतिबंधात्मक यंत्रणा विकसित केली जाते.

या कार्यक्रमाअंतर्गत, UNDP ने त्यांच्या आदर्शांचे कार्यान्वयन करण्यासाठी भागीदार म्हणून अनेक जणांना समाविष्ट केले आहेत (ज्यामध्ये राष्ट्र, व्यक्ती आणि स्वयंसेवी संघटनांचा समावेश आहे). या कार्यक्रमांचे निरीक्षण संयुक्त राष्ट्राद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वार्षिक सत्रांच्या माध्यमातून केले जाते आणि दरवर्षी विषयपत्रिकेतील लक्ष्य साध्य करण्यासाठी आराखडा तयार केला जातो.

तसेच हे कलम, HIV/AIDS आणि संसर्गजन्य रोग व इतर सामान्य रोगांचे प्रतिबंधासह आरोग्याच्या अधिकाराचे महत्त्व स्पष्ट करते. या कलमातील आव्हाने प्रत्येकावर कोणत्याही प्रकारचे अपव्यय न करता काळजीपूर्वक संसाधने वापरण्याची आणि पुढच्या पिढ्यांसाठी त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सोपवतात. तसेच हे कलम बेकायदेशीर मानवी तस्करी आणि कोणत्याही स्वरूपातील अस्तित्वात असणारे पाशवी वेश्या व्यवसाय प्रतिबंधित करण्याकडे लक्ष वेधते. तसेच हे कलम, तृतीयपंथी लोकांच्या अधिकारांची ही हमी देते. पण हे आपल्या प्रत्येकांवर अशी जबाबदारी सोपवते की कधीही ज्याचा परिणाम जीवन, व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि इतर स्वातंत्र्यावर होईल अशा कोणत्याही मानहानीकारक कृत्यांचे, अवलंबन किंवा स्वीकार करू नये.

हे कलम, मानसिकरित्या अक्षम लोकांचे, वृद्धांचे व इतर व्यक्ती, ज्यांची उत्पन्न मिळविण्याची क्षमता नाही, अशा लोकांची समाजाद्वारे काळजी घेतली जाण्याची जबाबदारीही सोपवते आणि जर

एखादे राष्ट्र कुठल्याही प्रकारे रोजगार प्रदान करण्यास असमर्थ असल्यास, जीवन जगण्यासाठी लोकांना किमान मानधन प्रदान करणे हे त्या राष्ट्राचे कर्तव्य आहे असे सांगते. बऱ्याच विकसनशील राष्ट्रांची बहुतांश जनता गरीब आहे. मानव अधिकार कराराचे सदस्य असल्याने सर्व लोकांना उत्तम परिस्थिती व सोयी पुरविण्यासाठी धोरणांचा विकास करणे व त्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसणे हे या राष्ट्रांचे कर्तव्य आहे.

समाजाच्या विकासासाठी व आंतरराष्ट्रीय समुदायाचे सदस्य म्हणून आपल्या संसाधनांचे शक्य ते योगदान गरजू लोकांच्या मदतीसाठी देणे हे राष्ट्रांबरोबर संयुक्त राष्ट्राच्या लोकांचे म्हणजेच आपले (यामध्ये विशेषतः श्रीमंत व आर्थिक दृष्ट्या सक्षम लोकांचा तसेच खाजगी कंपन्यांचा ही समावेश आहे) कर्तव्य आहे. वास्तविकरित्या, अनेक अशासकीय संघटना व परोपकारी व्यक्ती त्यांचे उत्कृष्ट योगदान देण्यात आधीच सामील आहेत परंतु लोकांच्या वाढत्या माागण्या पूर्ण करण्यासाठी ते पुरे पडू शकत नाही आहेत. त्यामुळे शक्य त्या मर्यादेपर्यंत मदतीचा हात पुढे करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

## कलम २६ शिक्षणाचा अधिकार

**१. प्रत्येकास शिक्षण मिळण्याचा अधिकार आहे. निदान प्राथमिक व मुलभूत शिक्षण मोफत असले पाहिजे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे असले पाहिजे. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण सर्वसाधारणपणे उपलब्ध करून देण्यात आले पाहिजे आणि उच्च शिक्षण गुणवत्तेप्रमाणे सर्वांना सारखेच उपलब्ध असले पाहिजे.**

**२. ज्यायोगे मानवी व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास साधला जाईल व मानव अधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्य याविषयीची आदरभावना दृढ होईल अशी शिक्षणाची दिशा असली पाहिजे. तसेच शिक्षणाने सर्व राष्ट्रांमध्ये आणि वांशिक किंवा धार्मिक गटांमध्ये सलोखा, सहिष्णुता व मैत्री वृद्धींगत झाली पाहिजे. शिवाय त्यायोगे शांतता राखण्यासंबंधीच्या संयुक्त राष्ट्रांच्या कार्यास चालना मिळाली पाहिजे.**

**३. आपल्या मुलांना कोणत्या प्रकारचे शिक्षण देण्यात यावे हे ठरविण्याचा पूर्वाधिकार मातापित्यांना आहे.**

हे कलम प्रत्येकाला शिक्षणाचे मूलभूत अधिकार प्रदान करते. यानुसार, शिक्षणातून ज्याचा पाठपुरावा केला जातो त्या गोष्टीची पूर्तता करणे आवश्यक आहे. स्वामी विवेकानंद यांनी सांगितलेल्या विचार, नैतिकता व मूल्यांसह तसेच समाजाच्या गरजांसह स्वतःचा विशेष उद्देश्य पूर्ण करण्यासाठी स्वतःला शिक्षित करणे आवश्यक आहे. ज्ञान हे प्रत्येकामध्ये जन्मतः निहित आहे. जेव्हा ते ज्ञान एका योग्य दृष्टिकोनातून उपयोगात आणले जाते तेव्हाच ते स्पष्ट होते या तत्त्वांशी हे कलम मेळ खाते. राष्ट्रीय व

आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकांना त्यांच्या अधिकारांचा आनंद घेण्यासाठी समृद्ध करणारे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून शिक्षण यावर हे कलम भर देते. त्यानुसार, ते पुढील ध्येय साध्य करते:

१. **केवळ शिक्षण सर्वांना सन्मानाच्या सुदृढीकरणाला प्रोत्साहन देते आणि मानव अधिकार व मूलभूत स्वातंत्र्याच्या प्रोत्साहनासाठी मदत करते.**

२. **मानवी व्यक्तिमत्त्व व त्यांच्या प्रतिष्ठेच्या भावनेचा पूर्ण विकास केवळ मानवी व्यक्तिमत्त्वाचे महत्त्व समजून घेतल्यावरच साध्य केला जाऊ शकतो.**

३. **जगभरातील लोकांमध्ये सहिष्णुता, लैंगिक समानता व मैत्रीला प्रोत्साहन देण्याची समज निर्माण करण्यास शिक्षण मदत करते.**

४. **शिक्षण हे निर्वासित, मानसिक व शारीरिक रित्या अशक्त व्यक्ती, वृद्ध व्यक्ती, तृतीय पंथी आणि सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक रित्या वंचित वर्ग अशा कमजोर वर्गाच्या प्रति दयाळू वर्तनास प्रोत्साहन देते, तसेच वर्णद्वेष, भाषा, धार्मिक व इतर भेदभाव समाप्त करण्यास प्रोत्साहन देते.**

५. **शिक्षण सर्व लोकांना समाजाच्या व राष्ट्राच्या आर्थिक, राजनैतिक, सामाजिक, कायदेशीर व सांस्कृतिक विकासामध्ये स्वतंत्रपणे व प्रभावीपणे भाग घेण्यासाठी सक्षम बनवते .**

६. **केवळ शैक्षणिक मूल्ये, नैतिकता व मानव नीतीचे दृष्टिकोन मनावर ठसवून, मानव अधिकारांच्या उद्देश्यांच्या प्राप्तीसाठी एक लक्ष्य प्रदान करते.**

७. **संयुक्त राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विश्वशांती व सुरक्षा स्थापित करण्याचा उद्देश्य साध्य करण्यासाठी शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीस सक्षम बनवते.**

विश्वबंधुत्व आणि एक जग ही संकल्पना पुढे नेण्यामध्ये शिक्षणाची वरील मुख्य ध्येये योगदान देतात. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटन (UNESCO), राष्ट्रांना शत प्रतिशत साक्षरता साध्य करण्यात मदत करण्यासाठी अनेक धोरणे व कार्यक्रम तयार करते. संयुक्त राष्ट्र सहस्त्रक शिखर संमेलन आणि जागतिक परिषदने देखील याचे महत्त्व निश्चितपणे स्पष्ट केले आहे. यानुसार, संयुक्त राष्ट्राने सन २००५-२०१४ ला 'शाश्वत विकासासाठीचे शिक्षण दशक' म्हणून घोषित केले आहे. याची एका कमाल मर्यादेपर्यंत साक्षरता साध्य करण्याची अपेक्षा आहे. हे कलम पुढे असेही स्पष्ट करते की, जरी पालकांना त्यांच्या मुलांनी कोणत्या प्रकाराचे शिक्षण घ्यावे हे निवडण्याचा हक्क असला तरी ते मुलांना त्यांच्या इच्छेविरुद्ध कोणत्याही प्रकारच्या शिक्षणाची सक्ती करू शकत नाहीत. संयुक्त राष्ट्र व इतर आंतरराष्ट्रीय संस्थांच्या धोरण दृष्टिकोनाशी जुळवत, भारत सरकारने शिक्षणाचा अधिकार कायदा, २०१० स्वीकारला आहे, व हा कायदा भारताच्या प्रत्येक नागरिकाला शिक्षण हे सक्तीचे करतो.

## कलम २७ संस्कृतीचे अधिकार

१. **प्रत्येकास समाजातील सांस्कृतिक जीवनात मोकळेपणाने भाग घेण्याचा, कलांचा आनंद उपभोगण्याचा आणि वैज्ञानिक प्रगती व तिच्यापासून मिळणारे फायदे यात सहभागी होण्याचा अधिकार आहे.**

२. **आपण निर्माण केलेल्या कोणत्याही वैज्ञानिक, साहित्यिक किंवा कलात्मक कृतीपासून निष्पन्न होणाऱ्या नैतिक व भौतिक हितसंबंधांना संरक्षण मिळण्याचा प्रत्येकास अधिकार आहे.**

या कलमातील उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी विशिष्ट निर्देश देण्यात आले आहेत. सांस्कृतिक व वैज्ञानिक कार्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध कायद्यांशी संबंधित अनेक नियमावली या कलमाने स्वीकारल्या आहेत. या कलमानुसार, कोणत्याही परिस्थितीत कुणालाही संस्कृतीचा अपमान करण्याचा किंवा संस्कृती संबंधी, भाषेसहित कुठल्याही पैलूचा अपमान करण्याचा अधिकार नाही. प्रत्येक समाजातील प्रत्येक संस्कृतीचा सन्मान, आदर व त्या संस्कृतीला प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग, मानवजातीच्या अधिकार आणि मौलिक स्वातंत्र्याच्या उन्नतीसाठी करणे आवश्यक आहे. हे कलम, राष्ट्रांवर व प्रत्येक व्यक्तीवर त्यांच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक कौशल्याचे शक्य त्या मार्गाने मानवजातीच्या विकासासाठी योगदान देण्याचे दायित्त्व ठेवते.

या संबंधी, वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीला प्रोत्साहित करण्यासाठी आणि जगभरातील लोकांना सक्रियपणे भाग घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी, ज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी, आंतरराष्ट्रीय कायद्याने बौद्धिक संपदा अधिकाराला मानव अधिकाराच्या स्वरुपात मान्य केले आहे, एकाधिकार किंवा मालकी हक्क म्हणून नाही. लोकांना दिले जाणारे सिमित संरक्षण हे केवळ त्यांच्या अथक परिश्रमाला मान देण्यासाठी, वैज्ञानिक आणि तांत्रिक ज्ञानाला प्रोत्साहित करण्यासाठी व त्याच्या उन्नत्तीसाठी आहे. अशी मान्यता व सक्तीचे उपायच केवळ लोकांना मानवतेच्या आणि जगातील संसाधनांच्या विकासासाठी संशोधन हाती घेण्यास प्रेरित करतात. ही तरतुद मानव अधिकाराच्या स्वरुपात मागील शिक्षणाच्या अधिकाराच्या कलमाचा विस्तार आहे.

हे कलम असे सुनिश्चित करते की, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती ही केवळ सामान्यपणे समाजासाठी आणि विशेषतः मानवजातीच्या कल्याणासाठी आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील कोणतीही प्रगती जी मानवजातीसाठी धोकादायक होऊ शकते तिला या कलमाने प्रबंधित केले आहे. म्हणूनच, नि:शस्त्रकरणाचा (शस्त्रकपात) आंतरराष्ट्रीय कायदा, ज्याने संपूर्ण मानवजातीचा नाश होऊ शकतो, अशा प्राणघातक आणि धोकादायक शस्त्रांचा उपयोग न करण्याची जबाबदारी राष्ट्रांवर सोपवते.

पुढे हे कलम असेही उच्चारीत करते की, विज्ञान आणि तंत्रज्ञान हे शैक्षणिक व सांस्कृतिक मानव अधिकारांचे अविभाज्य अंग असल्याने कोणतेही नवीन शोध संपूर्ण मानवजातीच्या हितासाठी उपयोगी असले पाहिजेत. तदनुसार, विज्ञान व तंत्रज्ञान यांचा उपयोग करणाऱ्यांवर मानवजातीची शांतता व सुरक्षितता टिकवण्याची आणि आंतरराष्ट्रीय समुदायाच्या उद्दिष्टांशी एकीकृत होण्यासाठी सहाय्य करण्यासाठी त्यांच्या ज्ञानाची उन्नती करणे ही एक व्यापक जबाबदारी आहे.

## कलम २८  सामाजिक व आंतरराष्ट्रीय व्यवस्था

**या जाहीरनाम्यात ग्रंथित केलेले अधिकार व स्वातंत्र्य पूर्णपणे साध्य करता येतील अशा सामाजिक व आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा प्रत्येकास हक्क आहे.**

हे कलम या जाहीरनाम्यातील सर्वात महत्त्वपूर्ण कलम आहे. या कलमाचे पूर्ण स्वरुपात आंतरराष्ट्रीय समुदायावर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रभाव आहेत. सकारात्मक दृष्टीने हे कलम, आंतरराष्ट्रीय समुदायाच्या विषयाच्या स्वरुपात प्रत्येक व्यक्तीद्वारे कोणत्याही प्रकारे भेदभाव न करता जीवन जगण्याची व स्वातंत्र्याचा आनंद उपभागण्याची खात्री देते.

नकारात्मक दृष्टीने, ज्या राष्ट्रांनी स्वेच्छेने आंतरराष्ट्रीय कायद्यातील तत्त्वे पालन करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे, त्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचे कर्तव्य हे राष्ट्रांचे आहे. पुढे हे कलम, न्यायोचित आधारावर धोरण विषयक दृष्टीकोन विकसित करणे, विकासात्मक योजना आणि जागतिक संसाधनांच्या सामायिकरणासाठी आवश्यक पद्धती व तंत्र विकसित करणे ही जबाबदारी आंतरराष्ट्रीय निर्वाहकांवर म्हणजेच राष्ट्रांवर थोपवते. अनेक पिढ्या आंतरराष्ट्रीय कार्य विकासासाठी एकवटलेले असूनही, श्रीमंत आणि गरीब राष्ट्रांमधील विद्यमान अंतर कमी होण्याऐवजी वाढत आहे. हे कलम संयुक्त राष्ट्रांसहित आंतरराष्ट्रीय समुदायावर, आंतरराष्ट्रीय कायद्याच्या माध्यमातून वचनबद्ध मूलभूत स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी, मानवजातीच्या महत्त्वाकांक्षांच्या पोषणासाठी अधिक कडक पावले आणि धोरणे विकसित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते.

हे कलम पुढे असेही प्रतिपादीत करते की, कुठल्याही विचलानाशिवाय आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वांचे पालन करणे आणि हातचे काहीही राखून न ठेवता सर्व करारनाम्यांचे पूर्तता करण्यावर चर्चा केंद्रित करून मानव अधिकारांच्या विभिन्न करारनाम्यांच्या सिद्धांतांचे निर्वाहन करण्याचे राष्ट्रांचे कर्तव्य आहे. तसेच, मानवी पर्यावरण, शांती आणि सुरक्षेसाठी सर्व विध्वंसक प्रयत्नांना थांबवण्यासाठी मानव अधिकारांच्या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वांचे कठोर निष्ठेने पालन करण्याचे राष्ट्रांचे कर्तव्य आहे.

त्याच बरोबर, हे कलम प्रत्येक देशातील लोकांवर राष्ट्र-राज्यांमधील विवादांच्या निराकरणासाठी प्रयत्न करण्याची आणि त्यांनी बनवलेल्या व स्वीकारलेल्या मानव अधिकार मापकांचे निर्वाहन करण्याची जबाबदारी थोपवते. याचा अर्थ आहे की, मानव अधिकाराच्या आंतरराष्ट्रीय कायद्याची उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी, मानव अधिकार शिक्षणाचे महत्त्व जागतिक समुदायासाठी एक महत्त्वाचा पैलू आहे.

मानवजातीच्या दु:खाचे निवारण करण्यासाठी एका समान ध्येयासह त्यांच्या व्यवहार पद्धतीला बदलणे आणि येणाऱ्या पिढ्यांना केवळ युद्धाच्या संकटातूनच नाही तर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विषमतेपासून सुद्धा सुरक्षित ठेवणे हे राष्ट्राचे प्रधान कर्तव्य आहे.

## कलम २९ कर्तव्य आणि मर्यादा

**१. समाजामध्येच आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास पूर्णपणे व निर्वेधपणे करता येत असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीची समाजाप्रति काही कर्तव्ये असतात.**

**२. आपले अधिकार व स्वातंत्र्य यांचा उपभोग घेताना इतरांचे अधिकार व स्वातंत्र्य यास योग्य मान्यता मिळावी व त्यांचा योग्य तो आदर राखला जावा आणि लोकशाही समाजव्यवस्थेत नीतीमत्ता, सार्वजनिक सुव्यवस्था व सर्वसाधारण लोकांचे कल्याण यासंबंधातील न्याय्य अशा आवश्यक गोष्टी पूर्ण केल्या जाव्यात या आणि केवळ याच कारणासाठी कायद्याने ज्या मर्यादा घालून दिल्या असतील त्याच मर्यादांच्या आधीन प्रत्येक व्यक्तीस राहावे लागेल.**

**३. या अधिकार व स्वातंत्र्याचा उपयोग कोणत्याही प्रकारे संयुक्त राष्ट्रांच्या उद्देश्यांच्या व तत्त्वांच्या विरुद्ध करता कामा नये.**

जाहीरनाम्यात हमी दिलेल्या अधिकारांना प्राप्त करण्यासाठी आणि त्यांचे फायदे उपभोगण्यासाठी, मानवजातीद्वारे अनुसरण करण्यासाठी एक निर्णायक आणि महत्त्वपूर्ण असे हे कलम आहे. हे कलम मानव अधिकारांचे प्रोत्साहन, उपयोग आणि प्राप्तीसाठी निभावल्या जाणाऱ्या कर्तव्याच्या भूमिकेचे महत्त्व पुनः उच्चारीत करते.

सदरचे कलम एकीकडे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार आणि नागरी व राजनैतिक अधिकारांमध्ये आणि दुसरीकडे आंतरराष्ट्रीय समुदाय आणि जगभरातील व्यक्तीद्वारे अवलंबल्या जाणाऱ्या कृतींचे जीवन आणि स्वातंत्र्याची प्रतिष्ठा आणि प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्याचे काटेकोरपणे निरीक्षण करण्याची आवश्यकता यामध्ये दुवा निर्माण करते आहे. घटक २ मध्ये ह्या कलमाचे विश्लेषण

व्यक्तीवर केवळ जबाबदारीच थोपवते, स्वयंघोषित अधिकारांना उपभोगणे नाही. जागतिक संसाधनांच्या चांगल्या वृद्धीसाठी कलम २८ मधील तरतुदींचे काटेकोरपणे राष्ट्राद्वारे पालन करणे आवश्यक आहे याचे पुनःउच्चारण हे कलम करते. 'कायदा, समाज, व्यक्ती आणि विश्व समुदायामध्ये एक अंतर्निहित दुवा विद्यमान आहे,' या भगवान गौतम बुद्धांच्या तत्त्वांना हे कलम मान्यता देते. केवळ सहिष्णुतेसह मानवजातीच्या प्रति या पैलूंचे कनवाळूपणे पालन करण्याने मानव अधिकार संपूर्णपणे प्राप्त करण्यास मदत होते. समकालीन मानवजातीच्या ऋणबद्धतेचे कारण कुणा एकामुळे नाही, पण आपल्या सर्वांमुळे, आपल्या कर्तव्यांचे पालन न करण्यामुळे आहे किंवा इमानदारीने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समुदायात समाजातील भागीदार म्हणून जबाबदारींचे निर्वहन न करणे हे आहे.

दुसरा परिच्छेद राष्ट्रांवर आंतरराष्ट्रीय समुदायाचा निर्वाहक म्हणून काही मर्यादा लादतो. राष्ट्रांनीही कायदेशीर व्यक्ती म्हणून त्यांच्या लोकांचे प्रतिनिधीत्त्व करताना लक्षात घ्यायला हवे, की शासक म्हणून उच्च स्थानी त्यांचे वर्तनच जबाबदार राष्ट्रीय समुदाय स्थापन करण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकते. त्यांनी त्यांच्या दायित्त्वाचे निर्वहन करणे आणि त्यांचे वाद सद्भावनेने मिटवणे आवश्यक आहे आणि त्यांच्या संबंधांमध्ये राजकीय किंवा इतर कोणत्याही विचाराना न अवलंबता शांततेच्या मशालीचे धारक म्हणून नियमांशी बांधील असणे आवश्यक आहे. जर त्यांनी कोणत्याही विचलनाशिवाय मानव अधिकारांचे पालन खऱ्या भावनेने केले तर, मग ते त्यांच्या नागरिकांच्या व्यवहारांचे निरीक्षण करू शकतात आणि मूलभूत स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी त्यांना मदत करण्यासाठी उत्कृष्ट सहाय्य देऊ शकतात.

या कलमाचा तिसरा भाग असे सांगतो की, आंतरराष्ट्रीय समुदायाचे सदस्य म्हणून, दोघेही म्हणजे राष्ट्र आणि आपण संयुक्त राष्ट्राच्या लोकांनी काटेकोरपणे सनदेतील तत्त्वांचे पालन करून आपल्या कर्तव्यांचे पालन करणे ही जबाबदारी आहे. जर आपण यापासून ढळलो, तर एक सामुहिक संस्थेच्या स्वरुपात संयुक्त राष्ट्र एकटे उद्देश्यांची पूर्तता करू शकत नाही आणि नंतर दु:ख आणि कष्टांच्या कारणांचा दोष त्याच्यावर ढकलून देऊन उपयोग नाही.

## कलम ३० अधिकारांचे दुरुपयोग न करणे



**या जाहीरनाम्यात नमूद केलेल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार व स्वातंत्र्ये नष्ट करण्याच्या उद्देशाने कोणतीही हालचाल करण्याचा किंवा कोणतेही कृत्य करण्याचा अधिकार कोणत्याही राष्ट्रास, गटास किंवा व्यक्तीस आहे असे ध्वनित होईल अशा रितीने या जाहीरनाम्यातील कोणत्याही मजकूराचा अर्थ लावता कामा नये.**

जाहीरनाम्यातील ही अंतिम तरतुद जाहीरनाम्यात नमूद सर्व कलमांच्या तुलनेत सर्वात महत्त्वाची आहे. या चित्राद्वारे हे स्पष्ट आहे की जर कोणत्याही व्यक्तीने किंवा देशाने स्वतःच्या स्वार्थ व हितासाठी तरतुदींची व्याख्या केली, तर त्याचा अर्थ केवळ व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्याचा विनाश करणे असा होईल. हे कलम असेही प्रतिष्ठापित करते की, प्रत्येक वेळेस सर्व निर्वाहकांनी कायदेशीररित्या कार्य करणे आवश्यक आहे आणि त्यांच्या कर्तव्यांची अंमलबजावणी योग्य काळजीने आणि सुस्पष्टपणे दुसऱ्यांच्या जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्त्वाच्या दिशेने कोणत्याही प्रकारे अविवेकीपणा न करता करणे आवश्यक आहे.

कोणत्याही वेळी जर आपण कोणीही स्वार्थी हेतूने कार्य केले किंवा निष्काळजीपणे आपल्या कर्तव्यांचे निर्वहन केले किंवा त्यांचे निर्वहन इतरांच्या अधिकारांचा आदर न करता केले, तर अंततः त्याचे परिणाम कष्टदायक ठरू शकतात. तसेच, शांतता, सुरक्षितता आणि एक विश्व या संकल्पना, तसेच जीवन, व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि समानतेचे स्वातंत्र्य हे केवळ आदर्श म्हणूनच राहातील. याशिवाय विचलन, केवळ विद्यमान पिढीसाठी नाही तर पुढच्या पिढ्यांसाठीही अराजक प्रवृत्ती व मानवजातीशी संबंधित अन्य दु:खाचे कारण ठरू शकते.

सैद्धांतिक आणि व्यावहारिक रित्या राष्ट्र आणि व्यक्ती दोघांनीही आंतरराष्ट्रीय समुदायाचे भागीदार आणि निर्वाहक म्हणून सक्तीने कायदा आणि न्याय्य तत्त्वांचे पालन करण्याची आवश्यकता आहे, हे शेवटचे कलम पुन्हा अधोरखित करते. केवळ अशा पद्धतीनेच समकालीन जगातील दुःख पुसले जाऊ शकते. हे शांतता आणि सुरक्षितता चिरस्थायी स्वरूपात करण्यासाठी परिणामकारक सिद्ध होईल.

## सारांश

मानव अधिकार ही संकल्पना प्रथम १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेच्या तरतुदीमध्ये समाविष्ट होती. त्यांचे विस्तृतीकरण करण्यासाठी एक मानव अधिकार समिती स्थापण्यात आली. ह्या समितीद्वारे तयार करण्यात आलेल्या मसुद्याच्या आधारे १० डिसेंबर १९४८ रोजी आमसभेने मानव अधिकारांचे वैश्विक घोषणापत्र स्वीकारले. या दिवसाचा आदर म्हणून, दर वर्षी १० डिसेंबर 'मानव अधिकार दिन' म्हणून साजरा केला जातो.

हे घोषणापत्र मानव अधिकारांच्या इतिहासात सर्वात लक्षणीय आहे. हे मानव अधिकारांशी संबंधित अनेक घोषणा, करार आणि नियमावलींचा आधार म्हणून गठित करण्यात आले आहे. ह्या घोषणापत्राचा/जाहीरनाम्याचा विस्तार नंतर आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार करार, नागरी व राजकीय अधिकार करार आणि गट अधिकारांच्या नियमावली जसे की स्त्रिया, मुले, अक्षम

इत्यादीद्वारे स्पष्ट करण्यात आले.

या जाहीरनाम्याच्या अवलंबनामुळे आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय कायदे क्षेत्रात क्रांतिकारी परिवर्तन घडले आहे. हे राष्ट्र आणि व्यक्ती दोघांच्याही अधिकारांना मान्यता देते. याच्या स्वीकाराने जगभरातील वसाहतीमधील लोकांना स्वातंत्र्य प्राप्त करणे आणि त्यांच्या निवडीचे सरकार स्थापन करणे शक्य शक्य झाले.

जाहीरनाम्यातील प्रत्येक तरतुद स्वाभाविकपणे प्रत्येकाद्वारे अधिकाराचा दावा करण्यापूर्वी त्यांच्या कर्तव्यांचे पालन करण्याचे समर्थन करते. जर कुणीही या कर्तव्यांचे पालन करण्यास सक्षम नसेल, तर अधिकाराचे फळ सुद्धा अपूर्ण आहे. जगभरातील तोंड द्याव्या लागणाऱ्या समस्या, विशेषतः, शतकातील ध्येयात निश्चित करण्यात आलेल्या समस्या या कर्तव्यांचे काटेकोरपणे पालन न केल्यामुळे आहेत.

## निष्कर्ष

प्रत्येक देशाच्या प्रयत्नाने १९४५ मध्ये आंतरराष्ट्रीय कायद्याने मानव अधिकारांना मान्यता मिळवून दिली. संयुक्त राष्ट्र सनदेचा सर्व काळ व्यक्तींच्या मानव अधिकारांचे रक्षण आणि उत्थान करण्याच्या उद्देश्याने स्वीकार करण्यात आला. संयुक्त राष्ट्राने या उद्देश्यांच्या प्राप्तीसाठी अनेक नियमावली, करार, घोषणा आणि प्रस्ताव स्वीकृत केले. त्यामुळे राष्ट्रांच्या क्रियाकलापांचे निरीक्षण करण्यासाठी आणि व्यक्तींच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय यंत्रणा, मानव अधिकार आयोग (सध्याचे मानवाधिकार परिषद आणि मानवाधिकारासाठीचे उच्च आयुक्त) स्थापित केले. मानव अधिकार संस्कृतीचे अवलंबन करणे हे संयुक्त राष्ट्राव्यतिरिक्त, सर्व राष्ट्रांचे आणि आपले संयुक्त राष्ट्रांच्या लोकांचे कर्तव्य आहे. हे सोप्या शब्दात असे सुचवते की दोन्ही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर, प्रत्येकाने (राष्ट्र व व्यक्ती), कोणत्याही विचलनाशिवाय सर्वकाळ आपल्या कर्तव्यांचे पालन करणे आवश्यक आहे. केवळ मानव अधिकारांच्या काटेकोर पालनाने वर्तमानातील जगातील दुष्कृत्ये समाप्त होऊ शकतात आणि मानवता व मानवजातीच्या सन्मानाचे वैभव परत आणणे शक्य होईल. तरच, व्यक्तिगत स्वातंत्र्य, समता आणि बोलण्याचा व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा दावा करणे शक्य होईल. ज्या प्रकारे त्यांची रचना शांतता व मानवजातीच्या सुरक्षिततेचे आदर्श म्हणून करण्यात आली आहे.

जवळपास, अनेक प्राचीन ग्रंथांमध्ये आणि तत्त्ववेत्यांनी एक विश्व ही संकल्पना ज्यामध्ये विविधतेत एकता असलेल्या सामंजस्यपूर्ण समाजाची कल्पना वृद्धींगत करण्याचे समर्थन केले आहे. जर याचे पालन राष्ट्रीय स्तरावर केले, तर नक्कीच याचे परिणाम, राष्ट्रांच्या क्रियाकलापांमध्ये त्यांच्या मानसिक वर्तनावर, त्यांच्याद्वारे आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये एकमेकांशी व्यवहार करताना धूर्त रणनीतीचे अवलंबन थांबवण्यावर आणि काटेकोरपणे मानव अधिकारांचे पालन करण्यावर होईल.

मानव अधिकारांचे काटेकोर पालन करणे म्हणजे दुसरे काही नसून प्रत्येकाने, एकतर वैयक्तिक पातळीवर किंवा सामाजिक स्तरावर, अवलंबन करण्याची मूल्य प्रणाली आहे, जी केवळ मानव अधिकारांचे उद्देश्य साकार करण्यासाठीची परिकल्पना आहे.

वरिल सर्व उद्दिष्टांसह, अनेक प्रयत्न जगभरात मानव अधिकारांचे प्रसार आणि प्रचार व त्यांच्या अधिक वृद्धींसाठी सुरु करण्यात आले आहेत. याच हेतूसह, भारताच्या राज्यसंस्थेला त्याचा वैभवशाली भूतकाळ पुन्हा मिळवण्यात मदत करण्यासाठी, तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधींची सर्वोदय ही संकल्पना (ज्याने आंतरराष्ट्रीय समुदायाचे अनुकरण करण्यास नेतृत्त्व केले) साध्य करण्यासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय्य संकल्पनेचे जतन करण्यासाठी, तरुण विद्यार्थ्यांच्या मनावर मानवाधिकाराची संस्कृती ठसवण्यासाठी, त्यांना एक जबाबदार भावी नागरिक म्हणून तयार करण्यासाठी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या या अभ्यासक्रमाचा सन्मान करायला हवा.

### एका शब्दात उत्तर लिहा

**१. संयुक्त राष्ट्र सनदेच्या कलम १३ ने कोणत्या घटकाला मानव अधिकार जपण्याची व प्रोत्साहन देण्याची जबाबदारी दिली आहे ?**

आमसभा

**२. बंधपत्रित कामगाराद्वारे काय दर्शिवले जाते ?**

श्रीमंत व्यक्तीचे कर्ज फेडणारा.

**३. आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालय कोणत्या देशात आहे ?**

द नेदरलँड्स(द नेदरलँड्स लिहिलेले नसेल तर उत्तर चुकीचे असेल)

**४. दुहेरी संकट म्हणजे ...........**

एकसमान गुन्ह्यासाठी दोनदा शिक्षा नाही.

**५. संयुक्त राष्ट्राची कोणती संघटना कामगारांच्या अधिकारांच्या संदर्भात काम करते ?**

आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटना.

## बहुपर्यायी प्रश्न

१. UDHR युनायटेड नेशन्सद्वारे कोणत्या वर्षी अमलात आणले ?

(अ)१९४७ (ब)१९४८ (क) १९४५ (ड)१९८४

२. कोणते कलम गुलामगिरी संदर्भात निगडीत आहे ?

(अ)कलम ३ (ब)कलम ५ (क) कलम ६ (ड) कलम ४

३. संयुक्त राष्ट्रांना 'शांतता घंटा' भेट स्वरुपात कोणी दिली ?

(अ) कपिल देव (ब) सचिन तेंडूलकर (क) विनोद कांबळी (ड) जॉर्ज बुश

४. UDHR च्या मसुदा समितीचे अध्यक्ष कोण होते ?

(अ)मार्गारेट थॅचर (ब) इंदिरा गांधी (क) एलीनोर रूझवेल्ट (ड) सिमावो बंदरनायके

५. जागतिक परिषदेने मानव अधिकार कोणत्या वर्षी समाविष्ट केले ?

(अ)१९९३ (ब)१९९२ (क)१९९५ (ड)१९९६

**उत्तरे: (१) ब (२) ड (३) ब (४) क (५) अ**

❖ ❖ ❖ ❖

## सामान्य माहिती

प्रत्येक पाठात दिलेले नमुना प्रश्न फक्त त्या पाठचे स्वरूप दर्शविते. ते दिलेल्या दोन नमुन्यांपेक्षा जास्त असू शकतात. दिलेले प्रश्न हे जोड्या लावा, दिलेल्या परिच्छेदातून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या, किंवा तार्किक प्रश्न इत्यादी स्वरुपात देखील विचारले जाऊ शकतात. हे सर्व केवळ संगणकाच्याद्वारे मूल्यमापन करणे सोपे जावे म्हणून या स्वरुपात असतील.

## परिशिष्ट

## सूचित वाचन साहित्य

### १. पुस्तके

मानव अधिकारावर भरपूर प्रमाणात साहित्य उपलब्ध आहे, येथे निर्दिष्ट काही पुस्तके केवळ सूचक आहेत.


- लेह लेविन, ह्युमन राईट्स (प्रश्न आणि उत्तरे) नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, १९९२
- टिचिंग ऑफ ह्युमन राईट्स, सेंटर फॉर ह्युमन राईट्स, युएन् पब्लिकेशन, न्यू यॉर्क, १९८९
- रोकेह एम, द नेचर ऑफ ह्युमन व्हॅल्यूज, न्यू यॉर्क, द फ्री प्रेस, १९७३
- माल्कन एन. शॉ, इंटरनॅशनल लॉ, सिक्स्थ एडिशन, केंब्रिज युनिव्हरसिटी प्रेस. (चाप्टर ६ – द इंटरनॅशनल प्रोटेक्शन ऑफ ह्युमन राईट्स, आणि चाप्टर ७ – द रिजनल प्रोटेक्शन ऑफ ह्युमन राईट्स), २००८
- एल. ओपेनहिम, इंटरनॅशनल लॉ (सर रॉबर्ट जेनिंग्स आणि सर आर्थर वॅट संपादित) ९वी आवृत्ती खंड १, भाग २ ते ४, ह्युमन राईट्स साठी प्रकरण ८, इंटरनॅशनल लीगल इन्स्ट्रुमेंट्स साठी प्रकरण १४ ते १५, १९९२, लाँगमॅन, लंडन
- इशाय, ह्युमन राईट्स रिडर; रुटलेज (द्वितीय एडिशन) २००७
- एनसायक्लोपिडीया ऑफ ह्युमन राईट्स, ५ खंड, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस; २००९
- डॅनियल फिशलीन आणि मार्थ नॅन्डॉर्मि, द कन्साईज गाईड टू ग्लोबल ह्युमन राईट्स; ऑक्सफ र्ड युनिव्हर्सिटी प्रेस; २००७
- जस्टिस डी. एम. धर्माधिकारी, ह्युमन व्हॅल्यूज ॲन्ड ह्युमन राईट्स; युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, नवी दिल्ली, २०१०

जसवाल एस.एस., इंट्रोडक्शन टू ह्युमन राईट्स अॅन्ड ड्युटीज, विकास पब्लिकेशन अवर्स प्रा. लि.

## २. जर्नल्स आणि दस्तावेज

- यूएन जनरल असेम्ब्ली रिसोल्युशन ऑन ह्युमन राईट्स एज्युकेशन अ./५९/५२५/ठर्शी.१ दि २ मार्च, २००५ मार्कोमिलानोविक, इज द रोम स्टॅट्यूट बाईंडिंग ऑन इंडिव्हिज्युअल्स? (अॅन्ड व्हाय शुड वुई केअर) इंटरनॅशनल क्रिमिनल जस्टिस जरनल, खंड ९, २०११, २५-५२
- ख्रिस्टिना मीन वोटिप्का आणि कियोतेरू त्सुत्सुई, ग्लोबल ह्युमन राईट्स अॅन्ड स्टेट सोवेरेग्नटी : स्टेट रेटिफिकेशन आफ इंटरनॅशनल ह्युमन राईट्स ट्रिटीज, १९६५-२००१, सोशिओलॉजिकल मोर', खंड, २३, क्र. ४, २००८, ७२४-७५२
- आर. बी. ब्रान्डीट, द कॉन्सेप्ट ऑफ ऑब्लिगेशन अॅन्ड ड्युटी; माईंड, ऑक्सफर्ड जर्नल्स, खंड ७३, क्र. २९१, जुलै १९६४, ३७४-३९३
- जॉन एच. क्नॉक्स, हॉरिझॉन्टल ह्युमन राईट्स लॉ, द अमेरिकन जरनल ऑफ इंटरनॅशनल लॉ, खंड १०२, २००८, १-४७
- जॉन मेस्कीडा सँपोल, ड्युटी मॉरल अॅन्ड पॉलिटीकल; http://ivrenc.info/index.php?title=Duty-Moral and Political\
- स्येला बेनहबीब अनदर युनिव्हर्सलायझम, ऑन द युनिटी अॅन्ड डायव्हरसीटी ऑफ ह्युमन राईट्स; प्रोसिडिंग्ज अॅन्ड अॅड्रेस ऑफ अेरिकन लिॉसॉफिकल असोसिएशन; ८१, क्र. २, २००७, १-३२ जेस्टोअर जर्नल्स ब्लॉग वर उपलब्ध
- अमेरिकन काउन्सुलेट लायब्ररी, ह्युमन राईट्स एज्युकेशन, २००२

## अहवाल

१. विविध न्यायालयांच्या प्रकरणे पहाण्यासाठी - ऑल इंडिया रिपोर्टर, सर्वोच्च न्यायालयाची प्रकरणे, आठवड्याचा कायदा अहवाल इ.

२. रिपोर्टस् ऑफ नॅशनल पोलिस कमिशन

३. रिपोर्टस् ऑफ नॅशनल ह्युमन राईट्स कमिशन

४. संयुक्त राष्ट्र मानव अधिकार परिषद आणि स्वतंत्र येथे संयुक्त व अन्य अवयव प्रत्येक संस्थेच्या संकेतस्थळावर.

५. अशा सर्वसाधारण माफी म्हणून विविध गैर सरकारी संस्था अहवाल आंतरराष्ट्रीय, मानव अधिकार पहाता झणउङ, राष्ट्रकुल मानव अधिकार संघटना इत्यादी.

## सांकेतिक स्थळावरील माहिती

Wikipedia the free encyclopedia of the Web Campbell, Kenneth, "Legal Rights", The Stanford Encyclopedia of Philosophy (Spring 2011 Edition), Edward N. Zalta (ed.), URL = <http://plato.stanford.edu/archives/spr2011/entries/legal-rights siteshttp://resources.lawyersnjurists.com/research-papers/assignments/law/jurisprudence/hohfeld%E2%80%99s-analysis-of-irghts

http://www.newworldencyclopedia.org/entry/Info:Main_Page

http://www.newworldencyclopedia.org/entry/Info:Main_Page

http://mshrc.maharashtra.gov.in/Article/upload/TheImportanceofH.R.Education%20%20.pdf

References of acknowledgement of the web pages for images inserted in the study material.

pbcopelika.org

http://www. freshnetworks. com/blog/wp - content/uploads/2010/11/photo - online_community.jpg

http://possibilitiesunlimited.files.wordpress.com/2011/02/community.jpg

http://www.aishdas.org/gallery/Community.jpg

http://www.iowaepiscopal.org/images/photos/mdgcross.jpg

http://www.tidec.org/Visuals/Tidetalk/Network%20articles/Millenium%20goals/web-mill-goals.gif

http://www.un.am/thumb.php?file=2437&width=480&height=640

http://www.essex.ac.uk/eo/stylesheets/Different%20People%20Poster%20cropped.JPG

http://etc.usf.edu/clipart/49600/49653/49653_free_mason_lg.gif

http://www.unitycorps.org/images/unity-art/2004/winter/sonia-jimenez/unity_432x328.jpg

http://www.indiamike.com/india/attachments/6888d1197803283-andaman-trip-report-and-photos-cellular-jail.jpg


http://notenoughgood.com/wp-content/uploads/2011/06/man-behind-bars_bxp357761.jpg

http://3.bp.blogspot.com/_HoDij8Z2tHY/S5E3vR0OSYI/AAAAAAAADzM/zG9XO72XFOs/s320/Chart+of+Human+Rights.jpg

http://cache2.allpostersimages.com/p/LRG/37/3790/2HEIF00Z/posters/morse-ralph-scene-in-the-courtroom-during-the-3rd-day-session-of-the-nuremberg-trial.jpghttp://upload.wikimedia.org/wikipedia/commons/thumb/5/58/IMTFE_court_chamber.jpg/300px-IMTFE_court_chamber.jpg

http://daccess-dds-ny.un.org/doc//UNDOC/GEN/N99/770/89/PDF/N9977089.pdf?

## Structure of the United Nations Human Rights Bodies and Mechanisms



*This chart is a sum up of  the rights discussed above.*



# लेखकाबाबत थोडेसे

डॉ. टी. एस. एन. सास्त्री हे वरिष्ठ प्राध्यापक असून त्यांना तीन दशकांचा, विशेषतः आंतरराष्ट्रीय कायदा व मानवाधिकारामधील अध्यापनाचा व संशोधनाचा अनुभव आहे.

त्यांनी उत्तराधिकारी राष्ट्रांविषयीचा आंतरराष्ट्रीय कायदा व मानवाधिकारा वरील तीन पुस्तके लिहिली आहेत. अंतरराष्ट्रीय कायदा, मानवाधिकार, व भारतीय राज्यघटना यांच्याशी संबंधित अनेक प्रतिष्ठित नियतकालीकांमध्ये त्यांचे संशोधनात्मक निबंध प्रकाशित झाले आहेत.

त्याचप्रमाणे युरोपियन आयोगाच्या इरास्मस मुंडस कडून शैक्षणिक व सामाजिक कार्याबाबतचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच त्यांना दोन वेळा फ्रेंच सरकारची संशोधनवृत्ती तसेच सन २०१७ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सर्वोत्तम शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे. मानवाधिकारांच्या प्रसारासाठी प्रयत्न केल्याबद्दल भारत आंतरराष्ट्रीय मैत्री संस्था नवी दिल्ली यांचा विजयश्री पुरस्कार त्यांना सन २००५ मध्ये प्राप्त झाला आहे.

त्यांनी तामिळनाडू डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठ, चेन्नई व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा येथे आंतरराष्ट्रीय स्वामित्व अधिकार व विधी विभागाचे प्रमुख, तसेच अधिष्ठता, संचालक व परीक्षा नियंत्रक म्हणून सुद्धा काम केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व अन्य विद्यापीठांच्या विविध विद्याशाखा व व्यवस्थापन परिषदेवर सभासद म्हणून काम केले आहे.

पुद्दुच्चेरी विद्यापीठात सन १९९७ मध्ये मानवाधिकार व कर्तव्ये शिक्षणासाठीचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे केंद्र स्थापन करण्यात डॉ. सास्त्री यांनी पुढाकार घेतला. केंद्राचे समन्वयक म्हणून मानवाधिकारांच्या प्रसारासाठी मानवाधिकारातील संशोधनात्मक व शैक्षणिक उपक्रमांच्या व्यतिरिक्त अनेक कार्यक्रम, परिषदा व चर्चासत्रे आयोजित केली.

सध्या ते महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या अभ्यासमंडळाचे सभासद आहेत.

डॉ. सास्त्री यांनी अनेक चर्चासत्रे, परिषदा व कार्यक्रम आयोजित केले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विधी विभागाचे प्रमुख म्हणून विभागाच्या विकासासाठी अनेक प्रशासकीय व शैक्षणिक उपक्रम त्यांनी हाती घेतले. त्यामध्ये १ वर्षाच्या स्नातकोत्तर विधी अभ्यासक्रमाचा समावेश आहे. स्नातकपूर्व अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रम समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अभ्यासक्रमांत कालोचित बदल केले असून परीक्षा पद्धतीमध्ये सुद्धा सन २०१७ पासून सुधारणा केल्या आहेत.

